## प्रकाश राऊत

# नोकरशाहीतील बाळूच्या गमतीजमती











# नोकरशाहीतील बाळूच्या

# गंमतीजमती

-प्रकाश राऊत

नोकरशाहीतील  बाळूच्या गंमतीजमती

प्रकाशक
ज्ञान प्रकाशन
1075 सदाशिव पेठ,
पुणे 411030.
मो. : 9822280424

मुखपृष्ठ : रचना क्रियेशन्स

मुद्रक : अभिशेख प्रिंटर्स, पुणे
प्रथमावृत्ती   :1 मार्च 2011

सर्व हक्क
प्रकाश राऊत
मिनाक्षी एन्क्ल्हेव,
107 बी, स्टेट बँकेसमोर,
कँम्प अमरावती 444602
मो. : 9552543947

किंमत रूपये 110/- मात्र

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

ई प्रकाशन : १० जानेवारी २०१६

©esahity Pratishthan®2016

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

मला प्रेरणा देणा-या सर्व मित्रास,

चि. आशय पुत्रास, सौ. मृदुला कन्येस, व सहकार्य देणा-या

माझ्या पत्नीस अर्पण.

# अनुक्रमणिका


१) बाळूचा तोतलाडोह प्रारंभ

२) व्यथा बदलीची

३) बाळूचा प्रवास

४) दगडूची इंग्रजी

५ नोकरशाहीत स्त्रियांचा प्रवेश

६) मोबाइलचा वापर

७) गडचिरोलीत बाळू

८) बाळूच्या पाटर्या

९) सखे सोबती

१०) पाला पाचोळा

११) भ्रष्टाचाराचा उगम

१२) शिफारसी

१३) पिट्टू

१४)विक्षीप्त अनुभव

१५) हाजी हाजी

१६) टाईम पास

१७) निरोप समारंभ

१८) बॉस

१९) निवृत्तीचा दुःखानंद

२०) उरलं सुरलं


.....................................

# माझे मनोगत

दिसामाजी काहीतरी लिहावे, प्रसंगी अखंडीत वाचीत जावे, अशा संत श्री. रामदासाच्या उक्तीनुसार आजपर्यंत मनसोक्त वाचन झाले आहे. व अजूनही वाचन सूरू आहे. या प्रचंड वाचनाच्या छंदातून कधीतरी काहीतरी लिहावे असे बरेच दिवसांपासून वाटत होते. अशा वारंवार वाटण्यानेच मी वयाच्या बावीसाव्या वर्षापासून माझ्या लिखाणास प्रारंभ केला होता. पण ही सूरूवातच मुळात चुकीची झाली असे वाटायचे कारण की मी इंग्रजीतून लिखाणास प्रारंभ केला होता. वास्तविक माझी मातृभाषा मराठी असतांना मी इंग्रजीमध्ये लिहिण्यास सूरूवात करावी हे मला कालांतराने योग्य वाटले नाही. परंतू असे आढळले होते की मराठीतून काही लिहावयाचे तर त्यात स्पर्धा फार असते. त्यामुळे मी सूरूवातीला किरकोळ स्वरूपाचे पत्र लेखनच केले. आम्हाला आमच्या आदर्श शाळेत म्हणजे पब्लीक स्कूलमध्ये असतांना १९६७ ते १९७२ या कालावधीत दैनंदिनी लिहावयाची सवय तेथील आदर्श शिक्षकांनेच लावली होती. कारण ती लिहिणे त्या शाळेमध्ये अनिवार्य असायचे. अशी दैनंदिनी रोज वसतीगृहामध्ये सायंकाळी प्रार्थनेच्या वेळी वाचून दाखवावी लागत असे. अशा जडलेल्या बालपणाच्या चांगल्या सवयीमुळे मी पुढे असा उपक्रम बरेच वर्ष चालू ठेवला होता. या लेखनाच्या सवयीनुसार काही दिर्घ स्वरूपाचे लिखाणास केंव्हातरी प्रारंभ करावा असा विचार मनात वारंवार यायचा. परंतू नोकरशाहीमध्ये दिवसातून आठ तास कार्यालयीन कामामध्येच व्यस्त राहावे लागत असल्याने प्रत्यक्ष लिखाण करण्याचा उत्साह येवून सूध्दा तो नेहमीच मावळायचा. इतक्यात काय घडले की माझी पदोन्नती व स्थानांतरण या दोन्ही गोष्टी एकत्र घडुन आल्याने मला ही सुवर्णसंधी मिळाली. माझे स्थानांतरण गडचिरोली या नक्षलग्रस्त भागातुन नाशिकसारख्या रम्य ठिकाणी झाल्यामुळे माझा आनंद व्दिगुणीत झाला. व

मिळालेल्या सुवर्णसंधीचा उपयोग म्हणून मला या ठिकाणी लिखाणाचा उत्साह जागृत झाला. विदर्भामध्ये बाराही महिणे उष्ण वातावरण असल्याने तेथे काही लिहावे तर जबरदस्तीने उत्साह आणावा लागतो. तरी सूध्दा तेथे मातृभूमीमध्ये विविध सूचना पत्रे लिहीलीत. पण येथे आल्यावर मला असे जाणवले की येथील वातावरण थंड असल्याने येथे तर साधा घाम सूध्दा येत नाही. मला वाटले म्हणूनच की काय येथे मान्यवर लेखक मंडळी होवून गेली असावी. अशा या अतिरम्य वातावरणाचा सदुपयोग करुन घ्यावा या उद्देशाने येथेच दिर्घ लिखाणास प्रारंभ करावा असे ठरविले व त्यासाठी मला माझ्या पदोन्नतीमुळे कार्यालयात आणि घरीसूध्दा वेळ मिळत गेला.

माझ्या सर्व जवळच्या मित्रांच्या आग्रहास्तव, नेमके कोणत्या प्रकारचे लिखाण करावे याबाबत चर्चा केल्यानंतर काहीतरी मार्मिक व विनोदी लिखाण करावे, असे मला सूचविण्यात आले. काही किरकोळ स्वरूपाचे लिखाण ‘द हितवाद, नागपूर टाइम्स, मातृभूमि, योगचिंतन, शेगावीचा राणा, विकास प्रबोधीनी इत्यादी वृत्तपत्र व नियतकालिकांमधून यापूर्वी झालेले आहेच. काही काळ तर मी योगाचे वर्ग अमरावती येथे घेतल्यामुळे मला योग या विषयावर भाषणे सूध्दा देण्याचा योग आला होता. व त्या भाषणाच्या माध्यमातून मी वाचकांपर्यंत पोहोचू शकलो होतो परंतू दीर्घ स्वरूपाचे लिखाण करण्याची जिज्ञासा माझी झोप उडवंत होती, करीता शेवटी शारदेला नमन करून मी हे विनोदी स्वरूपाचे दिर्घ लिखाण सूरू केले आहे. यात विशेषतः प्रथम प्रकरणामध्ये नोकरीच्या प्रारंभिक काळातील बाळूच्या जीवनातील गंमतीजमती, बदली प्रकरणामध्ये काहीशी व्यथा, बॉस प्रकरणामध्ये नोकरशाहीमिध्ये कशा प्रकारची निरनिराळी माणसे भेटतात याचा उल्लेख केला आहे. व त्यानंतर क्रमशः येणा-या व स्वतः निरीक्षण केलेल्या घटनांचा सत्य सदृश उल्लेख, कोणाच्याही भावनांना ठेच पोहोचणार नाही या पध्दतीने व कल्पकतेने लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. यात कोणाची टिका, उपहास, करण्याचा उद्देश नसून वाचकांचे केवळ मनोरंजन व्हावे अशा विचारानेच मांडणी केलेली आहे. तथापि काही घटकांशी योगायोगाने संयोग जुळून येत असल्याचा कोणास भास होत असल्यास त्याबद्दल वाईट न मानता या पुस्तकाचा आनंद घ्यावा, असे मला वाटते. कारण याचा मूळ उद्देशच मनोरंजन असा आहे.

हे पुस्तक लिहितांना मी आजपर्यंत १९९४ ते २०१० या कालावधीत वाचलेल्या सहाशे पुस्तकांचा मला भरपूर फायदा झाला आहे असे वाटते. त्यामुळे मला सारखे विचार सूचत गेले असावे. या विचारामध्ये काही काव्यपंक्ती तर काही संस्कृत श्लोकांचे वळण करून केलेले श्लोक आढळतील. काही लखांमध्ये केवळ मनोरंजन नसून समाजातील पवृत्तींमुळे निर्माण झालेला विरोधाभास किंवा दुःखद मर्म सूध्दा आढळेल. हे लिखाण करतांना माझ्या कार्यालयातील श्री. वांढेकर शाखा अभियंता यांनी सखोल वाचन करून ज्या सुधारणा सुचविल्या त्या मान्य करून मी पुढील लिखाण चाले ठेवले. तसेच श्री. चौधरी शाखा अभियंता, श्री. गायकवाड, श्री. जोशी वरीष्ठ लिपीक ईत्यादी सहका-यांनी वेळोवेळी माझा लिखाणाचा उत्साह कायम ठेवून ते सारखे प्रोत्साहीत करीत राहले.. व त्यांचे सहकार्य सूध्दा लाभले, ही माझ्यासाठी अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

२०११ हया नवीन वर्षाच्या सुरूवातीला मी हे पुस्तक लिहावयास सूरूवात केली त्यात सर्वात जास्त उत्साह कोणी नेहमीच वाढविला असेल तर ती माझी मुलगी, सौ. मृदुला गरपाळ, कारण ती या लिखाणाचे सूरूवात करतांना नाशिक येथेच मुक्कामी होती. दुसरे माझा मुलगा जो टाटा कन्सल्टंसी रिसर्च संस्था, पूणे येथे संगणक सिस्टीम इंजिनीअर पदावर कार्यरत आहे. हा आशय राऊत मुळात इंग्रजी माध्यमात शिकला असला तरी त्याने मला या वयातही पूणे येथून दूरध्वनीवरुन प्रोत्साहीत केले ही जमेची बाजू आहू. तिसरी माझी पत्नी, सॉरी मला थोडा विनोद निर्मीतीचा छंद असल्याने स्पष्ट करतो की ही तिसरी पत्नी नसून पहिलीच आहे तर हीने म्हणजे आमच्या सौ. रेखा राऊतने मला किमान माझेजवळ बसून माझे लिखाण वाचून दाखवून मला संगणकावर लिहीण्यास मदत केली. या सर्वांच्या प्रेमाने व प्रेरणेने मी माझे हे पुस्तक एक महिण्याच्या कालावधीत पूर्ण करून आपल्या सर्वांसमोर सहर्ष प्रस्तुत करीत आहे. कृपया वाचकांनी आपले अभिप्राय मला दूरध्वनीव्दारे जरूर कळवावे, हीच सदीच्छा.

धन्यवाद.

**----------प्रकाश मा. राऊत**

# १) बाळूचा तोतलाडोह प्रारंभ

पूर्वीच्या काळात उत्तम शेती, मध्यम व्यापार, व कनिष्ठ नोकरी असे म्हणत असत. पण आज काळ बदलला असल्याने उत्तम नोकरी, मध्यम व्यापार व कनिष्ठ शेती असे म्हणावे लागते. अशा उत्तम नोक-या मिळविण्यासाठी धडपड, बुध्दिमत्ता, प्रयास यापेक्षाही अनेक घटकांचा अलिकडे समावेश अत्यावश्यक वाटतो. त्यापैकी मुख्य म्हणजे प्रायव्हेट नोक-यांसाठी देणगी दयावी लागते. साधी शिक्षकाची नोकरी आवश्यक असेल तर एक लाखाचे वर किंवा त्यापेक्षाही जास्त रक्कम संस्थेसाठी देण्याची तयारी असली पाहिजे, कधी कधी तर साध्या शिपायाच्या पदासाठी सुध्दा हीच परिस्थिती निर्माण होते तेंव्हाच पुढील नोकरीतील सुखाची अभिलाषा उरात बाळगता येवू शकते. अनेक मान्यवर संस्थांनी गरजूंना भीक मागितल्या प्रमाणे देणगी मागावी, ही आजच्या काळातील सरेआम पध्दत झाली आहे. व ही भीक नाही तर काय?. पण भीक हा शब्द योग्य वाटत नसल्याने देणगी या शब्दाचा वर वापर केला आहे. कधी कधी तर देणगीची रक्कम ही त्याला भविष्यात मिळणा-या मासिक वेतन गुणिला बारा महिणे, गुणिला अंदाजे पस्तीस वर्षे सर्व्हिस यापेक्षाही जास्त असण्याची शक्यता नाकारता येत नाही. मग एखादेवेळी या देणगी रकमेवर मिळणारे व्याजाएवढीच रक्कम त्यास पगार म्हणून देण्यात येते. पण असा हिशोब करणा-यांनी संस्थेची नोकरी करू नये त्यापेक्षा, अरनेस्ट हेमिंग्वेच्या The old man and the sea या कादंबरीतील हिरोप्रमाणे एका माशारूपी अन्नासाठी संपूर्ण जीवनभर समुद्राच्या काठाऐवजी स्वतःच्याच नापिक शेतीत ' यावश्चंद्रदिवाकरौ ' प्रयत्न करून व राबराब राबून शेवटी आत्मदहन करणे श्रेष्ठ होईल, असे आजकालच्या संस्थाप्रमुखांना वाटत असते. ही आजची वस्तुस्थिती व गंमत आहे. सर्व खेळ हा पैशाचाच असल्याचे आढळून येते.

अशा परिस्थीतीत आजचा आधुनिक विद्यार्थी कळत न कळत सरकारी नोकरीकडे स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून प्रयत्नशील असतो कारण सरकारी नोकरभर्ती स्पर्धा परीक्षेमुळे तरी अतिशय पारदर्शी असेल असा सर्वसामान्यांचा गोड गैरसमज असतो. कदाचीत पारदर्शी असेलही. त्यामुळेच तर या परीक्षांना देशस्तरावर लाखो विद्यार्थी, महागडा अर्ज भरून व महागडी शिकवणी लावून, तसेच जगनियंत्यावर भरवसा ठेवून परीक्षेस बसत असतात. दहा लाख विद्यार्थी गुणिला एक हजार रूपये प्रती अर्ज बरोबर शंभर कोटी रूपयामध्ये या देशात कमीतकमी दहा हजार विद्यार्थ्यांना तरी नोकरी मिळते किंवा काय अशी शंका सर्वसामान्यांना येते. हा प्राथमिक अंदाज कदाचीत चुकीचाही असू शकतो. आजच्या वाढत्या लोकसंख्येमुळे विद्यार्थ्यांना हा द्रविडी प्राणायाम करावा लागतो. पण प्राणायाम हा जीवनोपयोगी आहे असे आपले ऋषीमुनी सांगून गेले व स्वतः मात्र प्राणमुक्त झाले आहे व आपल्यासमोर मात्र प्राणसंकट उभे आहे. या विश्वात प्राण

आहे तोपर्यंत सर्वेन सुखिनः सन्तु, सर्वे सन्तू निरामया, असे प्रत्येकालाच वाटत असते. त्यामुळे असे सुख प्रायव्हेट नोकरीच्या तुलनेत सरकारी नोकरीतच मिळू शकते असे स्वानुभवावरून वाटते. व अशी ईतरांचीही कल्पना असू शकते.

आता नोकरीविषयी पूर्वीचा अनुभव कथन करतो. पूर्वी नोकरी ही कनिष्ठ दर्जाची समजल्या जात असल्याने अर्थातच तिच्याकडे सगळयांचे दुर्लक्ष होत असे. म्हणजेच थोडक्यात कोणी व्यापाराकडे किंवा कंत्राट पध्दतीकडे किंवा शेतीकडे स्वतःचे लक्ष केंद्रीत करीत असे. त्यामुळे परीणामस्वरूप ज्या थोडयांना नाईलाज म्हणून नोकरीकडे आकृष्ट व्हावे लागत असे ते आज अत्यंत मजेत दिवस घालवत आहेत, असे ज्यांना नोक-या नाही त्यांची मते आहेत. म्हणूनच आज नोकरी करणारे, नोकरी न मिळणा-यांना मोठया अभिमानाने असा उपदेश करतात की, 'You are never given a wish without also being given the power to make it true. ' म्हणजेच आपणास परमेश्वराने अशी कोणतीच ईच्छा दिली नाही की, जी परिपूर्ण करण्यास आपणास शक्ती दिल्या गेलेली नाही. म्हणजेच ईच्छा तेथे मार्ग असतो माणसात असलेली शक्ती म्हणजेच ईश्वर त्यामुळे अथक प्रयत्नानंतर आजही नोकरी मिळू शकते. अर्थात या माणसाच्या सूप्त शक्तीबाबत ओशोही म्हणतात की Man is a seed of God. असो.

१९७२ चा तो काळ. म्हणजे त्या वर्षी शासकीय पब्लीक स्कूल, चिखलदरा येथून दुसरी बॅच उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण होवून बाहेर पडली होती. पब्लीक स्कूल, चिखलदरा ही शासनाची ग्रामीण विद्यार्थ्यासाठी काढलेली प्रथम स्पर्धा शाळा, ज्यावेळी स्पर्धा परीक्षांसाठी एकही पुस्तक उपलब्ध नव्हते. त्यात केवळ ग्रामीण विद्यार्थी होते. या बॅचमध्ये बरेच ग्रामीण विद्यार्थी होते. त्यावेळी मा. मधुकरराव चौधरी शिक्षणमंत्री यासारखी निष्ठावान मंडळींनी या शाळेचे नांव पब्लीक स्कूल ऐवजी विद्यानिकेतन केले होते. या शाळेत निष्ठावान व आदर्श शिक्षक होते. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना चांगले संस्कार, दैनंदिनी लिखाण, बाबासाहेब पुरंदरेकृत शिवचरीत्र वाचन, कला, नृत्य, संगीत, वाचन, लेख लिखाण, सर्जनशीलता अशा असंख्य गोष्टी शिकविण्यात आल्या. ज्याचा आजच्या काळात काहीही उपयोग झाला नाही असे वाटते. कारण त्या शाळेतील आजही बरेच विद्यार्थी नोकरीविरहीत जीवन जगत आहेत. असा विद्यार्थ्यांचा अनुभव आहे. यातील अत्यंत महत्वाची गोष्ट अशी की या शाळेतील जवळ जवळ सर्वच विद्यार्थी उच्च पदावर आजही कार्यरत आहेत. उदाहरणार्थ :- मा. श्री. रविन्द्रसिंग जालमसिंग जाधव हे सध्याच्या राष्ट्रपतीचे पी. ए. आहेत. ईतरांपैकी काही O. N. G. C. Manager, R. T. O. , S. P. मंत्री, खासदार अभियंता व डॉक्टर्स आहेत. व अशा नोकरशाहीतील सर्वात मोठी गंमत म्हणजे या आदर्श शाळेचा एक कांबळे नावाचा मित्र नागपूरमध्ये आजही सायकल रिक्शा ओढत आहे. ईतर सर्व सामान्य माणसासारखे सध्या इतरत्र अत्यंत समाधानाने कार्यरत आहे.

हया नोक-या कशा लागतात. ही सुध्दा एक नोकरशाहीतील गंमतच आहे. त्यावेळी नोक-या मिळणे कठीण नव्हते पण भरपूर अभ्यास करा असे म्हणणारे काही प्राध्यापक त्यांना शासकीय तंत्रनिकेतनात नोकरी असल्यामुळे काही न शिकविता फुकट उपदेश देण्यात पटाईत असायचे. पंचेचाळीस मिनिटांच्या तासात जास्तीत जास्त वेळ कसा घालवायचा हे तंत्र त्यांना तंत्रनिकेतनात असल्यामुळे चांगलेच अवगत होते. मार्कस देतांना कंजूषी करून टेस्ट परीक्षेत २० पैकी ११ पूर्णांक एक चतुर्थांश मार्क देत होते व एक चतुर्थांश मार्क जास्त कां दिला याचे स्पष्टीकरण पचेचाळीस मिनिटांच्या तासाची घंटी वाजल्यानंतरही किमान ४५ सेकंदाचे अतिक्रमण करून ते स्पष्ट करीत असत. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यास जास्त बोलण्याची उजागरीच नव्हती म्हणजेच त्याकाळी १०० पैकी ६८ जास्तीत जास्त व शून्य कमीत कमी मिळेलच याची खात्री होती.. आज काळ बदलला आहे. नोकरी मिळत नसली तरी प्रत्येकाचा मुलगा अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय पदवी किमान ९८ टक्के गुण घेवून पास झालेला असतो. व २ टक्के कां कापले यासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्यासाठी तो मागेपुढे पाहात नाही. याला कारण असे की आजच्या काळात साध्या प्राथमिक इंग्रजी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना टाकायचे म्हटले तर रूपये ३०,०००/- पर्यंत देणग्या किंवा फी च्या रूपात दयावे लागतात.

पण याला अपवाद मात्र एक विशेष असे प्राध्यापक उदा. प्रोफसर बिहाडे यवतमाळ हे एवढे मेहनतीने शिकवायचे की, भर हिवाळयांतही त्यांना घामाच्या धारा लागत असत. व त्यांची रोड इंजिनिअरींगची वही सर्वच विद्यार्थ्यांनी बरीच वर्षे सांभाळून ठेवली होती. सरकारी नोकरीत एवढी मेहनत करतांना आजतागायत अधिकारी बाळूने पाहिलेला नाही. तंत्रनिकेतनचे पांच सेमिस्टर प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्यानंतर नोकरशाहीतील प्रथम चमत्कार घडला. तो म्हणजे महाराष्ट्र शासनाने प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांची यादी मागविली होती व आश्चर्य असे की फायनल सेमचा निकालही लागण्यापूर्वी काही विद्यार्थ्यांना कनिष्ठ अभियंता पदाची नोकरी मिळाली. काही मित्र त्यांचे गावाजवळच लागले व बाळू अशा ठिकाणी लागला की जे नांव नकाशावरही सापडणे मुश्किल आहे.

तोतलाडोह हे ते गांव. ता. रामटेक व जिल्हा नागपूर हे नंतर कळले. त्यावेळी स्पर्धा परीक्षा मुलाखती असे प्रकार नसल्याने बाळू तोतलाडोह जलविद्युत प्रकल्पावर थेट रूजू झाला. महाराणा प्रतापासारख्या हूबेहूब मिशा असलेले बाळू ला उपविभागीय अभियंता लाभले होते. त्या काळात ऑफीसर वर्गामध्ये वागणूकीच्या बाबतीत फार तफावत असे. अधिका-यांचा फार धाक वाटत असे. आजकाल तसे दृश्य पहावयास मिळत नाही. काळाच्या बदलामुळे आजकाल सहकार्यांनी अधिका-यांना जवळ जवळ मित्रच बनवून ठेवले आहे. व जर एखादा अधिकारी मित्र बनू इच्छित नसेल तर त्याला बायपास करून त्याहीपेक्षा वरीष्ठ अधिका-यांशी संपर्क साधून त्यांना माणसाळविण्यात येते. किवा अंतिम उपचार म्हणून थेट मा. आमदार व खासदार यांचे आपण फार जवळचे आहोत असे भासवून धाकवण्यात येते यात काहीच अतिशयोक्ती नाही असे वाटते. या

अशा पवृत्ती जनसामान्यात आढळतात. त्यामुळे यात आमदार, खासदारांचा काही दोष नाही पण त्यांचे नावावर मात्र असा प्रकार आढळून येतो हे विशेष.

तर तोतलाडोह हे जंगली व निर्जन असे बाळूचे प्रथम नोकरी स्थान. आजकाल नोकरी लागली तर आपल्या आवडीचे स्थळ आपल्याला येनकेन प्रकारे मिळविता येते. आजच्या नोकरशाहीत तर ते निश्चीतच मिळविता येवू शकते पण आपण जर हरिश्चंद्रासारखे किंवा महात्मा गांधीसारखे सत्यवादी असाल तर मात्र आपल्याला असे बाळूसारखे अति दुर्गम व जंगली स्थळ जसे की, विदर्भाचे अंदमान निकोबार गडचिरोली, अहेरी, सिरोंचा एटाप्पल्ली अशी गांवे प्रथम नोकरी बक्षीस म्हणून मिळू शकतात. उपरोक्त तोतलाडोह हे जलविद्युत प्रकल्पासाठी पेंच नदीवर नवीन संशोधीत स्थळ असल्याने या ठिकाणी नोकर कमी व गाळे जास्त अशी वसाहत अगोदरच उपलब्ध होती. एक विशेष की अशा बाबतीत सहसा काटकसर आढळून येत नाही.

बाळू रूजू झाल्यावर बाळूला गाळे निवडीसाठी वसाहतीतील संबंधितांनी किल्यांचा गुच्छाच दिला होता. त्या जंगलातील एक सोयीचे निवासस्थान बाळूने अनोळखी मित्रांच्या सहवासात निवडले. हे निवडलेले क्वार्टर उघडताच (हा दारूचा क्वार्टर नव्हे ) मागील संडासात लपून बसलेल्या एका कोल्हयाने बाळूचे स्वागत केले, त्यानंतर साप विंचू कोल्हा कुत्रा जंगली मांजर हे सर्व बाळूचे व त्याचे मित्रांचे एक प्रकारचे स्नेहीच झाले होते असे म्हणावयास हरकत नाही. प्राण्यांच्या प्राथमिक ओळख्यानंतर जवळपास राहणा-या सर्व मित्रांच्या ओळख्या झाल्या. सर्वच बालवयातून पौगंडावस्थेत व पौगंडावस्थेतून प्रौढावस्थेत नुकतेच शिरले असल्यामुळे नोकर शाहीतील ब-याच परिभाषा बाळू समूहास अर्थात समजत नव्हत्या. जसे की आयोजकांची सौहार्द वागणूक, पाटर्या, भ्रष्टाचार ॲडजस्टमेंट इत्यादी. या सर्व संज्ञापासुन बाळू कोसो दूर म्हणजे फारच अलिप्त होता. म्हणजेच एकंदरीत बाळू समूह हा बाळ अभियंत्यासारखा होता. व बालकांना समाजातील हेवे दावे समजत नसतात बाळू तर त्यातल्या त्यात शासकीय पब्लीक स्कूलचा विद्यार्थी असल्याने उपरोक्त गोष्टी पासून मुक्त होता. नोकरी मिळाली यातच बाळू धन्यता मानत होता व आनंद उपभोगत होता पण बद्रीनाथला सोन्याच्या विटा मिळाव्या तसा लवकरच बाळूचा समस्वभावी मित्रमेळावा जमा झाला होता. वास्तविक वैनगंगेला वर्धा नदी मिळाली म्हणून काय वर्धा नदीचे पाणी वैनगंगा नदी स्वतःमध्ये लवकर मिळवून थोडीच घेते त्याप्रमाणे तोतलाडोह येथील पदवीधर अभियंता बाळूसाररख्या पदविकाधारक मित्रांशी सहसा मिळत नसे पण याला अपवाद म्हणजे बाळूचा एक परमस्नेही मित्र पदवी ऑनर्स असूनही बाळू समूहात सहज मिळाला. मिळाला हा शब्द बाळूच्या एका दूस-या मित्राचाच. कारण त्याला नोकरीत एखादी महिला कर्मचारी रस्त्यात भेटली तर तो बाळूला सांगायचा की - ती मला मिळाली असे तो म्हणत असे. इति बाळूमित्र उवाच. तसे बाळूसमूह सर्व एकमेकात प्रेमाच्या भावनेने मिळालेच होते.

हळूहळू बाळूची मेस सूरू झाली. मेस म्हणजे इंग्रजी शब्द समजून गोंधळ असे समजू नका. तसा बाळूच्या मेसमध्ये आळीपाळीने गोंधळ होतच होता. तोतलाडोहसारख्या जंगलात नोकरी करणे काही गंमतची गोष्ट नव्हती. मनोरंजनाचे कोणतेही साधन तेथे उपलब्ध नव्हते. आठ तासाची शिफ्ट पाळी संपली की, मनोरंजनासाठी एकत्र येणे हाच पर्याय उपलब्ध होता. एकदाचे अंदमान, निकोबार ला करमले असते पण तोतलाडोहला निसर्गसौंदर्याशिवाय, तारूण्यात आवडेल असे स्त्रिसौंदर्य व स्त्रिसहवास सहसा बाळू समूहास उपलब्ध झाला नाही.. संत तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे, वृक्षवल्लीच बाळू समूहास सगेसोयरे होते. हे विशेष. बाळूचा एक मित्र तर कविता करण्यात पटाईत असल्याने त्याच्या कविता तो बाळूला वाचून फार पिळायचा. पण बाळूच्या अल्प बुध्दीला त्याची उच्चत्तम कल्पना शिवत नव्हती. म्हणून बाळू समूह टाळक्याला फार त्रास देत नसे. तरी पण तो कधी कधी ‘एक झोळी करकचटून, फुगलेली असतांना, मिळत गेलं दानच दान, प्रेमच प्रेम वगैरे वगैरे सुनवायचा त्यामुळे त्याच्या झोळीऐवजी बाळूच्या मेंदूची झोळी फाटायला लागली होती. बाळूचा तिसरा एक मित्र होता. दोन वर्षे एका मेस मध्ये बाळूसमूह बॅचलरपणाचा आनंद घेत होते पण पाहिजे तशी आनंदाची उच्चत्तमता अजूनही बाळूच्या मित्रसमूहाने गाठलेली नव्हती.

हळूच उपरोक्त मित्राने आनंदासाठी एक नवीन शकल शोधून काढली. व ती म्हणजे मद्याधार. मद्याचा आधार. मद्याची धार नव्हे. पण संस्काराचे बाळकडू पिलेले बाळूसमूह मद्याला विष समजत होते. पण हळूहळू बाळूसमूहाची विष पिण्याची विश म्हणजे ईच्छा वृध्दींगत होत गेल्यामुळे बाळूसमूहाने पार्टी करण्याचे ठरविले. पार्टी म्हटल्याबरोबर बाळूच्या सर्व मित्रांनी चटकन हात वर केले परंतु contribution म्हटल्याबरोबर विद्युत वेगाने, उंचावलेले हात खाली घेतले गेले व ‘नक्टीच्या लग्नाला विघ्न निर्माण झाले..

पार्टीसाठी आयोजक, किंवा प्रायोजक मिळेना म्हणून तूर्त हा असर्जनशील विचार स्थगीत केला. पुढे केंव्हातरी किरकोळ पाटर्या होतीलच या आशेने बाळूसमूह दररोजची संध्याकाळ गप्पा करूनच विसर्जीत करीत होतो. बाळूसमूहाच्या बाळ अभियंत्याचं अंडं लवकरच फोडून बाळूसमूहाला लवकरच नूतन प्रौढत्व जीवनाकडे वाटचाल करावयाची होती. त्यासाठी बरीच उद्दीष्टे मनःचक्षुसमोर आवासून उभी होती. एव्हाना दोन वर्षाचा जीवनकाळ साधाच गेला. आता मद्यापेक्षाही आनेदाची गोष्ट जीवनात काय असू शकते याचा सतत पाठपुरावा रोजच्या चर्चेत चालत असे. पण तत्पूर्वी पार्टी करण्यासाठी कोणी आयोजक वगैरे मिळतो काय याची शोधाशोध सूरू करावयाची होती. आयोजक  हा प्राणी तसा अत्यंत चालाख व चपळ असतो याची त्या कोवळया वयात आम्हास जाणीव नव्हती त्यामुळे हा मद्य पार्टीचा प्रकारही बाळूच्या दृष्टीने फेल पडला आणि स्वतःचा पगारातील पैसा अशा वाईट कामासाठी घालविण्या इतपत बाळूसमूह मूर्ख नक्कीच नव्हता.

पेंच जलविद्युत प्रकल्प तोतलाडोह हा मेजर प्रोजेक्ट असल्याने त्या ठिकाणी जास्त केरळीयन लोक होते. त्यांची भाषा मलयालम असल्यामुळे त्यांच्याशी पंगा घेणे कठीणच होते. बाळूच्या प्रकल्पावर मि. नायर नांवाची व्यक्ती अशी होती की, आपण दररोज वृत्तपत्र वाचतांना साधारणपणे महाराष्ट्र किंवा जास्तीत जास्त भारताच्या बातम्या वाचणार असतो पण हा पठ्ठा चक्क इंग्रजी द हितवाद मधील कोणतीतरी रशीयाची बातमी वाचणार व बाळूशी साईटवर कॉंक्रीटींग किंवा ड्रीलींग ब्लास्टींग बद्दल न बोलता एखाद्या निराळयाच बातमीविषयी.. वाचली काय म्हणून बाळूला विचारायचा. उदाहरणार्थ :- ही १९८० च्या दरम्यानची बातमी. काय सर आज आपण रशियाचे अध्यक्ष Constantin Chernenkov झाल्याचे वाचले आहे काय ? आता विचार करा, तोतलाडोह सारख्या दुर्गम व निर्जन वस्तीवरच्या साईटवर Constantin Chernenkov चे बाळूला काय काम. एकंदरीत त्यांना बाळूचे साईटवरील लक्ष दुसरीकडे विचलीत करावयाचे होते असा होत नाही काय. हे वैशिष्टयपूर्ण अभिकरण कामाकडे अतिशय कमी व बाळूला मलयालम भाषा शिकविण्याकडे जास्त लक्ष देत होते. याचा परीणाम असा झाला की, बाळूला मलयालम भाषेत जास्त आवड निर्माण होवू लागली. बाळू सुध्दा त्याला -रंड वंडी अवडं पोयो, म्हणजे दोन गाडया (ट्रक) कोठे गेल्या असे म्हणू लागला. , म्हणजे तो म्हणायचा - सारे, रंड वंडी बजारल पोयी. म्हणजेच बाजारात गेल्या. असा भाषा शिकण्यासाठी बाळूने नोकरीचा सदुपयोग करून घेतला, असे वाटते. नंतर त्यांनी बाळूला एक लहान मुलाची कविता शिकविली ती अजूनही बाळू ला आठवते. ती अशी.

ओन्नागम् कुन्नुम्मेल, ओराडी कुन्नुम्मेल,
ओरायीरम् किळी कुडवच्छु,
कुट्टीम निलामकिळी, तामैर पै किळी,
तान्नीरीन्नाडन्न पोन्नोला.

ईति श्री. नायर मुखे बाळू कंठस्थ. आता उपरोक्त कवितेचा अर्थ बाळूने सांगितला नाही तर तुम्ही त्याला जोडयाने बडवणार. त्यामुळे त्याने अर्थ कथन केला -एका पहाडावर दुसरा पहाड होता. त्यावर एक हजार चिमण्या वास करीत होत्या त्यापैकी एक अतिशय सुंदर चिमणी झोके घेत होती. वगैरे. सांगण्याचं तात्पर्य नोकरशाहीत अशाही गंमती जमती असतात.

बाळूचा एक मित्र तर असा होता की, तो त्याच्या दोन वर्षाच्या चिमुकलीला, भारत सोडून जगातल्या इतर सर्व देशाच्या राजधान्या शिकवायचा. सांग बेटा होनोलूलूची राजधानी काय. ती काहीतरी इंग्रजीमध्ये बाळूला न समजणा-या उच्चारामध्ये सांगायची त्यामुळे बाळू तिला उगीच जनरल नॉलेज म्हणून विचारायचा. सांग बेटा -तू कोणत्या गावात राहते. तिला हे माहित नसल्यामुळे चटकन होनोलूलू म्हणायची. आहे की नाही गंमत, बरं.

उपरोक्त आयोजकाचा पिच्छा सोडल्यावर बाळू समूह परत आनंदी जीवनाच्या घोळक्यात सायंकाळी एकत्र येत होता . आता गद्य गेले, मद्य गेले, पद्य सुध्दा गेले. आता नवीन संशोधन म्हणजे बाळू समूहाने आनंदासाठी स्त्री लंपट व्हायचे ठरविले.

तसा हा स्त्री लंपट शब्द फार वाईट आहे. परंतु यातून आपण वाईट अर्थ काढू नका. कारण बाळू समूह बॅचलरतेकडून वैवाहिक जीवनाकडे प्रवेश करण्याच्या इराद्यात होते. बाळूच्या चारही मित्रांनी आपापला विवाह उरकवण्याचे ठरविले. म्हणजे आपापसात नाही बरं कां. थोडयाफार फरकाने बाळू समूह विवाहीत झाला. नवीन मुलींचा बाळू समूहाच्या जीवनात प्रवेश झाला. नोकरशाही म्हणजे तोतलाडोहचे जंगल हे नवविवाहीत महिलांना वेगळे सांगण्याची बाळूला गरज भासली नाही. लवकरच या बाया बाळू समूहात माणसाळल्या.

पाहता पाहता चार वर्षाचा काळ निघून गेला. पेंच प्रकल्पावर अतिरीक्त पैसा सोडून बाळू समूहास सर्व काही मिळत होते. एकंदरीत जीवन अतिशय आनंदी स्वरूपाचे होत असे म्हणावयास हरकत नाही. पण बाळू व त्याचे सर्व मित्र बोगद्याच्या बांधकामामध्ये शिफ्ट डयुटीवर असल्याने जीवन तितकेच धोकादायकही वाटत होते. बोगद्यात काम करण्यासाठी अभियंत्यांना २० टक्के धोका भत्ता मिळत असे. पण जीवाचा १०० टक्के धोका बाळगून सेवेशी खेळत होते. त्याकाळात बढतीही लवकर मिळत नसे. बाळूच्याच बॅचपासून बढतीचे प्रकरण बाळूच्या पार्श्वभागावर लाथ मारल्यासारखे दूर पळाले होते. डिग्री होल्डरला २० वर्षे तर डिप्लोमा होल्डरला तब्बल ३० वर्षे थांबावे लागणार होते. याची तिळमात्रही कल्पना नव्हती.

असा जवळ जवळ पाच सहा वर्षाचा काळ पेंच प्रकल्पावर काढल्यावर कोणालाही तेथून बाहेर पडावेसे वाटणे स्वाभाविक होते. यासाठी एकमेव पर्याय तो बदलीचाच होता. तशी नियमानुसार तीन वर्षानंतर कर्मचा-याची बदली होत असते पण बदली हे नोकरशाहीतील वेगळेच प्रकरण असल्याने याचे सविस्तर वर्णन पुढील प्रकरणामध्ये येणारच आहे. तत्पूर्वी तोतलाडोह या भव्य प्रकल्पावरील एक दोन घटना सांगून बाळू हया प्रकरणास संपुष्टात आणणार आहे..

एका प्रकल्पावर एक अत्यंत सालस, सरळ व पापभिरू अविवाहीत व्यक्ती होता. त्याचेकडे तोतलाडोह प्रकल्पावर लागणा-या पूर्ण स्टील यार्डचा कार्यभार नुकताच दिल्या गेला होता अर्थात नोकरशाहीमध्ये एवढा प्रचंड कार्यभार कधीही कोणी मोजून देत नसतो. त्यामुळे साहजिकच त्याने तो न मोजता स्विकारला होता. सर्व काही व्यवस्थित सूरू होते पण काही समाज कंटकांनी त्याचेवर मानसिक दबाव देण्यास सूरूवात केली. ही नोकरशाहीत काही नवलविशेष गोष्ट नाही. अगदी निकटचे कार्यालयीन सहकारी जसे स्टोअर क्लर्क, वरीष्ठ लिपीक व ईतर बाबू यांनी त्यावर मानसिक दबाव आणण्याचा प्रयत्न केला. जसे की -एवढा मोठा कार्यभार तुमच्याकडे आहे तेंव्हा तुम्ही याप्रकरणात केंव्हाही फसू शकता.

ज्या गोष्टी आयुष्यात कधीही घडणार नसतात त्यांना त्या घडू शकतात असे भासविणारे समाज कंटक आपल्या शेजारीच वावरत असतात याची त्याचे मनास कल्पना शिवली नाही. बस. वारंवार अशा प्रकारची चर्चा करून व त्याचेवर दबाव आणून किंवा वेळ प्रसंगी त्यास धमकावण्याचे कार्य उपरोक्त लोकांनी सुरू ठेवले.

एक दिवस मनःस्तापाने हा व्यक्ती नागपूरहून आला व कोणाशीही संपर्क न करता व मनातील भावनाशी स्वतःच खेळून रात्री ११.०० वाजताचे सुमारास आत्महत्तेच्या निर्णयात्मक पोहोचला. व १.३० चे सुमारास एक चिठ्ठी लिहून आत्महत्या केली. सगळीकडे हाहाःकार माजला. सर्व अभियंता मित्रमंडळी जमा झाली. बाजूला चिठ्ठी सापडल्यामुळे त्याचे वाचन करण्यात आले. त्या चिठ्ठीमध्ये, त्याला ज्या ज्या व्यक्तीपासून त्यास त्रास होता व त्या व्यक्तींनी त्यास कसे छळले याचे सविस्तर वर्णन दिल्या गेले होते. असा सर्व स्वयंस्पष्ट मसूदा त्यामध्ये होता. अर्थातच या घटनेमुळे सर्व अभियंता वर्गाला असे वाटत होते की या अभियंत्याचे मृत्यू प्रकरणास न्याय मिळावयास पाहिजे. पण या नोकरशाहीत काय विचीत्र घडते बघा. सर्व अभियंता तो चिठ्ठीचा प्रूफ घेवून नागपूरला पोलीस आयुक्तापर्यंत दरवाजे ठोठावले परंतु अंतिम निर्णया हा दिल्या गेला की, 'एखादा मनुष्य मृत्यूपूर्वी कोणाबद्दल काहीही लिहू शकतो व ते सत्यच असतं असं गृहीत धरता येत नाही. म्हणजेच शेळी गेली जिवानीशी अशी ही नोकरशाही. या ठिकाणी बाळूला इंग्रजी साहित्यातील भाषेच्या संदर्भातील एक वाक्य आठवले. A man is an arbitrary animal. he can speak lie. या उलट आता दुसरी घटना.

पेंच जलविद्युत प्रकल्पाच्या धरणावर बांधकाम सूरू असतांना दोन मजूरस्त्रिया दुपारच्या वेळात नैसर्गिक कॉल निमित्त पेंच नदीच्या मध्य भागात उंचवटयावर दैनंदिन विरंगुळा म्हणून बसल्या होत्या. उन्हाची वेळ. ढग नाही, पावसाचा अंदाज नाही, पण कोण जाणे, अचानक नदीच्या उर्ध्वभागाकडे अतिवृष्टी झाली असल्यामुळे अचानकच पेंच नदीला पूर आला. नदी पहाडातून वाहात असल्याने पाणी त्या स्त्रियांच्या आजूबाजूला वाहात होते व त्या मधल्या उंचवटयावर अडकल्या. आदिवासी वर्गातील मजूर असल्याने त्या मुळीच घाबरल्या नव्हत्या. पण पूराची स्थिती अशी होती की पूर चढतही नव्हता व उतरतही नव्हता. अशा वेळी काय करावे हा सर्वांनाच प्रश्न पडला होता. हळूहळू संध्याकाळ झाली. अंधार पडला होता. प्रकल्पावरील फोकस दिवे त्यांना धीर देण्यासाठी लावण्यात आले होते. त्या उंचवटयावर झाड असल्याने आणिबाणीच्या प्रसंगी त्या झाडावर चढतील असे त्यांचे डेअरींग पाहून किना-यावरील सर्वांनाच वाटत होते. त्यांना काढण्याचे सर्व केलेले प्रयत्न फोल ठरत होते.

इकडे मजूरांना वाचविण्यासाठी नागपूरला वरीष्ठांशी संपर्क करीत असतांना आढळत होते. हा प्रकार डिस्कव्हरी प्रोग्राम सारखा वाटत होता. दृश्य अगदी गंमतीदार वाटत होते. बघ्यांची वरदळ रात्रीच्या उशीरापर्यंत ये जा करतांना दिसत होती. त्या स्त्रियांनी मात्र मस्तपैकी, त्यांचे जवळ असलेल्या काडीपेटीच्या सहाय्याने एक शेकोटी पेटवून बिनधास्त विरंगुळा चालविला होता. इकडे नोकरयंत्रणा उगीचच चिंतेत असल्याचे भासवित होती. फार प्रयत्नांती एक हेलिकॉप्टर बोलवावे असे ठरले असावे की काय. मात्र त्या दिशेने चर्चा सूरू होती. हेलिकॉप्टर बोलविण्यास फार खर्च येईल अशीही चर्चा सुरू होती. एव्हाना रात्र पूर्ण निघून गेली होती. दूस-या दिवशी द हितवाद वृत्तपत्रात ' Two women stranded in Pench River अशी बातमी सूध्दा झळकली

होती. शेवटी मजूरांच्या अथक प्रयत्नानंतर त्या दोन पूरात अडकलेल्या महिलांना वाचविण्यात यश मिळाले. तोपर्यंत नोकरवर्गातर्फे वरातीमागून घोडे यावे तसे फालतू घिरटया घालणारे एक हेलिकॉप्टरही पाठविण्याचा प्रयत्न झाला होता. तो व्यर्थ गेला.

पण या दोन घटनांवरून एक गोष्ट सिध्द झाली की, अभियंत्याच्या तुलनेत मजूरांना अतिशय महत्व दिले गेले. या प्रकल्पावर कार्यरत अभियंत्यांना जवळपास सहा सात वर्षे होत गेली पण येथून कोणासही बदलीस पात्र समजल्या जात नव्हते. कदाचीत त्यामागे चांगलाही उद्देश असू शकेल पण अभियंत्याना मात्र तेथील जीवनाचा अतिशयच उबग आला होता. जो तो बदलीसाठी प्रयत्नात लागला होता. बदली कशी करून घ्यावी हे तंत्र बाळूला त्याचे आयुष्यात कधीच जमले नाही. याला कारण कदाचीत बाळूची आमदार, खासदार, मंत्री वगैरेंची ओळख नाही हे असू शकते. 'जिसका कोइ नही उसका तो खुदा है यारो या उक्तीनंसार असे वाटायचे की. 'जिसका कोइ नही उसका कहींपरभी तबादला फिक्स है यारो. पण त्या काळात पुष्कळांनी मात्र काही धनलक्ष्मीच्या मार्गाने पाहिजे ते स्थळ मिळवून घेतले होते असे ऐकिवात आले होते. मग बाळूची बदली कशी झाली ही सूध्दा एक गंमतच आहे.

तोतलाडोह प्रकल्पावर ॲप्रोच टनेलवर कॉंक्रीटींग सूरू होते. वाळू, गिट्टी, सिमेंट इत्यादी सर्व साहित्य योग्य असल्याचे गुणवत्त नियंत्रण विभागाचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच सदर कॉंक्रीटींगचे काम सूरू होते, पण अचानक अधिक्षक अभियंता यांनी बांधकाम स्थळास बोगद्यात भेंट दिली. त्यांच्या दृष्टीस एक पेबलयुक्त सृष्टी दिसली व ते चिडले. त्याकाळात अधिक्षक अभियंता सारखे वरीष्ठ अधिकारी सहसा कार्यक्षेत्रावर येत नसत. किंबहूना बाळूला त्यांचे दर्शनही घडत नसे त्यामूळे बाळूचा त्यांच्याशी परिचय असणे शक्यच नव्हते. त्यांचा वाळूमधील पेबल म्हणजे एक गोल दगड पाहून बाळू विषयी गैरसमज झाला. बाळूने बराच वेळ त्यांना पटविण्याचा प्रयत्न केला पण वरीष्ठांचा कोप हा देवाप्रमाणे असल्याने बाळूची ताबडतोब अकोला या लांब ठिकाणी तातडीने फुकटात बदली करण्यात आली. ईतरांना हया कामाकरीता पैसे मोजावे लागत होते व बाळूचे बदलीचे काम मात्र फुकटात झाले होते याचा बाळूला आनंदही होत होता व आश्चर्यही वाटत होते.

आता मात्र नोकरशाहीत Boss is always right. हयाची पक्की जाणीव बाळूला झाली होती. सर्व मित्रांची ताटातूट झाल्यामुळे बाळूला या बदलीमुळे दु:खही तेवढेच झाले. यापुढे बदली या प्रकरणाकडे वळू या.

*..................*

# २) व्यथा बदलीची

नोकरीतील बदल्या नित्य बाब हया असतात दुःखाच्या !

नोक-या हया मुळातच कधी नसतात सुखाच्या !!

हा थोडासा आपणास विपर्यास वाटत असेल कारण मागील प्रकरणामध्ये नोकरीमध्ये असणा-या सुखाविषयी लिहिलेले आढळले असेल. पण प्रत्यक्षात तसे नाही. त्यात नोकरीमध्ये असणा-या सुखाविषयी लिहीलेले नव्हते तर नोकरी करतांना, नोकरीचा कालावधी म्हणजे कार्यालयीन वेळेच्या व्यतिरीक्त व्यतीत केलेल्या जीवनाच्या आनंदाविषयी लिहीलेले होते. प्रत्येक मनुष्य आपापल्या परीने आनंदी जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असतो, परंतु त्यात बाधा अडचण आली नाही तर नवलच. पण दुःखाचा डोंगर ओलांडल्याशिवाय. वगैरे (अलीकडील अशोक सराफ यांचे चित्रपटातील वाक्य) सुख मिळत नाही असे म्हणतात. तत्पूर्वी बदली हे काय प्रकरण आहे त्या विषयी पाहू.

भारतातील कोणत्याही नोकरीमध्ये सर्वसाधारणपणे सर्वच सेवकांची संपूर्ण सेवाकाळात किमान तीन चार वेळा बदली होत असते बदली म्हणजे काय हे आपणास माहित असले तरी मोजक्या शब्दात व्यक्त करतो. बदली म्हणजे कोणत्याही सेवेत काम करणा-या कनिष्ठ पद ते वरीष्ठ पदावरील सर्व कर्मचा-याना किमान तीन ते पांच वर्षे सर्व्हीस एकाच ठिकाणी झाल्यानंतर कोणत्याही प्रकारची सूड बुध्दि न ठेवून, कमी किंवा, जास्तीत जास्त अंतरावर लोकसेवाहितार्थ किंवा रिकाम्या जागापूर्ती करण्यासाठी केलेले विनाकारण स्थानांतरण. वरील व्याखेतील सर्व अधिकार नोकरशाहीचे स्वाधीन असून त्यात कोणाला कोणतेही कारण, कोणत्याच अधिकारानुसार विचारता येत नाही. म्हणून काव्यपंक्तीत नोक-या हया सुखाच्या नसतात, असे म्हटले आहे.

आता बदली होणार आहे हे निश्चित आहे असे कळताच सर्व कर्मचारी आपापल्या पध्दतीने विविध प्रयत्नास लागतात. यामध्ये कोणी यशस्वी तर कोणी अपयशी होतात. कुप्रसिध्द कसाबलाही फाशीची शिक्षा वाचून दाखविल्यावर जसे रडू कोसळते त्याप्रमाणे कमी अधिक प्रमाणात प्रत्येक कर्मचा-याला प्रयत्न करूनही बदली मनासारखी न झाल्यास सुप्तपणे वाईट वाटत असते. पण एकदा बदलीचा आदेश हातात आला की, मग आपल्या जवळचा कितीही चांगला

अधिकारी असो त्यांचे काही चालत नसते. फार फार तर वरीष्ठ अधिकारी सहा महिने पर्यंत अशा व्यक्तीस त्याच कार्यालयात थांबवू शकतात. पण एकदा मंत्रालयातून स्मरण पत्र आल्यास मात्र काही इलाज नसतो. नोकरशाहीच्या प्रक्रीयेत ´Order is order-" असते. मग अशा पध्दतीने झालेली बदली ही बदली असते की बदला असतो हे भल्या भल्यांना कळत नाही, कळले तरी वळत नाही, वळले तरी समजत नाही. व समजले तरी उमजत नाही. म्हणजेच बदली हे असे काही अपरिहार्य प्रकरण आहे की त्यासाठी प्रत्येकाला हातपाय हालवावेच लागतात. आपण फारच प्रामाणिक असाल तर काहीच हालवायची गरज नाही. आपण आपोआपच हालविल्या जाणार हे जवळ पास निश्चीतच असते. एकदाचा पृथ्वीकडे येणारा ""Asteroid". चा गोळा पृथ्वीला धडकणार नाही पण बदलीची धडक कोणताही कर्मचारी टाळू शकणार नाही अशी हया नोकरशाहीत व्यवस्था असते.

करीता बदली होण्यापूर्वी सर्वसाधारण कर्मचारी काय करतो याचा परामर्श घेवू. सर्व प्रथम आपल्या नावाची काडी कोणी केली असावी याचा शोध घ्यावा लागतो. प्रथम काडी म्हणजे काय ते पाहू. साधारणपणे अभियांत्रिकी, वैद्यकीय, कायदा, समाजशात्र, मानसशात्र, तत्वज्ञान ईत्यादी शास्त्रामध्ये काही पारिभाषीक शब्द असतात. ते शब्द समजल्या शिवाय शास्त्र कळत नाही. संत तुकारामासारख्यांना सूध्दा ‘शास्त्रांची भाषा न कळे आम्हा‘ असे म्हणावे लागत असे. त्याप्रमाणे काडी म्हणजे काय हे कळल्याशिवाय ‘शासन शास्त्र‘ समजणे कठीण आहे. तर काडीची व्याख्या करावयाची झाल्यास काडी म्हणजे कोणतेही कारण नसतांना, असूरी आनंद मिळविण्यासाठी, मुद्दाम होवून कोणाच्या तरी नावाची बदलीसाठी वरीष्ठांकडे केलेली हेतुपुरस्सर कुशिफारस. अशा काडया केल्याने सर्वसाधारण कर्मचा-याला खालील फायदे होतात.

१. त्या कर्मचा-याची बदली झाल्यास सर्वात जास्त असूरी आनंद काडी करणा-या कर्मचा-याला सदोदीत व मनोमन मिळत असतो.

२. मीच त्याला कसा उडविले अशी फुशारकी मारून जनसामान्यात प्रभाव दाखविण्यास फारच मदत मिळत असते.

३. काडी करीत आहोत, हे चुकून माहित होत असल्यास, ज्यावर काडी होत आहे असा कर्मचारी स्वतःच्या स्वार्थासाठी काहीही करावयास तयार असल्याने तो हया काडी करणा-याकडे धन लक्ष्मी घेवून येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. आपण स्वतःच्या अधिकाराचा गैरवापर केल्याचा गर्वनिष्ठ परमानंद उपभोगत असतो. या आनंदात तो व्यक्ती कधी कधी तर आपल्या कुटुंबातही स्वतःचा अधिकार दर्शविण्याचा प्रयत्न करीत असतो पण त्या ठिकाणी त्याला शेपूट घालून बसावे लागते म्हणजेच थोडक्यात मग गिळून बसावे लागते.

५. वरीष्ठ अधिका-याची डोळेझाक करून त्यांना कसे फसविले याचा ही आनंद घेता येत असतो.

६. ऑफिसरला काहीच समजत नाही अशा चर्चेसाठी विषय मिळत असतो.

असे अनगिनत फायदे या काडयांमध्ये असतात. या गुणधर्माचे पृथ्वीतलावर कोठेही प्रशिक्षण उपलब्ध नाही. ही जन्मजात प्राप्त झालेली कला असते.. आपणास शास्त्रातील चौसष्ट कलांची जाणीव आहे पण ही पासष्टवी कला आजच्या कलियुगात मानवाने स्वतः ईश्वर परवानगी शिवायच शोधून काढली आहे. तरी सूध्दा ही कला आपणास आत्मसात करावयाची फारच तीव्र ईच्छा असेल तर 'शिका गों' ला जावे किंवा 'या शिका' ला यावे. प्रत्येक कर्मचा-याच्या बदलीमागे कारणीभूत कोणीतरी कर्मचारीच असतो हे मात्र त्रिवार सत्य आहे. नोकरशाहीमध्ये काडया करण्याचे असे प्रकार पुरातन काळापासून फार गुप्तपणे चाललेले असतात.

सध्या तर या बदलीला एवढे महत्व प्राप्त झालेले आहे की, नोकरशाहीतील कर्मचा-यांची बदली फाईल चक्क मा. (मा. चा अर्थ आपणास माहित आहे) मुख्यमंत्राच्या टेबलवर बोलावल्या जातात. त्याचा उद्देश मंत्रालयातील पारदर्शित्व दर्शविण्याकरीता. परंतू ज्याप्रमाणे सिने सृष्टीत पडदयावरील कलाकार वेगळे व पडदयामागील पार्श्वगायक वेगळे त्याप्रमाणे यात रहस्य असते. हे कदाचीत त्या मुख्य मंत्र्यांना आयुष्यातही माहित होणार नसते. एवढी गौप्यता या प्रकरणात दडली असते. त्यामुळे हा रहस्य उलघडा कथन न केलेलाच बरा. आता एखादया प्रामाणिक माणसाचे या नोकरशाहीमध्ये काय हाल होत असतात हे बघा.

हे बघण्यापूर्वी बाळूला एका वरीष्ठ लिपीकाचे एक वाक्य फार आवडले ते तुम्हास सांगतो. सर या नोकरशाहीमध्ये मुद्दाम होवून सहसा कोणी कोणाला त्रास देत नसतो.

तर परिस्थीतीमुळे आपल्यास त्रास होत असतो. जसे की आपली बढतीची फाईल अ ठिकाणावरून प्रस्तावीत झाली तर बढती होत पर्यंतच्या काळामध्ये आपण जर दुसरीकडे बदलून गेला असाल तर त्याची सखोल माहिती मंत्रालयात भरपूर केसेस मुळे पाहल्या जात नाही आणि मग नैसर्गिक रित्या आपला आदेश इकडे तिकडे भटकत असतो व आपला उगीच नोकरशाहीत गैरसमज होत असतो. माना के ये सच है. तरी सूध्दा त्रास तर होतोच ना. असो. आता पुढील प्रश्नाचे उत्तर द्या. म्हणजे बाळूच्या या बदली बाबत समाधान होईन.

आता बाळूचेच उदाहरण घेवू. बाळूची बदली तोतलाडोहवरून थेट अकोला येथे झाली होती. हे अंतर ३५० किलोमीटरचे असल्याने जो बदली प्रवास भत्ता दयावा लागला. त्यापेक्षा कमी प्रवास भत्ता कमी अंतराकरीता दयावा लागला नसता काय? किंवा बाळूची बदली बाळूच्या विनंतीनुसार केली असती तर पैसा वाचला नसता काय. त्यानंतर प्रदेशांतर्गत बदल्यामध्ये दहा

वर्षाचे वर बाळूच्या बरोबरीचे कितीतरी कर्मचारी बदलीस पात्र असतांना बाळूलाच अकोला येथून गडचिरोली येथे कां पाठविण्यात आले. वास्तविक बाळूचा कोणताही गोपनीय अहवाल त्या काळात सूध्दा वाईट नव्हता. म्हणजेच याला आपण थोडक्यात दुदैव असे समजू. या बदलीची कल्पना असूनही बाळूचा बढतीचा आदेश बाळूला त्याच्या मुख्य अभियंता नागपूर येथे न पाठविता तो थेट अमरावती मुख्य अभियंत्याकडे पाठविण्यात आला. यामुळे बाळूला जे खेटे घ्यावे लागले व मानसिक त्रास झाला याचे कोणी उत्तर देवू शकेल काय? असो हीच तर खरी नोकरशाहीची गंमत वाटते. त्यापेक्षाही जास्त गंमत अशी की बाळूचे गडचिरोली येथुन सूध्दा १००० किलोमीटरवर नाशिक येथे स्थानांतरण करण्यात आले व शासनाने बाळूला नियमानुसार अवाढव्य प्रवास भत्ता देयक दिले हेच बाळूला प्रदेशाअंतर्गतही बढती देता आली नसती काय म्हणजे या नोकरशाहीतील कितीतरी पैसा वाचला असता व तो किमान गरीबांच्या कामात आला असता. याशिवाय बाळूला व बाळूच्या कुटुंबाला फारसा त्रास झाला नसता. एवढेच बाळूला या ठिकाणी म्हणावयाचे आहे. नोकरशाहीतील असे भूर्दंड सामान्य माणसाच्या डोक्यावरच पडत नाही काय. या अपव्ययामुळे बाळूला आश्चर्यपूर्वक दुःख वाटते.

धडपडया व्यक्तींनी मात्र ज्या ठिकाणी ते शाखा अभियंता होते त्याच ठिकाणच्या उपविभागीय अधिका-यांना उडवून तीच जागा पटकावली. आहे की नाही नोकरशाहीत गंमत. असो जे होते ते भल्यासाठीच होत असते असे म्हणतात त्या दृष्टीने बाळू दिल्या घरी अतिशय आनंदी आहे. त्यामुळेच तर बाळूचे हे कथन या पुस्तकात येत आहे. ज्या ज्या व्यक्ती आर्थिक प्रलोभनाव्दारे अशी कामे करून घेतात त्यानाही नोकरशाहीमध्ये कधी कधी प्रेमाचा झटका बसत असतो.. नोकरीत बदली ही अतिशय चांगली गोष्ट आहे असे बाळूला कधी कधी वाटते. कारण त्यातून खालीलप्रमाणे फायदे होत असतात.

१. बदलीमुळे, जर तुमच्यावर मागील ठिकाणी काही कर्मचा-यांचा रोष असेल तर किंवा तुम्हाला नको असलेल्या व्यक्ती असतील त्यापासून कायमची मुक्तता मिळत असते.

२. माणसं, स्वभाव, जागा बदलते त्यामुळे वेगळाच आनंद मिळतो.

३. भरपूर प्रवास भत्ता देयक मिळतो.

४. नवीन ठिकाणी धर्मपत्नी येण्यास तयार नसेल तर एकटेपणाची मौज उपभोगता येते. एकंदरीत कटकटीतून मुक्तता होते. (हा विनोदाचा भाग आहे कारण ती नसेल तर हालही होतात. खाण्याचे वांधे होतात. 'पिण्या'चे होत नाही )

बदल्यांमुळे काही तोटे सूध्दा होतात.

१. सर्वच सामान हलविता येणे शक्य नसते त्यामुळे आर्थिक नुकसान होते.

२. मुलाबाळांची तारांबळ होते.

३. मुलगा, पत्नी, आपण असा वेगवेगळया घरासाठी अतोनात खर्च होतो.

४. पैशाची पुरेपूर वाट लागते.

५. प्रवास खर्च वाढतो.

६. नातेवाइकात त्यांचेकडे आपण जाणे टाळल्यास त्यांच्यात गैरसमज निर्माण होतात.

आता या अशा वारंवार बदल्यांमुळे बाळूला अनेक ठिकाणी प्रवास करण्याचा योग येत होता. त्यामुळे बाळूचा प्रवास या प्रकरणाकडे आपण वळणार आहोत. तूर्त येथे बदली प्रकरण थांबवितो.

*....................*..



# ३) बाळूचा प्रवास

असे म्हणतात की, ज्याचे हातावरील बोटावर शंख व चक्राचे प्रमाण पांच पांच असे असतात म्हणजेच ज्याचे दहा बोटापैकी पांच बोटावर चक्र असेल तर त्याला या जन्मात फार प्रवास करावा लागतो. या तत्वानुसार बाळूच्या बोटावर पांच चक्र असल्याने तो दहा वर्षाचा होता तेंव्हापासूनच त्यास लांब प्रवास करण्याचा योग येत असे. लहानपणीच त्याची निवड पब्लीक स्कूल शाळेमध्ये १९६७ च्या प्रथम स्पर्धा परीक्षेत झाल्याने व ही शासनाची विदर्भ विभागाची शाळा चिखलदरा या थंडहवेच्या ठिकाणी असल्याने, वयाच्या दहाव्या वर्षापासून वणी ते चिखलदरा असा जवळपास तीनशे किलोमीटरचा प्रवास त्याला एकटयालाच करावा लागत असे त्यामुळे त्याच्यात बालपणापासून उपजतच धीटपणा आला होता. यानंतर अनेकदा प्रवासाचे योग त्यास आल्याने तो विविध प्रकारच्या आठवणी कथन करीत असे.

असेच एकदा एका प्रकल्पावर रात्री बारा चे सूमारास तो व त्याचा बॉस म्हणजे मेकॅनिकल डिपार्टमेंटचे उपअभियंता साईटवर जात होते. त्यावेळच्या कार्यक्षेत्रावरील जीप उघडया पध्दतीच्या होत्या साइट अगदी जवळ म्हणजे केवळ दोन कि. मी. अंतरावर होती पण पहाडी वळणावरून उतरत जावे लागत असे. एवढया कमी अंतरातही जंगलचा भाग होता. अचानक वळणावर रात्री बारा वांजता एका बाईने लिफ्ट मागितली होती. रात्री बाई बघून साहेब घाबरले असावे पण बाळूने उगीचच ओळख नसतांना सूध्दा साइटवरची मजूर असेल असा तर्क केल्याने साहेबांनी तिला माणूसकीच्या नात्याने जीपमध्ये पाठीमागे बसवून घेतले. कार्यक्षेत्राजवळच असल्याने जीप क्षेत्राजवळ लवकर पोहोचली. कार्यक्षेत्रावर त्या वेळी रात्रंदिवस काम चालत असायचे. बोगदयाचे बांधकाम असल्याने बाहेर लाइटची फारशी व्यवस्था नव्हती. गाडी साईटवर पोहोचल्यावर त्या बाईला उतरविण्यासाठी, अंधुक प्रकाशात गाडी थांबविली होती. ही जीप साहेब स्वतः चालवीत असल्याने बाळू व साहेब पुढे बसले होते व मागे त्या बाईला बसविले होते. गाडी थांबवता क्षणीच मागे पहातो तर काय त्या सीटवर बाईच आढळली नाही.. साहेब रात्री बाराची वेळ असल्याने अतिशयच घाबरले... साहेबांना भूतखेताचा संशय आला पण बाळूचा भूंतखेतांवर अजिबात विश्वास नसल्याने त्याने साहेबास धीर दिला व तो म्हणाला बाइ मध्येच कमी वेग असतांना कदाचीत उतरली असावी, असे स्पष्टीकरण दिले पण या स्पष्टीकरणाचा साहेबांवर काही परीणाम झाला नाही.. ते म्हणाले काही असो.. काहीतरी वेगळाच प्रकार मला दिसतो आहे. मग त्यावर सखोल संशोधन म्हणून साहेब बाळूला त्या बाईच्या लुगडयाचा रंग विचारीत होते पण त्यानेही तेवढया रात्री काळजी पूर्वक त्या बाईकडे न पाहल्यामुळे तो निरूत्तर झाला होता. एकंदरीत दोघांनाही रात्री मात्र चांगलाच घाम फूटला होता

.....................

बाळू व त्याचा बॉस अकोल्यावरुन चिखलद-याकडे कार्यक्षेत्रावर जात होते अंतर दोनशे किलोमीटर असल्याने व प्रवास जीपचा असल्याने ड्रायव्हर साधारणपणे चहा साठी गाडी अंजनगांवला थांबवायचा. आजचा चहा मोठया हॉटेलमध्ये घेण्यापेक्षा टपरीवरच घेवू, असे साहेबांनीच ठरविले होते. एकतर चहा कॉफी टपरीवर स्वस्त मिळत असते हा एका उद्देश व दुसरा म्हणजे टपरीवर चहाचा आजकाल दर्जा सूध्दा चांगला असतो या उद्देशाने टपरीवाल्याला चहा सांगितला. टपरीवर सर्वांना बसण्याची व्यवस्था नसते त्यामुळे चहा उभ्यानेच घ्यायचे ठरले.. थंडीचे दिवस असल्याने बाळू व त्याचा बॉस रोडवर उन्हात चहासाठी तिष्ठत बसले. चहा आला.. बाळू टपरीवर चहा पिण्यात साहेबांच्या तुलनेत अनुभवीच होता .... त्याने कपाने चहा पिण्यास सूरूवात केले बॉसने मात्र उगीचच बशी मागितली साहेबांच्या एका हातावर बशी व दुस-या डाव्या हातावर कप.. डाव्या हाताने कपातील चहा बशीत ओतला... चहा गरम असल्याने साहेब बशीकडे पाहात बसले ...साहेबांची उंची जवळजवळ सहा फूट असल्याने त्यांचे हातावर ठेवलेली बशी पांच फुटावर होती.. व गप्पा सूरू होत्या... मागून एक वृध्द भिकारीन हळूच आली व साहेबांच्या तळहातावरची बशी अलगद उचलून चहा प्यायला लागली.. दृश्य असे की साहेबांच्या डाव्या हातात कप व वृध्द भिकारीनच्या उजव्या हातात बशी जणूकाही साहेब तीला चहाच पाजत आहे... साहेब चिडले.... हा कप तरी धर नां.. म्हणून ओरडले की मीच तूला चहा पाजू.... प्रसंग फार गमतीचा होता पण उपाय चालेना... चहा पिवून झाल्यावर ती बशी तिने किमान जमीनीवर खाली ठेवावे ही साहेबांची अपेक्षा होती पण ती बिचारी अडाणी ...तीला इतके डोके थोडेच होत? त्यामुळे ती बशी खाली न ठेवता परत साहेबांकडे दिली आता मात्र साहेबांचा पारा अतिशय वर म्हणजेच थर्मामिटरच्याही वर गेला होता.. साहेबांचा चेहरा लाल बुंद झाला होता .... बिचारा!

सारा राग त्या बाळूवर काढण्यात आला.. बाळूचा काहीही दोष नसतांना घडले्ला हा प्रसंग अनोखाच होता.. नाही कां ?

................................

या गरमागरमीत जीप पुढे परतवाडयाला गेली. परतवाडा ते चिखलदरा हा पंचावन्न कि. मी. चा प्रवास होता त्यामुळे जीपच्या चारही चाकामध्ये हवा भरून घ्यावी असे वाहन चालकाने साहेबास सूचविले गाडी हळूच एका पंचरच्या टपरीजवळ थांबविण्यात आली. ठरल्यानुसार चारही चाकात हवा रीतसर भरण्यात आली. पण साहेबांना मघाचा तो राग अजूनही काहीतरी विचार करण्यास भाग पाडत होता की काय बाळूस ते कळले नाही पण साहेबांनी अचानक त्या हवा

वाल्याला विचारले ...किती पैसे झाले .. तो म्हणाला.. चार रूपये... साहेब त्यास चार रूपये देण्याचेपूर्वी त्यास या चार रूपयाचे बील मागू लागले. पण त्या छोटयाशा दुकानदाराकडे बीलबुक कसे असणार...त्यामुळे तो म्हणाला मी बील देवू शकत नाही...माझे पैसे दया.... पण साहेबांनी बीलाचा आग्रहच धरला...अर्थात तेथे वाद झाला. साहेब म्हणाले हे सरकारी वाहन आहे तेंव्हा आम्ही याचे पैसे कां म्हणून दयावे...वाद वाढू नये या उद्देशाने बाळूने मध्यस्थी केली.. त्यामुळे पून्हा ते रागाचे खापर बाळूवरच पडले..... येथे साहेबांनी तत्वाचा प्रश्न उभा केला असल्याने पुढील प्रवास मात्र बाळूने शांतपणे करायचे ठरविले होतं. पण पुन्हा एक असाच प्रसंग घाटामध्ये आला.

वाहन घटांग या गावाजवळ पंचर झाले ...तेथे पंचरचे दुकान तर होते. पण कदाचीत अजूनही साहेबांचा राग शांत झाला किंवा नाही हे कळावयास मार्ग नसल्याने पंचर दुरूस्त होतपर्यंत बील देण्याच्या वेळेपूर्वी हा बाळू केंव्हाच नैसर्गिक कॉलच्या निमीत्ताने फार दूर पळून गेला होता...

असाच एक प्रवासातील प्रसंग.. प्रसंग हा बीभत्स आहे तेंव्हा जरा स्वतःला सांभाळा...परतवाडा ते चिखलदरा या केवळ ५५ किलोमीटरच्या प्रवासात सूरूवातीचे पांच किलोमीटर अंतर सोडल्यास उर्वरीत ५० किलोमीटरमध्ये जवळपास सहाशे मीटर म्हणजेच १९०० फूट उंचीवर चिखलद-याला जावे लागते. कमी अंतरात जास्तीत जास्त उंची गाठणारा हा महाराष्ट्रातला एकमेव घाट आहे. या घाटात बसने प्रवास करतांना एकदाचे चढतांना काही वाटणार नाही पण परतीच्या प्रवासात उतरतांना मात्र कितीही सुदृढ व्यक्ती असला तरी त्याची हालत खराब झाल्यावाचुन राहात नाही. या प्रवासामध्ये नेहमीचे प्रवासी घटांग हे गांव येतपर्यंत चांगले असतात. व घटांगनंतर केवळ १५ मिनीटात घाट संपणार असतो. परंतू या पंधरा मिनीटाच्या घाटात जास्तीत जास्त उंचीवरून खाली उतरावे लागते. म्हणजेच या पंधरा मिनीटाच्या घाटात जवळ जवळ सर्वांचे डोळे बंद असतात. व ज्यांनी निसर्ग सौंदर्य पाहण्याच्या उद्देशाने डोळे उघडे ठेवले असतील त्यांना नक्कीच गरगरल्यासारखे होते. व हा पंधरा मिनीटांचा काळ काय झटका देतो ते प्रत्यक्ष अनुभव घेतल्यानंतरच कळू शकते.

या बसने बाळू व त्याचा मित्र यांना नेहमीच बसने प्रवास करावा लागत असे कारण त्यांचे कार्यक्षेत्रच चिखलद-याला होते व प्रत्येक वेळी शासनाची जीप तेथ् जाण्यास उपलब्ध होत नव्हती. या प्रवासामध्ये आदिवासी व हा बाळूचा मित्र याशिवाय सहसा कोणी बोलत नसे. कारण सामान्य नवीन लोकांची तर घटांगपर्यंतच हालत खराब होत होती. व अशातही हया मित्राला अशी घाणेरडी सवय होती की तो या बीभत्स दृश्याचे वर्णन करीत असे. सर्व प्रथम चिखलद-याहून बस सूटली की, आलाडोह, टेटू, आमझरी, व घटांग या ठिकाणापर्यंत जर कोणी तग धरू शकला नाही तर बसमधील आदिवासी लोकं त्यांचे भाषेत म्हणायचे की गाडीचा मौसम बिघडला. बाळू लगेच डोळे बंद करायचा.. व पुढील प्रवास डोळयासमोर वेगळया घटना आणून करायचा ...त्याचे डोळे जरी

बंद असले तरी कान मात्र थोडेच बंद करता येतात. अशा वेळी त्याचा मित्र आवर्जून त्या बसमधील बीभत्स दृश्याचे वर्णन करायचा. लगेच दुसरा आदिवासी ओरडायचा.. अरे आता तर अर्ध्या गाडीचा मौसम खराब झाला. व याला दुजोरा हा कथीत मित्र दयायचा ...त्यामुळे काय होत होतं की जे प्रवासी बिचारे कसेतरी जीव मुठीत घेवून स्वतःला सांभाळायचे तर तेही त्यांना, या लोकांच्या कॉमेंटरीमुळे सांभाळता येत नव्हते.. जेथे इतरांना या घटनांचा राग यायचा ते ही मंडळी विनोदावर नेत होती.. त्यामुळे हे सर्व नंतर प्रवास आटोपल्यावर मात्र हया घटना बाळू इतरांना फावल्या वेळात सांगुन त्याच्या सर्व मित्रांना फार फार म्हणचे अक्षरशः पोट धरून हसवायचा..

....................

एकदा बाळूला गुजरात प्रदेशात वडोदरा येथे CWC Data आणावयास जायचे होते. अगदी वेळेवर जायचे असल्याने त्यास रेल्वेचे आरक्षण मिळाले नाही. प्रवास फार लांबचा असल्याने त्याचे एका केरळीयन मित्राने त्यास कसेबसे रेल्वे रिझर्वेशन काढून दिले. बाळू हा कोणताही प्रवास नेहमी बसनेच करायचा. कारण यास रेल्वे प्रवासाचा टाइम टेबल कधीच कळत नसे. या टाइम टेबल बद्दल तो नेहमी म्हणायचा ...कोणत्याही स्टेशनवर प्रथम अप व डावून मार्ग कसे ओळखायचे. काही गावात अप डावीकडे तर काही शहरात उजवीकडे, डाउनच्या बाबतीतही तसेच. बरं इतकंही करून ते समजा तुम्हास समजले तर तुम्हाला नेमके जेथे जायचे आहे ते गांव कोणत्याही ट्रेनवर लिहिलेले नसते.. बाळू नेहमी त्याचे केरळीयन मित्र श्रीकुमार यांना म्हणत असे .... काय रे.. तुमच्या केरळमध्ये गावाची नावे तरी साधी सिंपल ठेवायला काय हरकत होते. नांव काय तर येरनाकुलम, तिरूवनंतपूरम, चेन्नाई, बटन्नाई, येटचेट्टापल्ली, अट्टपिट्टलांबदूरंगायपिन्नम, असो बाळूला हे नेमके म्हणता येत नव्हते म्हणून तो काहीही म्हणायचा...व त्यास चिडवायचा....

तर त्यास एकदाचे या केरळ मित्राने वडोद-याच्या गाडीत बसवून दिले. प्रवासास रात्रीला सरूवात झाली पण बाळूला काही झोप येत नव्हती. तो अधून मधूनच उठून पहात असे की वडोदरा आले काय. जेंव्हा एका माणसाने चिडून विचारले की आपणास कोठे जायचे आहे तेंव्ह वडोदरा म्हटल्यावर तो फार चिडला व म्हटला.. निवांत झोपा ...उद्या दुपारी दोन वाजता तूम्हास उठवतो. असे म्हटल्यावर बाळू झोपला. या व्यक्तीवर भरोंसा ठेवून तो गाढ झोपल्यामुळे दुस-यादिवशी त्यास कळले की त्याचा बूट सायीस्कररीत्या कोणीतरी लांबविला होता. येतांना मात्र तो या भानगडीत पडलाच नाही व सरळ बसने आला. वडोद-याला त्याचे पूर्ण काम न झाल्याने त्यास सूरतला जायचे होते. तो वडोद-याच्या बस स्थानकावर गेला तर तेथे त्यास पुन्हा टाइमटेबल समजत नव्हता कारण की तेथील टाइमटेबल गुजराती भाषेमध्ये लिहिलेला होता. व बसवर असलेल्या पाटयासूध्दा गुजरातीतच आढळून आल्या. मग कसेबसे कोणाला तरी विचारावे म्हणून त्याने एका गुजराती माणसाशी संपर्क साधला तो या बाळूला असे सजेशन देवू लागला की तुम्ही

सरळ रेल्वेनेच कां जात नाही. त्याला या बाळूची रेल्वेची व्यथा थोडी न माहित होती. कसा बसा तो सूरतला आला होता.

सूरत ला बाळूने एक साडी घेण्याचा निर्णय घेंतला कारण त्याने ऐकले होते की सूरतला साडया स्वस्त मिळतात. बसस्टँडवरून फार दूर न जाता बाळूने जवळपासच एक दुकान शोधले व आपल्या लाडक्या बायकोसाठी मोठया प्रेमाने एक स्वस्तात स्वस्त अशी साडी घेतली. घरी आल्यावर त्यास कळले की या साडीची लांबी अपेक्षेपेक्षा फारच कमी भरली होती. बिचा-या बाळूच्या बायकोने ती प्रेमाचा आदर म्हणून ठिगळ लावून घातली. आता या सूरत ते अमरावती या प्रवासामध्ये ट्रॅव्हल्स मध्ये एक गमतीदार प्रसंग घडला तो सांगून हया प्रकरणास विराम देतो.

सूरत ते अमरावती हे अंतर बसच्या दृष्टीने अत्यंत लांब आहे. एवढे मोठे अंतर कापावयास बस ड्रायव्हरने बस दुपारी चार वाजता सूटल्यावर एकदम धुळे येंथेच पहाटे चार वाजता थांबविली होती. त्यामुळे बरेच प्रवासी तेथे उतरले व जेवण, नाश्ता, विधी वगैरे आटोपून बसमध्ये बसले. ज्यांचा प्रवास येथे संपला होता अर्थात ते येथे उतरले असावे. बाळूच्या बाजूने एक दोनची सीट होती तेथील खिडकीजवळचा प्रवासी एक सरदार होता तो त्या ठिकाणी उतरला असेल तर त्याचे खिडकीजवळ खाली एक रिकामी बॉटल एका प्रवाशाला आढळली. ती आकारावरून तरी मद्याची बॉटल वाटत होती व ते त्या शेजारी बसणा-या इसमाने ओळखली होती. त्या इसमास नवल वाटले की ही बॉटल सोडून हा प्रवासी कसा काय उतरला. हा इसम कदाचीत मद्य प्रेमी असेल तर त्यास बॉटलमध्ये काही तरी मद्यासारखे रंगाचे द्रव्य आढळून आले. त्यांनी ते बाळूस दाखविले व बाळूचे त्याबाबत सजेशन घेतले.. बाळू म्हणाला.. मी याबाबत अनभिज्ञ असल्याने काही सांगू शकत नाही परंतू मला असे वाटते की हे मद्य नसावे पण तो व्यक्ती मद्यप्रेमी असल्याने त्याने ती बॉटल स्वतःजवळ ठेवून घेतली. बाळू मनातल्या मनात हसत अमरावतीस पोहोचला. त्याने ही घटना माझेजवळ सांगितली पण मला यांत काहीच रहस्य जाणवले नाही.

तो परत मला दोन दिवसांनी भेंटला व मला म्हणाला काल परवाच्या घटनेतील रहस्य तुम्हास कळले काय.. मी म्हटले नाही... तो म्हटला मला ते माहित होते की त्या सरदारजीने ती बॉटल प्रवासामध्ये पूर्ण पिवून खाली केली होती व सूरतवरून निघाल्यापासून गाडी कोठेच न थांबल्यामुळे ती भरून सूध्दा ठेवली होती. आपल्या लक्षात आले असेलच बाळूला काय म्हणावयाचे आहे...

.................................

# ४) दगडूची इंग्रजी

दगड हा पृथ्वी तलावर आढळणारा घन पदार्थ आहे हे आपणास माहित असले तरी ते नेमके काय असते हे लेखक लोकांना सांगायची सवयच असते. त्या सवयीनुंसार आपणास सांगुन एक छोटासा विनोद निर्मीतीचा प्रयत्न केला आहे. पण मला ज्या दगडाचे वर्णन करावयाचे आहे तो या पृथ्वीवरचा दगड नसून या पासून तयार झालेले ते एक, चिखलदरा या कार्यक्षेत्रावरील मजूराचे नांव आहे कारण त्याचे नांव 'दगडू' असे होते. हा दगडू अगदी वैशिष्टपूर्ण स्वभावाचा होता असे म्हणावयास हरकत नाही. तो जरी आदिवासी भागातला असला तरी त्यास अधूनमधून इंग्रजी बोलण्याची हूक्की येत असे. तसे त्यास त्या चिखलदरा परिसरात कोण्या एका पाद्रयाने इंग्रजी शिकविले होते असे म्हणतात.

याने इंग्रजी शब्द वापरला की खरा इंग्रजीतील शब्द काय आहे याचा सोयिस्कर विसर पडत असे. एकदा त्याला विचारले – "काय रे तुझे इतरांशी पटत नाही काय ?"

तेंव्हा तो चटकन म्हणाला, "सर त्यांचे व माझे बजेटच जुळत नाही. मी म्हटले कां बरं ! कारण की मी केंव्हाही त्यांच्याशी कॉरसपॉन्डस केला की ते माझ्यापासून दूर पळतात."

"मग तुझे बायांशी कसे पटते?"

"त्याचं काय आहे सर मी प्रत्येक बाइच्या घरी जावू जावू कॉरसपॉन्डस करत असतो."

"बरं जा आता बाजारात जा. आणि भाजीचं घेवून ये."

"सर मी कशाने जावू?"

"पैदल किंवा दूचाकीने जा."

दूचाकी समजण्याएवढी मराठी त्यास येत नसल्यामुळे तो मला म्हणाला, "सर आपण सायकल असा साधा मराठी शब्द कां वापरत नाही?"

"बरं जा आता. सर शॉर्ट कटींगने जावू की टायर रोडने जावू?"

मी म्हटले "जा टायर रोडने जा नाहीतर टायगर रोडने जा पण भाजीचं आणं.."

"भाजीचं काय आणू ?"

“जे स्वस्त आहे ते घेवून ये या साईटवर आपल्याला इनकम नाही आउटगोंइंगच आहे.”

तो सर्वात स्वस्त भाजी म्हणजे नेहमी कोंबडीच आणायचा. तो गेल्यानंतर मात्र मी त्याने वापरलेल्या सर्व शब्दांचा अभ्यास करीत असे. तो टायर रोड नसून इंग्रजीतील टी ए आर, टार म्हणजे डांबर, टार रोड म्हणायचे असेल असा उगीच तर्क करीत होतो. कटींग म्हणजे आखूड रस्ता, जसे की आपण कटींग करतो म्हणजे केस आखूड करतो वगैरे, नानाप्रकारचे तर्क वितर्क तो मला करायला लावून माझ्या टाळक्यास विनाकारणच त्रास देत असे. टाळक्या ऐवजी मी डोके म्हटलेले नाही कारण त्याचे समोर मला नेहमी डोके नसल्याचाच भास होत असे. आता यात बिचा-या दगडूचा मला कधीच दोष वाटत नव्हता कारण सुशिक्षीत महिला सूध्दा कधीकधी ती पर्स मला परवडेबल नव्हती असेच म्हणतांना आढळते. वास्तविक एबल हा प्रत्यय इंग्रजीतला आहे तो मराठीला लावता येतो म्हणून काय लावत सुटायचे. व हे सोडा आपण मुलांना इंग्रजी शाळेमध्ये टाकतो. मग ती मुले बॅग भरतांना चक्क म्हणतात, कामाकामाची पुस्तके बॅगमध्ये भरतो व अनकामाची घरीच ठेवतो. मलाही सुरूवातीला इंग्रजी वाचनाची फार आवड होती त्यामुळे एखादे इंग्रजी वाक्य चूकून ओघाओघाने बॉस समोर वापरल्या गेले तर त्यांना उगीच वाटायचे की मी त्यांचे समोर शिष्टपणा करतो. तेंव्हापासनू शक्यतोंवर इंग्रजी बोलणे टाळतो. पण माझा दगडू मात्र माझ्याशी नेहमी इंग्रजी शब्दामध्येच बोलतो.

काय होतं की आपल्या भारतात काही शब्द इंग्रजीमध्ये म्हटले तर मग भाषेमध्ये काहीतरी प्रभाव टाकल्या सारखे वाटते. आता बघा ना... एकदा एका लग्नात मी गेलो. त्यांना वाटले असावे की ही व्यक्ती इंजिनिअर आहे मग हयांचे समोर इंग्रजी शब्द वापरायला काही हरकत नाही.. ती व्यक्ती माझ्याशी बोलतांना फार इंग्रजी शब्द वापरत होती. जसे की .... साहेब माझे वेडिंग लास्ट इयरला झाले ...आपण डावरी वगैरे घेतली नव्हती पण मुलगी फीप्टीन्थ शिकली होती .... वय तसे बिलो एजच होती...लवकरच आम्हाला डयुएट झाले त्यात एक बॉय झाला व दुसरी डॉटर मग मी सूध्दा त्यांना सजेशन दिले ...म्हटले एकाला वार्डबॉय करा व दुसरीला डॉक्टर करा. पण त्यास सजेशन न समजल्याने त्याने दोन्ही बाळास इंजेक्शन दयायला नेले. व मला दुस-या दिवशी म्हणाला, साहेब तुमच्या म्हणण्यानुसार मी बोथ मुलांना सजेशन देवून आणले. कसे काय दिले तर म्हणे ... फस्ट टाइम असल्याने मी डॉक्टर सडल्यानुसार पोरायले सबमीटच केले .... कां बरं.. गर्दी वगैरे होती की काय ...हो थोडी फार होती म्हणून स्टँडींगमध्ये उभाच होतो. नंबर कवा लागते याचा थांबून वेट करत होतो. डाक्टर वयखीचे होते नां ! मनीपैसा अजिबात लागला नाही. त्यानंतर काही दिवस तर मलाही तसेच बोलण्याची सवय लागली होती.

आता कशाला आमचे सर्वच कर्मचारी नेहमी म्हणतात गव्हमेंटचा जी. आर. , अर्न लिव्हची सूट्टी, भिंतीचे वाल कंपाऊंड वगैरे मग बिचा-या माझ्या दगडूचा काय दोष.

दगडूची इंग्रजी सोडा मला तर धड मराठी समजत नाही. मी विदर्भातला असल्याने नूकताच बदलून नाशिकला आलो प्रत्येक ऑटोवाल्यांना ऑटो ...ऑटो.. म्हणून थकलो पण एकही ऑटोवाला थांबत नव्हता. एक भला मनुष्य माझेजवळ आला म्हणाला साहेब. ऑटो ...ऑटो म्हणू नका रिक्शा.. रिक्शा म्हणा.. मी म्हटले रिक्शा कोठे आहे येथे. त्याने माझे डोळे न्याहाळून पाहले ...त्याला वाटले ...आंधळे आहेत की काय ...मी आंधळा नाही ही खात्री पटल्यावर ती व्यक्ती मला म्हणाली आपण असे कां बरे करीत आहात... मीच त्यांची व्यथा समजलो व म्हटले आमच्याकडे सायकल रिक्शाला रिक्शा म्हणतात म्हणून मी रिक्शा म्हटले नाही. तेंव्हा मला येथे सायकल रिक्शा नसल्याचा शोध लागला. त्यानंतर मला ब-याच शब्दांचा इकडे शोध लागला जसे की, फडा नव्हे शिरई, दुधाची चंदी नव्हे उकडा, देखावा मस्त नव्हे सुंदर, बाई नव्हे मावशी, भाजी एक पाव नव्हे पावशेर, आहे म्हणावयाचे नाही ...फक्त काय हे ! असेच म्हणावयाचे. बरे झाले मी दगडूला इकडे आणले नाही... मला तर वाटते या नोकरशाहीमध्ये माझ्यासारख्यांना असे लांब फेकायचे असल्यास त्या त्या प्रदेशाची नोकरशाहीत डिक्शनरी दयावयास हवी... अहो.. डिक्शनरी नाही ...शब्दकोश. टायटल सॉंग नाही शीर्षक गीत. अंगावर वाहन ठेपले नाही ...धडकले.. वगैरे..

आता थोडी जनसामान्याची इंग्रजी बघू. क्रीम नाही स्क्रीम, टाईल्स नाही स्टाईल, कंपाऊंड वाल नाही वाल कंपाऊंड, अनाउन्स नाही अलाउन्स, वेपर्स नाही पेपर्स मँगलोर टाइल्स नाही बेंगलोर कौलं, याशिवाय परवडेबल, सरेंडर लिव्ह च्या ऐवजी सलेंडर लिव्ह. बेस्ट झालं ऐवजी बेस झालं इत्यादी. म्हणजे आपण किती इंग्रजाळलेलो आहोत हे लक्षात येते. आता माझ्याच तर पुस्तकात बरेच इंग्रजी शब्द आहेत कारण मी ते मुद्दाम वापरले आहेत त्याशिवाय प्रभाव पडत नाही. स्वतःच्या भाषेतील शिव्यासूध्दा मृदू असतात पण हिंदी भाषेतील शिव्या कशा प्रभावी वाटतात, नाही कां? आता एक साधा प्रश्न तुम्हास विचारतो त्याचे उत्तर शोधून ठेवा तोपर्यंत पुढील प्रकरणाकडे वळू. सर्वांचीच मुले आजकाल कॉन्व्हेंटमध्ये शिकतात. तेंव्हा के. जी. १ व २ ला आपला मुलगा जातो. आता के. जी. म्हणजे काय? याचा खरा लॉंग फॉर्म काय? कृपया आपल्या मुलास विचारू नका. फक्त आपल्या मित्रांनाच विचारा.

भाषेची धन्य वाट !

...........................

# ५) नोकरशाहीत स्त्रियांचा प्रवेश

स्त्रिश्चरीत्रम् देवो न जानती कुतो मनुष्यः! असे शास्त्र वचन आहे. येथे चरीत्र याचा अर्थ चारित्र्य असा न घेता आपण चरीत्र म्हणजे स्त्रियांचा जीवन काळ असा घेणार आहोत. नोकरशाहीमध्ये स्त्रियांचा प्रवेश झाला ही त्यांचेसाठी व आपणा सर्वांना अतिशय आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. कारण अनादी काळापासून त्यांचेवर अन्याय झाल्याचे आपण पाहात आलो आहोत. या पुरूष प्रधान संस्कृतीला आता स्त्रि प्रधान संस्कृती व्हायला अगदी कमी अवकाश आहे. तेंव्हा पुढील काळात आपल्याशी सूध्दा अन्याय होण्याची शक्यता नाकारता येत नाही. व अशी शक्यता टाळणे असंभवनीय आहे. आता लोकसंख्येच्या नियमानुसार साधारणपणे एक हजार पुरूषांमागे ९४७स्त्रियां असतात असे मी कोठेतरी वाचले आहे. म्हणजेच एकास एक प्रमाण धरले तरी आपल्या पुरूषांपैकी किमान एक हजारामध्ये ५३ लोकांसाठी स्त्रि उपलब्ध नाही असे आकडेवारीवरून दिसते.

पूर्वीच्या काळात स्त्रिया सहसा नोकरी करीत नसत. पण आजकाल पुरूषांच्या ...कशाला काहीतरी लावून बराबरीने काम करतात असे म्हणतात. हं! आता आठवले. जरा वयोमानाने माझी स्मरण शक्ती थोडी कमी झाली आहे. वास्तविक आजकाल महागाई मुळे कांदयाला कांदाही लावता येत नाही पण या स्त्रिया पुरूषांच्या खांदयाला हिंमतीने खांदा लावून काम करीत असतात. ही आपणा सर्वांना अतिशय आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. तसा स्त्रि जाती विषयी जात हा शब्द सोडला तर अतिशय आदर आहे. कारण अजून जगायचे आहे नां!

'Every success is behind the woman. " असे म्हणतात. त्यामुळे शासनातच काय सर्वच क्षेत्रात स्त्रियांमुळे प्रगती संभवत आहे. आता नेमकं काय होतं.. या नोकरशाहीमध्ये ज्या ५३ लोकांकरीता स्त्रिया उपलब्ध नाही अशी मंडळी कार्यालयात स्त्रियांशी विनाकारणच परिचय वाढवितांना प्रयत्नात दिसून येतात. गूळ दिसला की मुंगळे तसे हे स्त्रियांभोवती घिरटया घालत असतांना दिसतात प्रयत्नांती परमेश्वर या उक्ती नूसार स्त्रियाची प्राप्ती होइल असा गोड आशावाद त्यांचेकडे पतिक्षेत असतो. अशा कर्मचा-यांना इंग्रजी भाषेमध्ये henpecked व मराठी मध्ये बाईलवेडा असे म्हणतात. नोकरशाहीतील एका बाईलवेडयाचे तर म्हणणे असे आहे की - तो म्हणतो मला तर या जगातील सर्वच स्त्रिया आवडतात.

अलिकडे कार्यालयात स्त्रियांचे प्रमाण फारच वाढले आहे. सर्वच क्षेत्रात स्त्रियांचे पदार्पण झाल्यामुळे एक प्रकारच्या नोकरशाहीतील कर्मचा-यांना धाकही निर्माण झाल्यासारखे वाटते आहे. जशा पुरूषांमध्ये व्यक्ती तितक्या प्रकृती आहेत तसेच स्त्रियांमध्येही

वेगवेगळया स्वभावाच्या प्रकृती असू शकतात असा अलिकडे कार्यालयात अनुभव येतो. या नोकरशाहीमध्ये कशा कशा प्रकारच्या स्त्रिया आढळतात हा संशोधनाचा भाग आहे तरी यापुढील घटना सर्व काल्पनिक समजून आनंद घ्यावा असे वाटते. १९७४ ते साधारणपणे १९८४-८५ पर्यंतचा काळ नोकरशाहीतील सर्व कर्मचारी स्त्रिया विरहीतच जगले असतील अशी माझी धारणा आहे. कारण त्या काळामध्ये या नोकरशाहीमध्ये तरी अतिशयच कमी स्त्रिया कार्यरत होत्या. त्यामुळे कर्मचा-यांना फारसा स्त्रिविषयक अनुभव नाही. पण जसे नाटक, सिनेमा व प्रत्यक्ष जीवन यांत जसे स्त्रि पात्राची आवश्यकता असते तसेच बिचा-या पुस्तकालाही स्त्रि पात्राची आवश्यकता असते त्यामुळे हे प्रकरण येथे मुद्दाम लिहीत आहे. व तशी सर्वांचीच आग्रहाची सुप्त इच्छा सूध्दा असते तेंव्हा या प्रकरणास मोठया सावधानीने सूरूवात करतो.

पुरूषांमध्ये ज्याप्रमाणे देव प्रवृत्तीची मंडळी असतात व राक्षस प्रवृत्तीचाही मंडळी असतात त्याचप्रमाणे स्त्रियामध्ये सूध्दा चांगल्या व वाईट स्त्रिया असण्याची संभावना असते. याबाबत मी एक अनुभव यापूर्वीच्या बॉस प्रकरणात अंतर्भूत केला आहे. लेखकाला त्याचे जीवनात एका कार्यालयामध्ये तेरा महिला असलेल्या आढळल्या आहेत. एक छोटे कार्यालय एका मोठया कार्यालयाच्या इमारतीमध्ये असल्यामुळे ही संख्या झाली होती. तेराही महिला तेरा प्रकारच्या होत्या हे काय वेगळे सांगावयास हवे.

सर्वसाधारणपणे सर्व कार्यालयातील संपूर्ण महिलांपैकी ८० टक्के महिला या ऑटो रिक्शाने ये जा करीत असतात. सर्व कार्यालये साधारणतः ४ ते ५ कि. मी. दूर असतात. १९८५ मध्ये रिक्शावाले या अंतराकरीता पांच रूपये प्रमाणे चार्ज आकारत असतात. पण आमच्या शासकीय महिलाना कार्यालयात ये जा करावी लागत असल्याने त्यांना पांच अधिक पांच बरोबर दहा रूपये हा खर्च रोजरोज परवडत नसे. त्यांच्या भाषेत हा खर्च परवडेबल नव्हता, म्हणून त्या काय करतात. स्वतःजवळ तीन रूपये चिल्लर ठेवतात. अशा प्रकारे रोजचे चार रूपये वाचवतात. म्हणजेच महिण्याला कार्यालयीन दिवसानुसार साधारण शंभर रूपये याप्रमाणे बाराशे रूपये वर्षाला, म्हणजेच ३५ वर्षाच्या सेवाकाळात एकूण ४२, ०००/- रूपये वाचवतात. या शिल्लक पैशाचा पतीदेवाला काहीही उपयोंग नसतो. याचा विनीयोग त्या सखी मंच, पाक प्रशिक्षण दागिणे, साडया व सौंदर्य प्रसाधने, निरनिराळया स्कीम्स किंवा नवीन नवीन आकर्षक जाहीरातीतील खर्चासाठी केला जातो. किंवा फारच काटकसरी महिला असेल तर ती त्या या पैशाचा संचय करते. व ४२, ०००/- रूपयामध्ये ज्या ज्या वेळी स्त्रियांना खर्च करायची इच्छा अनावर होते त्या त्या वेळी त्या मनसोक्त शॉपींग करतात. शॉपींग करतांना त्या एक गोष्ट मुळीच विसरत नाहीत. ती म्हणजे पतीदेवासाठी रूमाल किंवा बनियन आणण्याची.... म्हणजे केलेले शॉपींग नव-याला दाखविण्यासाठी उल्हासापोटी शिव्या खायला मिळू नये ...याकरीता या रूमालाची तरतूद अगोदरच केलेली असते. व सर्व प्रथम रूमाल दर्शन झाल्यानंतर इतर वस्तू पाहाव्या लागतात. चैनीच्या वस्तूमध्ये एखादी खादय पदार्थ बनविण्याची, आणलेली अनभिज्ञ वस्तू असते. जसे कस्टर्ड पावडर, सायट्रीक ॲसिड, ग्रेव्ही पॅकेज किंवा मिक्स लोणचे वगैरे वगैरे.. या पूर्ण वस्तूंचा उपयोग करून

एखादा मासिकात आलेला किंवा वर्णविलेला नवीन पदार्थ घरी तयार केला जातो. मग तो शास्त्रज्ञ ज्याप्रमाणे प्रथम प्रयोग उंदरावर करतात त्याचप्रमाणे तो तुमच्यावर केल्या जातो. कदाचीत ते मिक्स लोणच्यातही सडक्या मिरच्यामुळे जर पदार्थ खराब झाला तरी तो तुमच्याच तोंडघशी टाकल्या जातो. मग तुम्हाला अती उत्तम प्रमाणपत्र दिल्याशिवाय पर्याय नसतो ...घरात वाद वाढवायचा की काय ?.. शिल्लक राहिलेली वस्तू, पदार्थ दुस-या दिवशी कार्यालयातील कर्मचा-यांकरीता असतेच. तसेच वर्षभरात कोणताही सण असो. या महिला कर्मचारी मोठया प्रेमाने शासकीय कर्मचा-यांना त्या खावू घालातात.

अलिकडे तीळ हा पदार्थ फार महाग असल्यामुळे तीळाच्या लाडूऐवजी तीळाच्या, डांबर गोळीएवढया गोळया कार्यालयात वाटल्या जातात. त्याही परवडत नसल्यास तीळाची अल्पशर्करायुक्त भुकटी मार्केटमध्ये उपलब्ध असलेल्या अतिसूक्ष्म चमचाव्दारे वाटली जाते. याशिवाय इतर दिवशी बाहेर गावून दौ-यावर येणा-या कर्मचा-यांकरीता दुपारच्या लंचमधून उरलेल्या पोळया भाजी, अतिरीक्त चिवडा, वगैरे हा नित्य मेनू असतो. अति लाजाळू स्त्रिया इतर कर्मचा-यासाठी स्वतःच्या पैशाने फ्रेश चिवडा, चहा वगैरे सहकार्याने पाजतात. पुर्वी महिला चहा कार्यालयातच बोलवायच्या पण आजकाल पुरूषांप्रमाणे त्या कार्यालय परिसरातील हॉटेलमध्ये उन्हात उभ्या राहून चहा पितांना दिसतात. काही स्वतःला मॉडर्न समजणा-या स्त्रिया तर पान, आवळा सुपारी वगैरे खातांना आढळतात.

एका कार्यालयात एक कर्मचारी कार्यरत होता. तो नेहमी कोणतीही स्त्री कर्मचारी कार्यालयात प्रवेश करताच ‘ काय बाई, कसं काय ?’ एवढच म्हणायचा. बाई म्हणायच्या – ‘काही नाही बॉ !’ बस या दोघांचं बोलणं.. एवढच. मग ते आपापल्या कामात लागायचे. परत दुस-या दिवशी तेच. ‘ !

काय बाई, कसं काय ? एवढच म्हणायचा. बाई म्हणायच्या - काही नाही बॉ. परत तिस-या दिवशी तेच. !

काय बाई, कसं काय ? एवढच म्हणायचा. बाई म्हणायच्या - काही नाही बॉ असे करीत करीत ते उभयता कार्यालयीन दिवस घालवित होते.

एक दिवस त्या कर्मचा-याला काही विशेष असे बोलायची ईच्छा झाली व ते साहजिकच आहे. कारण किती दिवस हे वाक्य पूरणार. काही प्रगती झाली पाहिजे की नाही...पण त्यानुसार त्याने त्या महिलेशी विशेष असे बोलायचे ठरविले. कथीत महिलेचा प्रवेश कार्यालयात झाला...तत्पूर्वी महिलेच्या व्यक्तीमत्वाच्या फ्लॅश बॅक कडे जावू. महिला साधारण पणे ५६ वर्षाची होती पण तिच्या गोरेपणामुळे व शारिरीक मेंटेनन्समुळे ती दिसायला नक्कीच सुंदर होती. बांधा अगदी ठेंगणा.. एवढा ठेंगणा की ती टेबलच्या मागे खूर्चीवर उभी असली तर ती इकडनं पाहणा-यांना बसली आहे असे वाटत असे. व बसली असली तर उभी आहे असे वाटायचे. साडी अतिशयच कॉस्टली व सुगंधी द्रव्ययुक्त, सतत विष्णू पावडर (Snow Powder) लावलेली, रंग

अतिशय गोारा, कांती अगदी नितळ, चेह-यावर एकही सूरकूती नाही,.. वगैरे वगैरे.... तर अशा या महिलेला मघाचा कर्मचारी आज काही तरी विशेष असे बोलणार होता.

तीचे अजून एक वैशिष्य असे की ती बोलतांना नेहमी हातवारे अशा प्रकारे फिरवायची की जणू काही ती डान्सच करीत आहे... तर त्या महिलेस आमचा हा गडी म्हणाला. पहिले नेहमी प्रमाणे - काय बाई, कसं काय ? बाई म्हणाल्या - काही नाही बॉ लगेच याने संभाषण वाढविण्याचा प्रयत्न केला. तत्पूर्वी त्याचे मनास असे वाटले होते की इतक्या दिवसाचे परिश्रम आज नक्कीच फळास येणार. म्हणून मोठया आत्मविश्वासाने हे वाक्य फेकले - बाई आज तूम्ही खरचं फार सुंदर दिसत आहात. ! आणि त्या विशेष दिवशी खरचं सुंदर दिसतही होत्या ही सत्य बाब होती. अहो वास्तविक देवाला सूध्दा त्याची स्तूती केलेली आवडत नाही काय.. पण आज जरा उलटच झाले होते.... त्यांना या पर्टीकुलर व्यक्तीचा अतिशय राग आला व एकदम त्यानी रागाचे भरात त्यांची सुंदर दंतपंक्ती असलेली कवळीच बाहेर काढली व म्हणाल्या हे घ्या माझी सुंदरता. ती कार्यालयात सर्वांना अगदी ओरिजीनल म्हातारी वाटायला लागली. आमचा चपराशी एकदम जोरात हसला व माझ्याकडे पाहून म्हणाला सर मला आधिच माहित होतं की या कर्मचा-याची एक दिवस अशी फजीती होणार होती. पण मी गूपचूप बसलो. कारण मला वाटले एक दिवस ‘सत्यम् शिवम् सुंदरम् ‘ होणारच आहे. अशी आमची गंमतीदार कर्मचारी मंडळी.

या स्त्रीयांचा अभ्यास करणे अतिशयच कठीण काम आहे पण आमच्या एका मित्राचा या बाबतीत फार अभ्यास होता. त्याचे पुढील अंदाज व ठोकताळे बघा.

१. हातात प्लॅस्टीक पिशवी, पायात रबरी चप्पल, डोक्याच्या पाठीमागे लाल फूल, व दोनशे रूपयापर्यंत घेतलेली पातळ साडी असेल व जी थोडी ठुमकत चालत असेल तर समजावे ती कोणाच्या तरी घरी काम करणारी बाई आहे किवा भांडेवाली आहे.

२. हातात चांगली पिशवी, मध्यम उंचीची चप्पल, चारशे रूपयापर्यंत साडी, व भाजीबाजारात आधी टमाटर व नंतर आलू पिशवीत टाकत असेल तर तीला पदवीधर बाई समजावे.

३. स्लीव्ह लेस घातलेली, पाठीमागे मोठा गळा शिवलेली, फार उंच टाच्याची चप्पल, व लिपस्टीक वगैरे लावून दिसत असेल तर समजावे श्रीमंत घरची मॅडम..

४. लुगडं घातलेली, चेह-यावर सूरकूत्या असलेली, मनात दुःखी भाव व भिरभिरत्या नजरेने इकडं तिकडं, केवीलवाण्याप्रमाणे पाहाणारी, हातात साधारण पिशवी, असलेली ती आपली आई.

५. चोरटया नजरेने, बगिच्याचे कोप-यात कोण्या दुस-याशी वार्तालाप करीत दिसणारी ती आपली मैत्रीण.

६. कोणाचीही लिफ्ट न घेता, रस्त्यात सोज्वळपणे वाट पहात असलेली ती आपली बहीण.

७. कार्यालयीन वेळात, घरून निघून, मोजके पैसे घेवून, जास्तीत जास्त वस्तू घेण्याकरीता व घाइघाईने लगेच परत येण्यास निघालेली महिला म्हणजे आपली बायको.

८. फुकटचा सिनेमा बघण्यास, आपणास कार्यालयीन वेळात कॉल करणारी व सिनेमाजवळ वाट पाहाणारी, ती आपली मेव्हणी. असे कितीतरी अंदाज त्याने ठरविले होते पण मी या मतांशी सहमत नाही. हे केवळ मनोरंजनाच्या हेतूनू कथन केले आहे.

नोकरशाही सरकारी असो वा प्रायव्हेट, सर्व महिलांनी, काही तुरळक सोडल्यातर पुरूषांच्या तुलनेत जास्त काम करतांना आढळतात. त्या बुध्दीनेही कुशाग्र असतात. अशा कार्यमग्न स्त्रियांना व इतर कर्मचारी वर्गाला मध्ये मध्ये त्रस्त करणारा एक प्राणी प्रत्येक कार्यालयात, किमान दिवसातून तीन वेळा प्रवेश करतांना आढळतो. आणि तो प्राणी म्हणजे कार्यालयात ‘विक्रेत्यांचा प्रवेश ‘.. सर्व प्रकारचा किराणा, साडया, बांगडया, कपडे, चादरी, स्टेशनरी, देवपूजा साहित्य, गिफ्ट्स इत्यादी वस्तू कार्यालयपोच या विक्रेत्यामार्फत मिळण्याची सोय उपलब्ध असते. ही विक्रेते मद्रास, बंगलोर, दिल्ली, कलकत्ता येथून आलेली असतात व त्यांची भाषा आपल्याला न समजणारी असते. त्यांच्यात कर्मचा-यांना पटविण्याची शैली असते. याशिवाय ज्योंतिष्य, जडीबूटी, मंजन, अगरबत्ती, विशेष प्रकारचे तेल अशा वस्तू विकणारे सूध्दा असतात. या अनभिज्ञ भेंट देणा-या व्यक्तीमध्ये काही नागासाधू, रूषी मुनी म्हणवणारे लोकं सूध्दा असतात. अशा प्रकारची मंडळी विशेषतः शासकीय कार्यालयामध्ये विना परवानगीनेच प्रवेश करीत असतात. वास्तविक प्रत्येक कार्यालयात ‘बाहेरील व्यक्तींनी प्रवेश करू नये ‘असे लिहिले असूनही ही मंडळी दिवसातून चार पांच वेळा आलेली आढळते. इतकेच नव्हे तर या मंडळी जवळ मंत्री, खासदार, कार्यकारी अभियंता अशा उच्च पदाधिका-यांचे प्रमाणपत्र ही त्यांचे समवेत घेतलेल्या फोटोसह उपलब्ध असतात. प्रवेश करू नये ही पाटी पाहून एकदाचा कुत्रा सूध्दा शासकीय कार्यालयात सहसा प्रवेश करतांना आढळत नाही पण ही मंडळी, अशा प्रमाणपत्रामुळे बिनधास्त प्रवेश करतात. अशी मंडळी प्रवेश घेण्याकरीता शिपायांना अल्पभेंट वस्तू फूकटात देवून त्यांना पटवितात. किंवा फुकटात भविष्य सांगतात. या सर्वांवर भाळणारा व यांचे शब्दजाळात फसणारी पहिली व्यक्ती कोण तर ती म्हणजे आमची शासकीय महिला मंडळी.... कारण सा-या दुनियाची गरज यांनाच भासते. असे जाणवते. या नोकरशाहीतील स्त्रियांना हे विक्रेते कसे फसवितात हे बघू.

एक मद्रासी, चादर विकणारा विक्रेता, एकदा कार्यालयात आला. त्याचे जवळ हातावर चारपांच चादरी दिसत होत्या. विशेषतः महिलांना त्या पसंत पडल्या... भाव ठरला. ४५ रूपयास एक.. पण एकदम सहा चादरी घेत असाल तर १५० रूपयाला सहा. ब-याच घासाघाशी नंतर एका महिलेला लोभ सूटला. तिने सहाही चादरी घेण्याचा निर्णय घेतला. सौदा झाला ... पैसे दिले ...व तो नेहमीप्रमाणे गायब झाला. उघडून पाहतो तर काय त्यात दोनच चादरी होत्या . कारण त्याने त्याचे हातावर अशा पध्दतीने चादरीची घडी केली होती की, ती दोन चादरीऐवजी सहा चादरी असल्याची दिसत होंती... चर्चा होत पर्यंत तर तो व्यक्ती कोठच्या कोठे पळून गेला होता. त्या महिलेला दोन चादरी चक्क १५० रूपयाला पडल्या.

तसेच एकदा बांगडया विकणा-याने ४० रूपयात २ याप्रमाणे जवळ जवळ सहा महिलांना नगदी बांगडया विकल्या पण आमच्या एका शिपाई महिलेने त्या उधारीत घेतल्या. पण त्याची नगदी विक्री जास्त झाली असल्याने तो पुन्हा त्या कार्यालयाकडे भटकलाच नाही. या घटनेत शिपाई महिला मात्र अतिशय खूष झालेली दिसत होती.

अशा कितीतरी घटना महिलांच्या बाबतीत कार्यालयातील नोकरशाहीमध्ये घडत असतात. इतकेच नव्हे तर घरगूती महिलांना सूध्दा फसविलेल्या घटना कमी नाहीत पण ही महिला मंडळी केंव्हा सुधारेल हे काही सांगता यायचे नाही. बहुतांश महिला या असुरक्षित जीवन जगत असल्याने त्या नेहमी भावनेच्या आहारी जात असतात. त्यामुळे त्यांना भिकारी, ज्योतिष्यवाले, नागासाधू, तांत्रिक मांत्रिक ही सर्व मंडळी नेहमीच फसवित असतात. आज आपण संगणक युगात वावरतो आहे व विज्ञानाची प्रचंड प्रगती झाली आहे तरी सुध्दा आपले मानसिक परिवर्तन पुरेसे झाल्याचे आढळून येत नाही. अजूनही देवाच्या नावाने प्रचंड पैशाची लूट होतांना दिसून येते. जेथे पैसा कमावणे अत्यंत कठीण आहे तेथे ही फसवेगिरी चालूच असते. आपण अजूनही Conservative mind चे कां आहोत याचे प्रती क्षण आश्चर्य वाटते. ईश्वराकडेही आपण आपल्या डोळस वृत्तीने बघितल्यास आपला विकास निश्चीतच होवू शकेल असे वाटते.

या नोकरशाहीमध्ये पुरूष जसे विविध प्रकारचे आढळतात त्याच प्रमाणे कुत्सीत बुध्दी वापरणा-या महिला सूध्दा कमी नाहीत. पुरूषांप्रमाणे त्या सूध्दा पैशाच्या लोभापायी आपल्याच कार्यालयातील कर्मचा-यांच्या बाबतीत अडवणूकीचे धोरण अवलंबितांना दिसतात. या महिलांमधील विशेष गुंण म्हणजे.. कार्यालयातील सरळ होणारी कामे हेतुपूरस्सर अडविणे, कोणावरही विनाकारण आळ घेवून त्याचा बदला काढणे, उगीचच वरीष्ठांचा राग मनात धरून ठेवणे, घरच्यासारखे साध्या साध्या बाबींना रडणे, रूसणे, फुगणे इत्यादी स्वभाव गुणधर्म या नोकरशाहीत नोकरी करतांना दर्शवितात. अशा गुणांमुळे कार्यालयातील कर्मचारी उगीचच दबदब्याने व धाक बाळगून काम करतांना आढळतात. अलिकडे तर तहसीलदार, कलेक्टर, सचिव, क्लास वन अधिकारी महापौर इत्यादी महापदावर काम करतांना जर अशा वैयक्तीक स्वभावाची परिछाया

नोकरशाहीमध्ये आढळून आली तर शासन विकास कुंठीत होवू शकतो एवढयासाठीच या प्रकरणाचा शब्द प्रपंच मी केला आहे. आजकाल महिला सूध्दा सरकारी कामकाजामध्ये भ्रष्टाचारात भाग घ्यायला मागे पुढे पाहत नाही. ही अत्यंत शोकांतीका आहे असे मला दुःखाने म्हणावेसे वाटते.

एकदा नोकरशाहीतला 'नोनू' (नोनू म्हणजे प्रत्येक कामाला नो नो म्हणणारा कर्मचारी) अचानक बिमार पडला. त्याचे बिमारीचे कारणही फार विचीत्र होते. हा जरी कार्यालयात काम करीत नसला तरी मात्र देवपूजा फार करायचा. जणू काही असे वाटायचे की हा देवाला असे म्हणत असावा- की, हे देवा मला फक्त नोकरीत अजून सहा वर्षे घालवायची आहेत तेंव्हा कृपया मला कोणतेच काम येवू देवू नका. तर हा एके दिवशी देवीच्या दर्शनाकरीता गेला. उन्हाळा असल्याने तेथेच हवा खात बसला. संध्याकाळ झाली असल्याने त्यास एक मच्छर चावला. **...**घरी येतो तर काय **...**एकदम ताप **...**ताप उतरायचे नांव नाही. बरं हा आयुष्यात कधीच बिमार पडला नव्हता **...**कंजूषपणामुळे याने स्वतःजवळची जडीबुटी घेवून पाहली पण.. व्यर्थ. झाले अचानक यास दवाखाण्यात भरती करावे लागले. तब्बल आठ दिवसानंतर हयाची तब्येत चांगली झाली पण डॉक्टरने यास दोन महिणे आराम करण्यास सांगितले. त्यामुळे दोन महिण्याची नोनू ने सूट्टी उपभोगली**....** जेंव्हा तो कार्यालयात जॉईन झाला तेंव्हा त्यास सूट्टीचे पैसे मिळाले नाही... कारण सूट्टी मंजूर झाली नव्हती.. एव्हाना त्याचा ३५, ०००/- रूपये एवढा खर्च होवून गेला होता. व पगार मात्र झाला नसल्याने साहाजिकच यास अडचण होती. सूट्टी तीस दिवसाचे वर असल्याने मंडळ कार्यालयाकडे अर्ज पाठविण्यात आला होता.

मंडळ कार्यालयात एक खडूस बाई होती. ती दिसायला सुंदर नसल्यामुळे अशा प्रकारची वर्तणूक इतरांसाठी दर्शवित असे... व अशा ही अडचणीत आमच्या नोनू ची बदली फार दूर झाली.. याचे बिमार अवस्थेमुळे याने बदली रद्द साठी अर्ज केला पण तो सूध्दा या बाई मुळे मंडळ कार्यालयाचे वर पाठविण्यात आला नाही... शेवटी जे व्हायचे जे झाले. पण शेवटपर्यंत याला या बाईमुळे त्रास झाला. ही घटना त्याने मला जेंव्हा सांगितली तेंव्हा मी त्यास खालील मंत्र पाठ करण्यास सांगितले. अशा या नोकरशाहीतील महिला सूध्दा**....**

या महिला सर्व भूतेषू, पैसा रूपेण संस्थितः !

नमस्तसैही, नमस्तसैही, नमस्तसैही, नमोनमः !!

**................................**

# ६) मोबाइलचा वापर

अत्याधुनिक काळातील मोबाइल हे यंत्र सर्वांना परिचीतच आहे. कारण आपल्या भारतात सध्या तरी ४० कोटी लोकांजवळ मोबाइल आहे. असे मी कोठेतरी वाचले आहे. मानवी गरजांमुळे मोबाइलची निर्मीती झाली असावी असे वाटते पण आज तरी मोबाइलमुळे लोकांच्या गरजा त्यांनी फारच वाढवून घेतल्या आहे असे कधी कधी वाटते. आजकाल तर ज्यांना मोबाइलची आवश्यकता नाही त्यांच्याकडे सूध्दा मोबाइल आढळून येतात कारण तो मल्टीफंक्शनल असतो. आंबट शौकीनांना तर हे मोबाइल वापरणे म्हणजे एक प्रकारचे वरदानच आहे. हे यंत्र नेमके कोणी घ्यावे याला आजतरी काही निकष लावणे योग्य होणार नाही. जर श्रीमंतानेच हे यंत्र घ्यावे तर बिचारे गरीब वर्ग म्हणतात.. आम्ही काय घोडे मारले आहे की आमच्या जवळ मोबाइल नको. जाऊ दया.. घ्या बाबा.. तुम्हीही मोबाइल घ्या. म्हणजे आजकाल हे यंत्र असणे म्हणजे एक प्रकारचे स्टेटस झाले आहे असे म्हणावयास हरकत नाही. पूर्वी लँडलाइन फोन घ्यावयाचा असला तर किमान सहा महिणे तरी वाट पहावी लागत असे पण आज परिस्थिती बदलली आहे

..........

मनात विचार आला तरी मोबाइल कंपन्या तुमच्या दाराशी उभ्या असलेल्या आढळतात. हीच परिस्थीती कारच्या बाबतीतही आहे.. जाहीरात पाहून एक एस एम एस जरी आपण कंपन्यांना केला तर त्याचा माणूस तुमच्याकडे कार घेवूनच घरी येतो व तुमच्या मुलाबाळांना व बायकोला एक फुकटात चक्कर सूध्दा मारून आणतो मग तो घरच्या मंडळीचा आनंद, तुम्हास भोवलाच म्हणुन समजा. कारण तुमच्या जवळ पैसा आहे किंवा नाही याची तुम्हास काळजी करावी लागत नाही त्या कंपनीच्या माणसाने त्याचे सोबत पाठीमागे एक अशी व्यक्ती आणली असते की ती तुम्हास पूर्ण फायनान्स दयावयास तयार असते. म्हणजे थोडक्यात समजा तुम्हास नॅनो कार घ्यावयाची आहे तर तुम्हास एकही पैशाची आजतरी आवश्यकता नाही. मला तर वाटते की या कंपन्या काही दिवसांनी तुम्हास फुकट वस्तू देतील की काय? असेच आज मोबाइलच्या बाबतीत झाले आहे. बरं. स्वस्तात स्वस्त म्हणजे किमान सातशे रूपयाला सूध्दा मोबाइल मिळू शकतो. याबाबतीत मला २००३ चा प्रसंग आठवतो. धीरूभाई अंबानीने केवळ पांचशे रूपयामध्ये सातहजार किंमतींचे मोबाइल सर्वांना किस्तीने वाटले. त्यामुळे जवळ जवळ

सर्वांनीच त्या काळात रिलायन्सचे मोबाइल घेतले होते. त्यावेळी मी सूध्दा त्यात बळी म्हणून सहभागी झालो होतो. मला मोबाइलवर इंटरनेटचा भारी शौक. त्याकाळी मला बाराशे ते सोळाशे असे मोबाइलचे बील यायचे. पण कर लो दुनिया मुठ्ठीमे या उक्तीनुसार मी त्या बिलाबाबत फारशी कोणाशी चर्चा करीत नसे व ही गोष्ट आवर्जून बायकोपासून तर नक्कीच लपवून ठेवायचो. नाही तर मला या बिलासाठी जाम शिव्या खाव्या लागल्या असत्या याची मला पूर्ण कल्पना होती.

एकदा मी असाच मोबाइल बिल भरण्यास गेलो.. एक व्यक्ती माझेजवळ अगदी केविलवाणा चेहरा करून उभी होती.. अंगात साधा सदरा.. पैजामा मळका.. पायात रबरी स्लीपर.. एकंदरीत तो रिक्शावाला असावा असे मला वाटले व लगेच पृच्छा केल्यावर माझा अंदाज खरा सूध्दा निघाला.. त्या व्यक्तीने मला पूर्णपणे व्यवस्थित न्याहाळले व म्हटले.. साहेब आपले बील किती आहे... मी म्हटले ...बाराशे रूपये ...त्यांनी त्याचे बील माझ्याकडे दिले व मला त्याचे बिलाविषयी विचारले व म्हणाला सर माझे बील किती आहे.. मी म्हटले.. तुझे बील तर अठराशे रूपये आहे.. तो आश्चर्याने माझ्याकडे पाहू लागला. फोन तर मी वापरलाच नाही मग बील एवढे कसे काय. मी म्हटले फोन कोठे होता.. तो म्हणाला.. घरी.. हं कधी कधी माझी बायको अंगणात बसून बराच वेळ तिच्या घरी बोलतांना दिसत असे.. त्या गरीबाला इनकमींग व आऊटगोइंग अशा कोणत्याच भानगडीची जाणीव नसल्याने हा असा प्रकार घडला होता.. बरं फोन बील भरल्याशिवाय बंद करता येत नव्हता. मी त्यास काही मदत करुन त्याचा फोन बंद करून दिला. अशी ही मोबाइलची गंमत आहे.

पूर्वीच्या काळामध्ये देव, देवतांना किंवा देवींना एक विशीष्ट असे वाहन असायचे. जर त्या काळी मोबाइल असते तर ब्रम्हदेवाचा ब्लॅकबेरी, विष्णूचा नोकीया एन ८, महादेवाचा एचटीसी स्मार्टफोन, देवींना सॅमसंग गॅलक्झी वगैरे व आपल्यासारख्या सामान्य माणसाजवळ बेसिक फोन उपलब्ध असते. त्यामुळे देवांचा पुष्पक वाहनाचा खर्च वाचला असता किंवा बिचा-या मुषकाला त्रास झाला नसता. सर्व देवांनी स्वर्गातुन पृथ्वी वर मोबाइलनेच संपर्क केला असता. व आपण पृथ्वीतलावरच्या माणसांनी देवांनी सांगितलेले वेद वांग्मय मोबाइलवरच रेकॉर्ड केले असते.

सध्या नोकरशाहीमध्ये या मोबाइल व वाहनांचा एवढा सूळसूळाट झाला आहे की, अनेक लोकांच्या कानात मोबाइलचा वायरयुक्त स्पीकर व हातात वाहने दिसतात. ही वाहने रस्त्यावरून उंदरासारखी एकसारखी इकडुन तिकडे पळतांना दिसतात पण वैशिष्टय असे की उंदीर कितीही जोरात पळत असले तरी त्यांचा अपघात कधीच होत नसतो मात्र माणसे वाहने घेऊन पळतांना अपघात फार होतांना दिसून येतात याचे कारण माझ्या मते.. माणसाला डोके असते पण ..... बुध्दी नसते म्हणून.. यात त्याचाही काही दोष नाही म्हणा ...कारण आपल्या डोक्यात असंख्य विचाराच्या लाटा नदीच्या प्रवाहाप्रमाणे सारख्या वाहात असतात.

मोबाइल आल्यापासून सरकारी कामकाजामध्ये चपराश्याचे काम अतिशय कमी झाले आहे. यामुळे सरकारी नोकर सुटीच्या दिवशी पाखाण्यात जरी विरंगुळा करीत बसला असेल तर तेथेही त्याला साहेबांचा त्याचे मोबाइलवर कॉल येतो. मग याला अगोदरच आलेला हा नैसर्गिक कॉल दुस-याकडे डायव्हर्ट करता येत नसल्यामुळे हा नैसर्गिक कॉल तात्पुरता स्थगीत करावा लागतो याच कारणासाठी इंग्रजीमध्ये असे म्हणतात की, Whenever you are at Bathroom, the bell rings. त्याचप्रमाणे असे कॉल्स अवेळी येत असतात. , बरं कां ! मोबाइलवर कॉलच येतात असेही काही नाही ती दिवसभर जाहीरातीही आपणास बोअर करीत असतात. कधी कधी तर असे वाटते की, या अशा वस्तूं माणसांसाठी आहेत की आपण वस्तूसाठी जन्म घेत आहोत. विज्ञानाची प्रगती तर एवढी झाली आहे की, असे म्हणतात १९४० मध्ये ज्या लोकांनी जशा कल्पना केल्या होत्या तशाच वस्तू तब्बल तीस वर्षांनी म्हणजे १९७० मध्ये त्या तशाच्या तशा संशोधीत होवून मानवाच्या हाती पडल्या आहेत. त्यामुळे या मोबाइलविषयी माझी एक अशी कल्पना आहे की, काही दिवसांनी या नॅनो टेक्नॉलॉजीमुळे कदाचीत पुढच्या दहा वर्षात हा मोबाइल माणसाच्या कान व तोंड यांचे दरम्यान कोठेतरी ऑपरेशन करून आंतच बसविल्या जाईन व तो सोलर सेलवर जर चालला तर सोलरसेलची प्लेट सोयीस्कर रित्या मानवाच्या कपाळावर बसविल्या जाईन.

असे हे यंत्र सध्या घरात काम करणा-या मोलकरणीपासून तर देशाच्या पंतप्रधानापर्यंत वापरल्या जात आहे. पूर्वी घडयाळाला चुण्याची डबी असे म्हणत असत, तेंव्हा आता मोबाइलला काय पावडरचा डबा म्हणावं की, तेलाची शिशी हेच कळत नाही. तर अशा हया मोबाइलमध्ये आजकाल नुसता कॉलच नसून रेडिओ, एमपी ३, व्हीडीओ कॅमेरे, इंटरनेट, संगणकासारखे फंक्शन्स उपलब्ध असतात. त्यामुळे याच्या चांगल्या उपयोगापेक्षाही याचे भयानक दुरूपयोग दिसून येतात त्याविषयी थोडक्यात पाहू.

मोबाईलचे कॉल्स नेमके लघवी करतांना, रात्री बायकोच्या जवळ असतांना, गाढ झोपेत, किंवा नको त्या जागी आवर्जून येत असतात. बरं हा कॉल न उचलावे तर त्या कॉल न करणा-या व्यक्तीला एवढेही समजत नाही की समोरील मनुष्य कदाचीत कोणत्या महत्वाच्या प्रायव्हेट कामात असू शकते.. नाही तो जणू काही त्याचेवर एका सेकंदानंतर स्कॉयलॅब कोसळणार आहे याप्रमाणे तो सेकंदाचीही उसंत जावू न देता लगेच दुसराही कॉल करीत असतो. आता याला काय म्हणावे. कधी कधी तर तो मिसकॉल असतो याची गंमत पुढे येणारच आहे.

आमच्या नोकरशाहीमध्ये तर कॉल न उचल्यास वरीष्ठांना फार नाराजी येत असते व उचलला तर खरपूस शिव्या मिळतात अशी द्वीधा परिस्थती होते. आता कार्यालयात काम करीत असतांना जो नेहमी रिकामा असतो तो नक्कीच एफ एम रेडिओ लावीत असतो. एफ एम चे वैशिष्टय आपणास माहितच आहे. यात गाणी कमी व अनाउन्सरचे संभाषण अधिक असते. त्यामुळे संभाषणापेक्षा जाहिराती ब-या असे बरेचदा वाटते. याबाबतीत माझा रेल्वेचा अनुभव तर

असा आहे की, रेल्वे प्रवासात नेहमी आपल्याला नको असणारे किंवा अजिबात न आवडणारे गाणे कित्येकदा फार मोठया आवाजात ऐकावे लागते. कारण प्रवाशाच्या चायना मेड मोबाइलचा आवाज एवढा मोठा असतो की त्या मोबाइलचा कमीतकमी आवाजच जास्तीतजास्त असतो. त्यामुळे त्या विशीष्ट प्रवाशास तुम्ही काहीच म्हणू शकत नाही. तसेही तुम्ही त्या प्रवाशास आवाज कमी कर अशी म्हणण्याची हिंमत करू शकत नाही याचे मुख्य कारण असे की त्या प्रवाशाचा एकंदर हूलिया असा असतो.... सहा फूट उंची...तीन फूट रूंद बॉडी...पूर्ण काळी दाढी .... व काळा कभीन्न चेहरा...आणि लाल लाल डोळे .... मग होइल तुमची हिंमत त्याला आवाज कमी कर म्हणण्याची. कारण तो तुमच्या कानातच काय कानाखाली सुध्दा, त्याचे मर्जीनुसार केंव्हाही वाजवू शकतो.

आजकाल तर सर्व महिलांकडेही मोबाइल असल्याने, प्रवासात स्त्रियांशी सूध्दा, विशेष करून मजनूंना फार सावधानीने व अदबीने वागावे लागते. कोणत्या प्रसंगी कोण महिला एखादे वेळी दुबइला सूध्दा फोन लावेल याची शाश्वती देता येत नाही.

मोबाईलवर येणा-या मिसकॉलची तर एक वेगळीच गंमत आहे. याचे नांव मिसकॉल असले तरी हा कॉल कोणत्याच मिसचा नसतो हे या मिसकॉलचे वैशिष्टय आहे. हे शब्द कसे पडले हे मला केंव्हाच कळले नाही. जसे पुढील शब्द पहा. ‘ किसमीस ‘.. किसमीस मला फार आवडतो पण याचा इंग्रजी विचार केला तर कोणती तरी मिस आपल्याला किस देईल काय,.. त्यामुळे मी अशा शब्दांचा फार विचार करून त्या भानगडीत केंव्हाच पडत नाही.

अलिकडे म्हणे भारतात मोबाइल हा बारा आकडी होणार आहे व त्याचा भारतात तुमची वैयक्तिक ओळख म्हणून भारत सरकार उपयोग करणार आहे. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीसाठी एक युनिक नंबर राहणार. असे जर झाले तर, जर तुम्ही नोकरशाहीमध्ये असाल तर तुम्ही परग्रहावर जरी जावून बसले तरी सरकार तुम्हाला शोधणारच. मोबाइल हे यंत्र प्रत्येकाजवळ त्याच्या स्वतःच्या उपयोगाकरीता घेतलेले असते परंतू नोकरशाहीत आपल्या मोबाइलचा मालकच जास्त फायदा घेतात. मग असे असेल तर नोकरशाहीत सरकारनेच मोबाइल पुरवावयास नको काय. आणि समजा तुम्हास मोबाइल दिलाही तरी तो ही यंत्रणा केंव्हा कराच्या रूपाने काढून घेइल हे सांगता यायचे नाही. ही गंमत आहे सरकारची टिका नव्हे.

संस्कृतमध्ये एक श्लोक आहे ‘कराग्रे वसते लक्ष्मी.... पण नोकरशाहीत तर कराग्रे वसते भ्रमण ध्वनी, करमुले तू पगारम् ! अशी कर्मचा-याची अवस्था आहे. हा भ्रमणध्वनी संपूर्ण पृथ्वीवर भ्रमण करतो पण तुम्हास मात्र कोणत्याही एका दिशेने व्यवस्थित भ्रमण करू देत नाही.. पूर्वी कानात साधा कापसाचा फोया जरी घातला तर काही लोकं म्हणायचे आपण बहिरे आहात काय... आता तर सर्वच कानात वायरयुक्त काळा डिच्चू दिसतो. त्यामुळे मला रस्त्यात अशी व्यक्ती दिसली तर त्यास म्हणावेसे वाटते की ...येथे समस्त बहिरे असतात लोकं कां वाहने तू

चालविशी अनेक.. ! मोबाइल या यंत्राचे प्रामुख्याने दोन भाग करता येतात. एक महागडा व दुसरा स्वस्त.. त्यामुळे कोणाकडे महागडा तर कोणाकडे स्वस्त माबाइल आढळून येतो. म्हणतात नां.. जिचे हाती पाळण्याची दोरी.. ती जगाला उध्दारी ! या उक्तीनुसार नोकरशाहीत ज्याचे हाती महागडया मोबाइलची दोरी.... व जो अभिकरणाव्दारे प्राप्त करी तोच भारतास उध्दारी अशी स्थीती आहे. म्हणजेच थोडक्यात मोबाइल ला फार महत्व आहे हे आपल्या लक्षात आले असेलच....

अहो या मो S S बाईलने मोठया मोठयांना बाईलवेडे सूध्दा करून ठेवले आहे. तेंव्हा याची महती अजूनी काय वर्णावी ? जसे की रेडिओ मिरचीवर आपण एक गाणे ऐकले असेलच ते असे ..... रे S S हे डिओ मिरची ...रे.. हे.. डिओ मिरची तसेच हे मो S S हो .. बाईल फिरती.. मो S S हो .. बाईल फिरती !!

..................................



# ७) गडचिरोलीत बाळू

मागील प्रकरण क्रमांक २ मध्ये बदलीची व्यथा आलेलीच आहे. त्यामुळे नोकरशाहीतील अशा बदल्यामुळे कोणताही मनुष्य किती दिवस वाईट वाटून घेणार. त्यामुळच आलीया भोगासी असावे सादर.... नोकरीचा अनादर करू नये. असेच बाळूने ठरविले.. कारण बाळूची बदली थेट अकोला येथून एकदम गडचिरोली येथे झाली होती पण त्याचे कार्यकारी अभियता यांचेशी चांगले स्नेह संबंध असल्याने त्यास कार्यालतील अर्धवट कामे पूर्ण करण्याचे दृष्टीने जवळ जवळ सात महिने पूर्वीच्याच कार्यालयात थांबवून ठेवले होते. पण कसायाच्या बक-याची माय किती दिवस दुवा देणार.. शेवटी आदेशानूसार त्या बक-याला जानेवारीत कापलेच. पण त्याच्या साहेबांची शेगांवच्या संत श्री. गजानन महाराजावर अतिशय श्रध्दा असल्यामुळे ते म्हणाले - महाराजांनी तुम्हास सात महिण्याचा कालावधी दिला होता पण तुमचा प्रयत्न कमी पडला. त्याने म्हटले जाऊ दया. शेवटी त्यास नोकरी इमान इतबारे करायचीच होती. तेंव्हा या बदलीमुळे त्याने अजिबातच वाईट वाटून घेतले नाही. मनात मात्र म्हणत राहला.. गडचिरोलीचा पालकमंत्री आहे आर आर.... म्हणून कर्मचारी वैनगंगेच्या पार...तरी सूध्दा काही जण म्हणत होते ‘प्रयत्ने वाळूचे कण रगडीता तेलही गळे.. पण असे म्हणणा-यांना कदाचीत हे माहित नसावे की, ही म्हण फक्त वाळूच्या बाबतीतच खरी ठरू शकते. परंतू बदली झालेल्या बाळूच्या बाबतीत नव्हे. कर्मचा-यास वैनगंगेच्या काठावरती दिलेल्या वचनांमुळे साम, दाम दंड भेदापरीही, मिळाली ही बदलीची कुफळे. ! असेच म्हणावे लागत असे..

गडचिरोली व यवतमाळ या दोन गांवाबद्दल सिनेलेखक सूध्दा डॉयलॉग लिहितात ...अच्छेसे पूलिस डिपार्टमेंटमे काम करो, नही तो यवतमाल जाना पडेगा......वहॉं क्या है.... वहॉं तुम जाओगे तब तुमे पता चलेगा...किंवा मराठी सिनेमा मध्ये मकरंद अनासपूरे म्हणतो.. तुझे इतके हाल होतील की, तुझी बदली गडचिरोलीला होइल... वगैरे वगैरे.. सांगण्याचं तात्पर्य एवढेच की गडचिरोली व यवतमाळ हे महाराष्ट्राचे अंदमान व निकोबार आहेत. गडचिरोली हा जिल्हा नक्षलग्रस्त भागात असल्याने तेथे सहसा कोणी कुटुंबासहीत जाण्यास तयार होत नाही. तसेच सर्व कर्मचारी समदुःखी असल्याने एकमेकाशी सर्व समदुःख समभाव या भावनेने एकमेकाशी वागतात हे तरी बरे आहे. बदली झालेल्या कर्मचा-याची तर अशी इच्छा होती की येथील आदिवासी भागाच्या विकासासाठी पूर्व विदर्भामध्ये गडचिरोली या जिल्हयाच्या ठिकाणी मंत्रालयाची एक शाखा कां नसावी. त्यामुळे कमीतकमी सर्वांनाच या दुर्गम व निसर्गरम्य भागाची ओळख होवू शकते.

महाराष्ट्रातील येथे बदलून आलेले कर्मचारी बिचारे हातात महाराष्ट्राचा नकाशा घेवून किंवा रोडमॅप घेवून येतात.

बाळूची बदली झाल्यामुळे याला, अकोल्यावरून गडचिरोली जाण्यासाठी, कोणी यवतमाळ मार्गे, कोणी वर्धा मार्गे तर कोणी नागपूर मार्गे जावे असे सूचवित होते. मात्र या गावाचे वैशिष्टय असे की हे गांव सर्व मार्गाने जवळपास सारख्याच अंतरावर आढळते. याला नागपूरलाच जायला सात तास लागल्याुळे नागपूरलाच मुक्काम करावा लागला. मुक्काम करतांना कोणत्याही हॉटेलमध्ये किंवा लॉजमध्ये आपण जर दुस-या दिवशी गडचिरोलीला जात असाल तर कसून चौकशी केल्या जाते. जसे की आपण कोठून आलात.. गडचिरोलीत आपणास काय काम आहे. हे रितसर लॉजच्या रजिस्टरमध्ये नोंदावे लागते. तसेच कधी कधी तर पोलीस आपले खिसे, बॅग चड्डी बनियन सूध्दा तपासण्याची शक्यता नाकारता येत नाही. एकदाची या नागपूरात गुंडाची तपासणी होणार नाही पण तुम्ही कोणी साधारण कर्मचारी असेल तर मात्र त्याची तपासणी अवश्य होते.

बाळूने लॉज पाहाले ...बॅग तपासणी झाली.. रितसर हॉटेलमध्ये त्याने प्रवेश घेतला.... रात्र झाली... आयुष्यातला शेवटचा डबा म्हणजे बायकोने दिलेली प्रेमाची शिदारी खातांना गडचिरोली परिसरात त्याचा शेवट तर होणार नाही या भावनेत व विचारात त्याचा डबा केंव्हा संपला याचेही भान त्यास राहले नाही ...नंतर झोप मात्र लागेना...रात्री झोपेतही नक्षलग्रस्तांचा भास होत होता. नाईटमेअर कशाला म्हणतात हे फक्त आजपर्यंत तो कादंबरीतच वाचत आला होता. पण आज मात्र त्याने रात्रीच्या झोपेत प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. ही भयभित रात्र एकदाची संपली... भल्या पहाटे तो उठला. २६ जानेवारीचा गणराज्य दिन प्रवासातच जात होता. २७ जानेवारीपासून जसा भारताचा कारभार सूरू झाला असावा त्याप्रमाणे त्याला सूध्दा गडचिरोलीला याच तारखेला कार्यालयात रूजू व्हायचे होते.

ठरल्याप्रमाणे सकाळची विधी आटोपल्यावर लॉजच्या तो बाहेर पडला ...साधा सायकल रिक्शा केला.. इकडं नाशिककरांना हा साधा सायकल रिक्शाचा प्रकार माहितच नाही हे त्यास नंतर कळले. बस स्टँडवर प्रथम वेळापत्रक पाहिले तसे टाइमटेबल म्हटले तर जास्त इंप्रेशन पडून बसवर असणा-या बहि-या कानाच्या चौकशी अधिका-यास लवकर आकलन होत असते या भावनेने गडचिरोली गाडयाविषयी त्याने विशेष चौकशी केली. चौकशी अधिकारी त्याचेवर एवढा जाम चिडला की ......व म्हणाला तुम्हा गडचिरोलीच्या कर्मचा-यांसाठी आमच्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने दर अर्ध्या तासाने बस गाडी ठेवली आहे कारण येथे जाणारा कर्मचारी निदान आमच्या नावाने तरी ओरडून तेथे जाण्यास चाट मारू शकणार नाही. अहो महाशय लवकर जा. सर्व गाडया येथून फुल्ल जातात. ल.. ला.. डबल ल लावून फुल्ल याचा अर्थ फारच गच्च असा,

त्या अधिका-यास कदाचीत त्यास दर्शवायचे होते असे वाटले. खरंच पहीली साहाची गेली.. आता साताची जाईल ...मग बाराची गाडीही निघुन जाइन या घाईने त्याने साताचीच गाडी पकडली.

गडचिरोली सारख्या ठिकाणी कोणीच जात नसावे अशी त्याची कल्पना या ठिकाणी फेल पडली. पण गचागच बस भरलेली पाहून क्षणभर आश्चर्य वाटले. अहो हे संमदे तुमचे सरकारी कर्मचारीच आहेत असे खाली एका रिकाम्या बिडी फुंकणा-या माणसाने त्याच्या ज्ञानात भर टाकली. व तेवढया घाईगडबडीत थोडी जास्तीची माहीतीही पुरवली व तो म्हटला ...अहो यावर्षी आर आर ने सा-यायचीच बंबार्ड शेकवली मनूनशानी सा-यायले कसं भीड करून जा लागत आहे. तो दैनंदिन सिंहगर्जना किंवा एखादया लोकल पेपरचा वाचक असावा असा त्यास केवळ भासच झाला नाही तर यातल्या थोडया शिव्या त्याने त्यालाही दिल्याचा अनुभव त्यास आला.

गाडीत चढल्यावर जनरल प्रवासी जसे एकमेकाशी बोलतात त्याप्रमाणे त्याने सूध्दा इतर प्रवाशाशी बोलण्याचा अल्प प्रयत्न करू केला. मात्र असे आढळून आले होते की या गाडीमध्ये अवास्तव चर्चा कोणी करतांना दिसले नाही. तरी सूध्दा ही चूप्पी तोडण्याच्या दृष्टीने त्याने एका सभ्य दिसणा-या गृहस्थाला विचारले.... गाडी गडचिरोलीला केंव्हा पोहोचणार ? त्याच्या या प्रश्नास सभ्य गृहस्थाने लगेच एक असभ्या उत्तर दिले व म्हटले .... गाडीमें चुपचाप बैठो.. गडचिरोली जाना है नं! राइट टाइम गयी तो बारा बजे जायंगी नही तो बिचमें किसीने अडायी तो जायेगी तेरा बजे नही तो. एकदम उपर ...सबको जाना पडेगा, इसका कोई भरोसा है क्या? त्याचे लाल डोळे व पोलीसी खाक्या पाहून व त्याची मराठी मिश्रीत हिंदी पाहून, तो सभ्य नसल्याची आता बाळूस पूरेपूर जाणीव झाली होती. तरी त्याला जातेवेळी मी उपदेश करून केला होता की गडचिरोलीला बडबड जास्त करू नको. अहो एखादयाच्या सिगारेटने त्याचा कोट जरी जळत असला तरी प्रवासात सहसा त्यास सांगू नये असा मीच त्यास जोक सांगितला होता हयाची सूध्दा या क्षणी त्याला आठवण झाली. त्यामुळे पुढे त्याने बसमध्ये न बोलण्याचा दृढ निश्चय केला.

पण कोण जाणे त्या प्रवाशास काय वाटले.. थोडया वेळाने तोच प्रवासी बाळूस म्हणाला.. आप साहाब लग रहे है.... पहिली बार जा रहे है.... सही है नं.. त्याने भीतभीतच.. तोंडातल्या तोंडात.. हूं ...म्हटले. .... साहाबजी गडचिरोली में नोकरी करना है तो कमसे कम शब्दोंमे हरएक को निपटाओ.. नही तो आपको पुलीस का खब-या समझके ...तुरंत कोई ना कोई उडा देंगे!

बाळू जीव मुठीत घेवून गडचिरोली ला पोहोचला. सर्वप्रथम इंदिरा चौक आला. सर्व गाडी खाली होतांना दिसली पण बाळूला या गावाची कल्पना नसल्याने बाळू तसाच बसून राहला. गाडी सूरू झाली व कंडक्टर बाळूस म्हणाला आप कहाँ जा रहे है.. मै गडचिरोली.... तो

खेकसला व बाळूला म्हटला तो ये क्या एटापल्ली है? यहाँसे बस स्टँड तीन किलोमीटर नक्षल एरियाके तरफ धानोरा रोडपें है. चलना है वहाँ...?

बाळूला कळत नव्हते जो तो बाळूला या गडचिरोली मध्ये घाबरवतच असतांना दिसला. बाळू ऑफीसमध्ये गेला व तेथे बाळूला एका चौकीदाराचा परिचय झाला पण त्याचेही नांव योगायोगाने बाळूच निघाले. आता बाळू बाळूची लवकरच गट्टी जमली होती. या गडचिरोलीतील बाळूने मात्र या बाळू अभियंत्यास फार मदत केली. गडचिरोलीतील बाळूने म्हणजे बाळू क्रमांक २ ने या बाळूस त्याचे गडचिरोलीतील भाषेनुसार पुढील वृत्तांत कथन केला.

'साहेबजी (तेथे ऑफीसर असेल तरी प्रत्येकास जी म्हणण्याची पध्दत आहे) एकदा काय झाले. एक ठेकेदार अहेरी रस्त्याने जात होता, वास्तविक तो या परिसरात बरेच दिवसापासून कामाले होता. तो कोणालेबी भेये नायी, लय मगरूर व्हतां.. रस्त्याने त्यायचे सोबत त्यायची बायको पण होती. बस अडवली त्यायची नक्षल्यायनं कार .... बायको लय मानमिनता करे ते म्हणली आज जर हयायले सोडसाल तर तुमाले दोन लाख रूपये देवू. पण नक्षल म्हणले ...बाई पुसा कुकु तुमचं.. लय चाटा देल्या तुया नव-यानं आमाले. आन काय सांगूजी तुमाले त्यायनं त्या ठेकेदाराचा गयाच कापला. ही कहाणी ऐकूण बाळूचं धाबं दणाणलं.. बाळू जरी अधिकरी असला तरी त्यानं कसंही करून आपल्याला उपविभाग न भेटता विभागातच काम करण्याची संधी मिळावी यासाठी तो प्रयत्नशील राहला व या कामातही बाळू क्र. २ ने बाळू १ ला मदत केली. हं.. त्यासाठी त्यानं एक दोन क्वार्टर मारल्या ते निराळच.

या गडचिरोली परिसरात जेंव्हा कर्मचा-यांना निवडणूक अधिकारी म्हणून नेमणूक होते त्यावेळी तर निवडणूक पार्टीला सरळ रस्त्याने कधीच नेल्या जात नाही कारण असे रस्ते नक्षलग्रस्तांनी अडवलेले असतात. त्यामुळे आडमार्गांनी दहा ते वीस किलोमीटर किंवा त्यापेक्षाही जास्त अंतर कर्मचा-यांना पैदल जावे लागते. व जातांना जर अचानक फायरींग सूरू झाल्यास पोलीस प्रत्युत्तर देतात व पार्टी मध्ये झोपलल्या अवस्थेत असते. दुसरा कोणताही उपाय नसतो. एवढी खतरनाक डयुटी कर्मचा-यांना करावी लागते. त्यामुळेच या परिसरात कोणी जावयास तयार होत नाही. अशा अवस्थ्ेत बाळूने तेथेही दिवस घालविले व त्याचे नशीब चांगले की त्यास लवकरच प्रमोशन मिळाल्याने त्याची तेथून सूटका झाली होती. पण मात्र त्याचे स्मरणातून गडचिरोलीचा बाळू क्र. २ कधीच गेला नाही. या नोकरशाहीत हा बाळू गडचिरोलीतूनही वाचला ही याला नोकरशाहीची गंमतच वाटली व त्याने परमेश्वराचे आभार मानले.

.......................................

# ८) बाळूच्या पाटर्या

सर्वसाधारणपणे पार्टी या शब्दाचा अर्थ एखादा समूह असा होतो. परंतु नोकरशाहीत काही किंवा सर्व कर्मचा-याची एकत्र येवून घेण्यात येणा-या स्नेहभोजनास पार्टी असे संबोधतात. या पाटर्या सर्वच कर्मचारी घटना व प्रसंग पाहून एकमेकास मागत असतात. पार्टी म्हटले की सहसा साधे जेवण नसतेच त्यात विशेष असा मेनू म्हणजे नॉन-व्हेजच असते. माणसं पाहून मद्याधिकाचाही संबंध ओघाओघाने आलाच. या पार्टी करण्यामागे मुख्य उद्देश म्हणजे जीवनात काहीतरी वेगळया प्रकारचा आनंद निर्माण करणे असा असतो अर्थात वेगळी मजा याचा गर्भितार्थ कधी कधी निराळाही असू शकतो पण सध्या आपण जेवणापर्यंतच अर्थ मर्यादीत करू या. अशा प्रकारे ठरविलेल्या पाटर्यांमध्ये काय काय उद्योग घडतात याचे थोडक्यात विवेचन व बाळूचे अनुभव आपण पाहाणार आहोत.

एका प्रकल्पावर एका अभिकरणाव्दारे अशीच पार्टी ठरविण्यात आली होती. ही पार्टी वरीष्ठांकरीताच होती. अर्थात या पार्टीस बाळूचा सहभाग नव्हता कारण तो कनिष्ठ पदावर होता. परंतू ही कनिष्ठ मंडळी मात्र या बाबीसाठी नाराज वगैरे नव्हती. पण जसे एखादया अळीचा एक पाय जरी मोडला तर तिला त्रास होण्याची शक्यता नाकरता येत नाही त्याचप्रमाणे कदाचीत त्या अभिकरणकर्त्यास वाटले असावे की काय त्याने या पार्टीतून उरलेले साहित्य म्हणजे खाद्यपदार्थ दुस-या दिवशी सकाळी बाळूच्या रूमवर आणून दिले. आणलेला डबा जवळपास तीन लोकांना पुरेल एवढा असावा असे डब्याचे आकारावरून वाटत होते. बाळू समूह त्याकाळात शिफ्ट डयूटीवर असल्याने, परंतू रूमवर फक्त त्यांचा नोकर असल्याने डबा कोणाच्याच पाहण्यात आणतेवेळी आला नव्हता. त्यामुळे तो तेथे तसाच पडून राहला. संध्याकाळापर्यंत अक्षरशः तो सडला होता. त्या घाणेरडया वासाने अक्षरशः बाळूने या पाटर्यांचा आयुष्यात नादच सोडला होता. अशा हया नोकरशाहीतील पाटर्या आहेत.

एकदा एका विभागीय कार्यालयामध्ये सोल्जर पार्टी ठरली होती. सोल्जर पार्टी म्हणजे आपापल्या पैशात खर्च. विभागातील मंडळी बरीच असल्याने किमान सहा मूर्ग्यांचा बळी अत्यावश्यकच आहे असे सर्वांनुमते ठरले. जसा हा पार्लमेंटचाच ठराव होता. कथीत प्रत्येक बळी जाणा-या मूर्ग्याला किमान दोन पाय असतात हे सर्वांना ठावूक असल्याने, विभागातील बारा लोकांच्या जेवणात प्रत्येकी एक एक पाय, (जेवतेवेळी, असे अभद्र बोलू नये एक एका लेगपीस असे म्हणावे. तर हा लेगपीस) प्रत्येकाच्या अपेक्षेत होता. तत्पूर्वी म्हणजे प्रत्यक्ष जेवणाला सूरूवात

करण्यापूर्वी, जशी देवाची पूजा अर्चा आटोपल्यावर प्रसादापूर्वी तीर्थ घेण्याची प्रथा आहे त्या पारंपारीक पध्दतीचे पालन करण्यासाठी बाळूची काही तीर्थ प्रेमी मंडळी तीर्थ प्राशनात गुंग झाले होते. या तीर्थात गुंग झालेले तीर्थभक्त मूर्ग्याच्या भक्तीत एवढे तल्लीन होते की त्यांना मूर्गा शिजत असल्याचे भानच राहले नाही.

अचानक एका तीर्थभक्ताला तीर्थासमवेत एक पीस खाण्याची इच्छा झाली होती त्यामूळे त्याने कोणाचेही लक्ष नाही हे गृहीत धरून हळूच एक पाय सॉरी लेगपीस चटकन मटकावले. असाच प्रकार कदाचीत इतरांनीही केला असावा. की काय प्रत्यक्ष इतरांच्या जेवणाचे वेळी अक्षरशः एकही लेगपीस गंजात शिल्लक नव्हते. उपरोक्त प्रकार लक्षात घेता बाळूची काही वरीष्ठ मंडळी, जी वाट पाहात बसली होती त्यातील एक ऑफिसर म्हणाला ...बिनपायाचे मूर्गे तुम्ही होलसेलमध्ये घेतले की काय ? ईति पार्टीस्य व्दितीयोध्याय समाप्तः !

या अशा घाणेरडया नोकरशाहीतील पाटर्यांमुळे सॉरी नोकरशाहीतील घाणेरडया पाटर्यांमूळे वरीष्ठ अधिकारी सहसा पाटर्यांमध्ये सहभागी होतांना दिसत नाहीत. तरी सूध्दा बाळू एक वरीष्ठांचाही अनुभव सांगतोच. एकदा काय झाले. ताज ग्रूपसारख्या एका मोठया हॉटेलमध्ये फक्त वरीष्ठ अधिका-यांसाठी परिसंवाद ठेवण्यात आला होता. हा परिसंवाद फक्त वरीष्ठांसाठीच असल्याने यात कोणीही कनिष्ठ वर्गाचा अधिकारी नव्हता. पण बरेचदा काय होतं की वरीष्ठ मंडळींना काही महत्वाचे काम असेल किंवा त्यांना अशा कार्यक्रमाला जायचे नसेल तर मात्र ते आपल्या अधिपत्याखाली काम करणा-या कर्मचा-याला पाठवितात. अशा कर्मचा-यामध्ये चूकून या बाळूचा नंबर लागला.

प्रथम तर त्यास प्रवेश मिळण्यासच अडचण गेली. कारण त्या रजिस्टर मध्ये त्याचे नांवच नव्हते. बदकांच्या कळपात राजहंस या पध्दतीने तो तेथे वावरत होता. पण त्याचा यात काय दोष होता कारण त्यास वरीष्ठांची आज्ञा पाळायची होती. त्याने कसेबसे स्पष्टीकरण देवून यात प्रवेश मिळविला. प्रथमच त्याने स्टार हॉटेल पाहीले असल्याने तो इतरांचीच वागणूक पाहण्यात गुंग झाला. अचानक त्यास एक व्यक्ती दृष्टीस पडला व त्यानेच यास ओळखले. पण गंमत अशी की, तो व्यक्तीच या कार्यक्रमाची आयोजक असल्याने या बाळूस तशी व्हीआयपी ट्रीटमेंट मिळाली. कार्यक्रम सूरू असतांना बाळूचे लक्ष फक्त कोण काय करतो याचेकडेच जास्त होते. किंवा कशाप्रकारच्या हालचाली ही वरीष्ठ मंडळी करतात या कडे याचा डोळा होता. परिसंवाद सूरू होता तेंव्हा त्या वातानूकुलीत हॉलमध्ये परिसंवाद ऐकण्यापेक्षा बरीच मंडळी त्या थंड हवेचा आस्वाद घेत होती व हळूहळू पेंगत पण होती. तेथे परिसंवादाचे महत्व फार कमी लोकांना आहे असे आढळत होते. काही तर चहा केंव्हा पुरविला जाइल याकडे लक्ष पुरवित होते. काहींनी तर तेथे टेबलवर ठेवलेल्या पेन्सीलसारख्या क्षुल्लक वस्तूही हळूच बॅगमध्ये टाकण्याचा प्रयत्न करीत असतांना आढळले. तर लेटरपॅडवर उगीच काहीतरी नोट्स आपण काढत आहोत असाही भास ते इतरांना

दर्शविण्याच्या प्रयत्नात होते. ज्यांना एक तासही बसण्याची एनर्जी नव्हती किंवा ज्यांना मध्येच धूम्रपानाची सवय होती अशी मंडळी तर हळूच कोणाचे लक्ष नाही असे पाहून हॉलच्या बाहेर जात होती.

ते स्टार हॉटेल असल्याने या व्यक्ती नेमक्या कशासाठी बाहेर जात आहेत याची बाळूला उत्सूकता वाटली त्यामुळे तो सूध्दा या मंडळीची मौज पाहण्यासाठी बाहेर गेला तर यास दुसरेच दृश्य आढळून आले. काही मंडळी सिगारेटचा झुरका हॉटेलच्या प्रांगणात घेत असतांना वेगळीच मौज घेतांना बाळूच्या लक्षात आले. ती म्हणजे त्या हॉटेल परीसरात एक स्वीमींग पूल होते. त्या हॉटेलमध्ये काही फॉरेनर मंडळी थांबली होती. त्यापैकी एक म्हातारी वर्गातील महिला व कदाचीत तीची मुलगी असावी असा त्यांचा जलतरणाचा प्रयोग सूरू होता त्याकडे ही सिगारेट पिणारी मंडळी कोणाचे लक्ष जाणार नाही या पध्दतीने त्यांचे अर्ध नग्न शरीराकडे हळूच नजर देत होते. त्या फॉरेनर असल्याने त्यांची कांती नितळ होती हे वेगळे सांगावयास नको. हा वेगळाच आनंद सिगारेटच्या झुरक्यासोबत मिळू शकतो याची बाळूला पहिल्यांदाच जाणीव होत होती परंतू बाळू सिगारेट ओढत नसल्याने या दृश्याचा त्यास फार काळ आनंद घेता आला नाही. परिसंवादाचे कार्य दिवसभर सूरू होते. पण त्यात लोकांना फारसा रस नव्हता असे आढळले.

बरीच मंडळी बाहेर गावून किंवा नागपूरसारख्या लांबून आली असावी असे त्यांचे थकलेल्या चेह-यावरून वाटत होते. पण अशा प्रकारचा थकवा काढण्यासाठी रात्री आयोजकांनी काही सोय केलेली आहे असे सर्वांनाच वाटत होते व त्यांचा अंदाज जेंव्हा रात्र झाली तेंव्हा खराही ठरला होता. आयोजकांना सर्व वरीष्ठ मंडळी एकत्र भेंटण्याची हीच सुवर्ण संधी असल्याने आयोजकांनी मुद्दामच अशी व्यवस्था केली असावी असे वाटत होते.

स्टार हॉटेलचा तो मंद मंद असा प्रकाश.... उत्तम प्रकारची सजावट .... सगळयांची उत्सुकता.... तेथील पॉश नोकर मंडळी.. व रात्रीच्या त्या उत्कृष्ट भोजनाची व्यवस्था .... या सर्व गोष्टींचा आनंद केंव्हा लवकरात लवकर घेवू याची प्रत्येकास जणूकाही फारच घाई होत आहे याप्रमाणे प्रत्येकाचे चेह-यावरील भाव दिसत होते परंतु अशा महागडया हॉटेलमध्ये औपचारीकता ही पाळावीच लागते याची प्रत्येकास जाणीव असल्याने जो तो या पार्टीच्या प्रारंभ अपेक्षेत होता. सर्वमंडळी इकडे तिकडे आपापली नजर फिरवीत होते की हे स्टार हॉटेल असून यात ते.... दिसत नाही. म्हणजेच सर्वांना आवडणारा पण कोणासमोरही बोलून न दाखविता येणारा पेय पदार्थ अर्थात दारू. पण या ठिकाणी दारू म्हणणे स्टार हॉटेलच्या दृष्टीने प्रशस्त वाटत नसल्याने वाईन असा उत्कृष्ट शब्द वापरावा लागतो. या द्रव्याला देवादिकांच्या काळात तर वाईनही न म्हणता सोमरस असा वेगळा शब्द देव लोकं वापरीत असत. कारण स्वर्गाच्या प्रतीष्ठेचा प्रश्न असतो त्याच प्रमाणे येथे सूध्दा वरीष्ठांच्या प्रतीष्ठेचा प्रश्न असल्याने प्रत्येक व्यक्ती जपून शब्दरचना करीत होता.

त्या असंख्य अशा भिरभिरत्या नजरेपैकी एकास हॉलच्या डाव्या कोप-यामध्ये टेबलवर उच्च प्रतीच्या शिशा नजरेस आल्या. ...शिशा हो या दिल हो.. आखीर टूट जाता है.. असे काहींना वाटले. पण नेमके पहीले दिल कोणाचे तूटणार आहे याची कोणासही कल्पना नव्हती. किंवा पहिला नशा ...कोण करणार अशी जणू चढाओढच लागली होती. प्रतिक्षेची वेळ संपत आली होती पण वेटर दिसेना ...काहींना तर वाटत होते की घ्या.... फोडा साल्याला...साला.. ही शिवी असली तरी ती आज सोमरसाच्या बॉटलला मोठया प्रेमाने दिल्या गेली होती. काही मंडळी अगदी जवळ जावून त्यावरील, नेमकी कोणती बॉटल आहे या उद्देशाने किंवा त्यावरील लेबल तरी पहावे अशा भावनेने जवळून भटकत होते. काहींना तर असे वाटत असावे की यातील प्रत्येकच सँपल थोडा थोडा पिवून पहावा. कारण मग एवढी महागडी वाईन स्वतःच्या पैशात कोण पिणार होते. पार्टी सूरू झाली.. वेटरनी प्रत्येक दर्दीस स्टारच्या पध्दतीनुसार थोडी थोडी दयावयास सूरूवात केली. बाळू व त्याचा ओळखीचा आयोजक जरा थांबलेच. कारण बाळूला तसा थांबण्याचा आयोजकाचा ओळख असल्याने आग्रह होता. आयोजक म्हणाले आता थोडा वेळ थांबा व प्रत्येकाची मजा बघा हे जरी सर्व महान मंडळी असली तरी या नशेत ही मंडळी काय करतात ते पहा.

पार्टीच्या आरंभीच काही तीर्थ प्रेमींनी औपचारीकतेला पाळून जो दिला त्या पेगवर समाधान मानले पण हळूहळू त्या अल्पपेयाने काहीच होत नाही असे गृहीत धरून लगेच दुंस-या पेगसाठी रांग लावली पण स्टार हॉटेलमध्ये औपचारीकत म्हणून थोडे थोडे पेग नोकर भरायचे हे मात्र काहींना आवडले नाही. त्यामुळे अशा जास्त पेगच्या आग्रही मागणी करणा-याचे चेहरे तो वेटर न्याहाळून पहात होता. त्याला आता वरीष्ठ मंडळीसूध्दा साधारण माणसासारखी भासू लागली असे वाटत होते की जणू काही त्यानेच एक पेग मारला आहे. जसजसा पार्टीचा रंग चढत होता तसतसे प्रत्येकात मानसिक परीवर्तन होत होते. काहींना तर याचेही भान नव्हते की आपण नाश्त्याच्या रूपात व्हेज खात आहोत की नॉन-व्हेज खात आहोत. कारण स्टार हॉटेलच्या डिशेस व्हेज व नॉन-व्हेजमधील फरक जाणू देत नव्हत्या. एकंदरीत हा सोहळा सूध्दा बाळूला फार आनंद देवून गेला.

हळूहळू घडयाळाचा काटा बाराकडे वेगाने जात असल्याचा भास ज्यांना चढली नव्हती त्यांना होत होता. त्यामुळे त्यांचे चेह-यावर घरगुती बायकोची आदरयुक्त भिती सूध्दा आढळून येत होती पण हा नियम बाहेरगावून येणा-या मंडळीच्या चेह-यावर नव्हता म्हणूनच ते फार स्वर्गसुखाचा आनंद घेत होते. असे वाटत होते की जणूकाही स्वर्गातील सर्व देवमंडळीच या पृथ्वी तलावर उतरली आहे. खरे जेवण जे बाउलमध्ये ठेवले होते त्यातील मटन पीसे या भक्षकांची आवर्जून वाट पाहून पाहून थकली होती. पण कोणीस ख-या जेवणास प्रारंभ करतांना दिसत नव्हती. या पार्टीवर द्रवपदार्थाचाच प्रभाव एवढा जाणवत होता की सर्व मंडळी अन्न हे पूर्ण ब्रम्ह हे विसरल्यासारखी झाली होती. व मद्य हेच पाणी व पाणी हेच जीवन आहे अशा अविर्भावात माहौल जगत होता.

शेवटी सर्वांची मनःतृप्ती झाल्यानंतर सर्व मंडळी आपापल्या घरटयाकडे परतली. जातांना मात्र ही नोकरशाहीतील मंडळी नोकरांना टीपसूध्दा दयायची विसरली होती कारण अशा

नोकरशाहीतच चकटफूचा आनंद मिळत असतो. व तो या पृथ्वीतलावरच स्वर्ग-दर्शन घडवू शकतो असे सर्वांनाच वाटत असल्याचा भास या पार्टीत सहभागी होणा-या बाळूला त्याच्या स्वप्नातही होत राहला... !

पार्टीचे संशोधन करणे हे बाळूला फार आवडायचे की याचा मुख्य उद्देश काय? खरा उद्देश त्यास खालील प्रकरणातून आढळून आला. असाच एका वसाहतीत बाळू राहायचा. बाळूला या अशा पार्ट्यांमध्ये फारसा इंटरेस्ट नव्हता पण म्हणतात नां की पाण्यात राहायचे तर माशाशी वैरत्व कशाला म्हणून मग अल्पसा भाग मात्र बाळू घेत असे पण सहसा कोणाच्या पार्टीला होकार देत नसे. पुढील प्रसंग त्याचे मित्राचे जीवनात अत्यंत गंभीर असा घडुन आल्याने त्याने हया पार्ट्यांचा नाद अजिबातच सोडून दिला व पुढील प्रसंग वाचल्यानंतर आपण ही हा छंद सोडावा अशी बाळूची फार मनापासून इच्छा आहे. बाकी आपली मर्जी... प्रसंग असा.... (या प्रसंगात बाळू नाही पण हा प्रसंग त्यानेच काय सर्वाने प्रत्यक्ष डोळयाने पाहलेला आहे)

बाळूचा एक मित्र वसाहतीतच राहायचा. त्याचे मित्रास ब-यापैकी अवांतर छंद होते. अवांतर मिळकत होती असेही म्हणावयास हरकत नाही. पण बाळूची त्याचेशी फारसे जुळत नव्हते. कारण बाळुचे तत्व जरा निराळे होते. बाळूला दुरूनच डोंगर चांगले असते याची कल्पना असल्याने तो अशा डोंगराचा आनंद दूरूनच घेत असे. या पार्ट्यामध्ये कोणाचा उद्देश काय असतो हे कोणालाच कळत नसते पण कारणाशिवाय कार्य घडत नसते हे मात्र खरे आहे. एक चतुर्थ श्रेणीतील व्यक्तीने व त्याचे सहकार्याने या अभियंत्याचा काटा काढण्याचे ठरविले असावे की काय पण एक पार्टी आयोजीत केली होती. पार्टीत फक्त या दोन व्यक्ती व हा बळी अभियंता होता. त्यांचे शब्दात फसून या मित्राने पार्टी करण्यास अनुमती दिली.. किमान आपल्या बरोबरीच्या व्यक्तीसोबत तरी पार्टी करावी हे तो अतिरीक्त पैशाच्या नादात विसरला असावा. रात्री या व्यक्तीस एकटे पाहून मद्यधुंदीत त्याचेकडून नको ते काम करवून घेतले व त्यास त्या रंगीन अवस्थेत जाळयात पकडले. बिचारा एकटा असल्याने त्याचा काहीच उपाय चालेना...करीता त्याने काही पैशात ही गोष्ट गुप्त ठेवावयास संबंधीतांना सांगितली पण त्या व्यक्तींना याला फसवायचेच होते हे निश्चीत झाले असल्याने त्यांनी रितसर स्टँपपेपरवर लिहून अतिरीक्त पैशाची मागणी केली होती ती सूध्दा देवूनही या व्यक्तींचे समाधान झाले नाही करीता ही गोष्ट वसाहतीत पसरली व नको ते घडलेच. याला मी दुदैव असे म्हणणार नाही तर ही एक डोळसपणे झालेली चूक आहे. म्हणतात नां - या जीवनात माणसाला प्रत्येक चूक करण्याची संधी मिळणार नाही करीता दुस-याच्या चूकांवरूनच. आपण आपल्या जीवनाचे पावूल उचलावे एवढेच सांगण्याच्या उद्देशाने या बाळूच्या जीवनाशी निगडीत अशा घटनांचा या ठिकाणी शब्दप्रपंच मांडला आहे.

.......................................

# ९) सखे सोबती

सखा म्हणजे जीवलग व नेहमी जवळ असणारा असे सर्वसाधारणपणे आपण समजतो. या नोकरशाहीमध्ये जेंव्हा एखादा व्यक्ती नोकरीत प्रवेश करीत असतो त्यावेळी अनेक लोकांच्या सानिध्यामुळे नोकरीच्या जागेवर हळूहळू आपण संपर्कात येतो व जीवलग मित्र तयार होतात. कारण आपला त्यांचेशी स्वभाव जुळलेला असतो. मैत्रीचा हा उच्चत्तम बिंदू होय. परंतु प्रत्येक व्यक्तीचं नशीब व भाग्य हे त्याचे प्रयत्नामुळे म्हणा की उपजतच म्हणा त्याचे जीवनास वेगळीच कलाटणी देवून जाते. त्यामुळे त्याचे पदात व जागेत बदल होत असतो व त्यास अशा जीवलग मित्रांपासून कधी कधी फार दूर जाण्याचा प्रसंग येतो. स्थळ व काळाच्या हया बदलामुळे व दुस-या ठिकाणावरील नवीन परिस्थीतीमुळे किंवा त्यास मिळालेल्या उच्च पदामुळे म्हणा नैसर्गिकरित्या त्या व्यक्तीस त्याच्या जुन्या व जीवलग अशा मित्रांचा नकळत विसर पडत जातो. परंतु अशाही परिस्थीतीत कनिष्ठ स्तरावरील व्यक्ती उच्च पदस्थ व्यक्तीस मात्र कधीच विसरलेला नसतो. कारण यास नेहमी वाटत असते की, आपल्याला कधीतरी या जीवलग मित्राशी काम पडू शकते. म्हणूनच तो असे पदाधिकारी कोठे असतील या शोधात असतो. व प्रयत्न करून सापडल्यास त्यांचेशी संपर्क करण्याचा प्रयत्न करतो. यात प्रत्येक वेळी काही त्यास कामच असते असे नाही पण एक आपला जुना मित्र आहे व तो निदान आपल्याला ओळख तरी दाखवेल असे यास वाटत असते.. हा मानवी नैसर्गिक असा स्वभाव आहे.

आता वेळ, काळ, स्थळ, पद, गरीब, श्रीमंत इत्यादी बदल झाल्याने या कनिष्ठ स्तरावरील कर्मचा-यांना विचीत्र अनुभव पाहावयास मिळतात. कधी कधी तर या उलटही परिस्थीती निर्माण होते व उभयतांस अत्यानंद सूध्दा होतो पण ऐंशी टक्के सखे सोबती हे हेतुपुरस्सर अशा कनिष्ठ वर्गातील कर्मचा-यांना ओळख न दाखविता डावलत असतात. वास्तविक त्यांना जुन्या सर्व घटनांची पूरेपूर माहिती असते. जर अशी स्मरणशक्ती त्यांचेजवळ नसती तर ते उच्च पदावर गेलेच नसते. हे सर्वांनाच माहित असते. अशावेळी या घटना विशेषतः कनिष्ठांच्या भावनेशी जुळल्या असल्याने त्या अत्यंत हृदयद्रावक होवून जातात. अशा आनंददायी व दुःखद या दोन्ही प्रकारच्या घटनांचा समावेश या प्रकरणात करावासा वाटतो. या सख्या सोबत्यांमध्ये कायापालट तर झालेला असतोच हे नोकरशाहीतच काय पण सामान्य व्यक्तीच्या सामाजीक जीवनातही आढळून येतो. प्रथम काही आनंददायी व नंतर दुःखद घटनांचा परामर्श आपण घेवू या.

मागील प्रथम प्रकरणात बाळू पब्लीक स्कूलचा विद्यार्थी असल्याचे उल्लेखिलेले आहे. शासनाने काढलेल्या त्या शाळेतील प्रत्येक विद्यार्थी हा उच्च पदावर कार्यरत असल्याचाही

उल्लेख आहे. बाळूच्या त्या काळच्या उत्तम संस्कारामुळे विद्यार्थी जरी शाळेतुन बाहेर पडले तरी दरवर्षी एक स्नेहसंमेलन प्रत्येक जिल्हयामध्ये आयोजन करण्याचे सर्व विद्यार्थ्यांनी ठरविले आहे व ती पध्दत आजही विदर्भामध्ये सूरु आहे हे आजच्या काळातील एकमेव आश्चर्य आहे असे मानावे लागेल. कारण आजतागायत अशी कोणतीच शाळा जगात उपलब्ध नसेल की शाळेतून निघून गेल्यानंतर आजपर्यंत म्हणजे ३८ वर्षे ही गोष्ट आजपर्यंत स्नेहरूपाच्या दृष्टीने जीवंत ठेवली असेल. हे एक चांगल्या संस्काराचे लक्षण आजच्या पिढीसाठी दृश्य स्वरूपात आहे. या स्नेह संमेलनात विद्यार्थी भारतातच काय पण जगात कोठेही असला तरी तो समारंभात हजर राहात असतो. सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, अजूनही सर्व सखे सोबतीलाच आहेत. '' No cast, creed, no richness, no poverty, no attitudes, and nothing negativeness, you will find else. " अन्यथा आजकाल नोकरशाहीमध्ये जरासे पद बदलले तर सर्व कर्मचारी कसे एकमेकास सोयिस्कर रित्या विसरतात.

एकदा अमरावतीला बाळूला काही काम नसतांना जिल्हाधिका-यांना भेटावयाचे होते. जिल्हाधिकारी ही नोकरशाहीमधील अत्यंत महत्वाची व्यक्ती असते. त्यांना भेटावयाचे असल्यास पूर्व परवानगी किंवा चिठ्ठीवर आपले नांव नोंदवूनच भेटता येते. तरी सूध्दा त्यांच्या व्यस्त कार्यक्रमानिमीत्त भेटणे कधी कधी दुरापास्त होत असते. त्यामुळे बाळूने प्रथम चिठ्ठी पाठवुन बाहेर प्रतिक्षा गृहात तिष्ठत बसला. परंतु काय आश्चर्य की तेथील चपराशाने लवकरच साहेबांच्या निर्देशानुसार बाहेर येवून विचारले की ...बाळू कोण आहे ...साहेबांनी आंत बोलावले आहे. वास्तविक त्यावेळी वेटींग हॉलमध्ये किमान ४० व्यक्ती भेटीच्या प्रतिक्षेत होते. त्यामुळे बाळूने हा चमत्कार बघून विचार करतच आंत प्रवेश केला. संबंधीत जिल्हाधिका-याच्या आदेशानुसार आंत खूर्चीवर बाळूला बसावयास मिळाले. व रीतसर चहा सूध्दा झाला. या घटनेमुळे बाळूस अतिशय अवर्णनीय असा आनंद झाला. कारण हा बाळूच्या शाळेतीलच एक बॅचमेट होता. तो एवढया मोठया पदावर असून सूध्दा बाळूस विसरला नव्हता. तो कोण आहे याचा उल्लेख येथे सध्या बाळूला केल्याशिवाय राहणार नाही. ही व्यक्ती सध्या भारताच्या सध्या म्हणजे २०११ मध्ये असलेल्या मा. राष्ट्रपतीची पी. ए. आहे. व या व्यक्तीचे नांव रविन्द्रसिंह जालमसिंग जाधव असे आहे. असे असावे सखे सोबती नाहीतर याउलट एक पुढील घटना बघा.

एका कार्यक्षेत्रावर बाळूचा एक जुना मित्र कार्यरत होता. तो पदवीधर असल्यामुळे खूप अभ्यास करून स्पर्धा परीक्षेत यश मिळवावे असे त्यास वाटत असे त्याचे ईच्छेनुसार कर्मधर्मसंयोगाने यश सूध्दा मिळाले व तो नोकरशाहीमध्ये वर्ग एक पदावर रूजू झाला. कालांतराने बाळूचे स्थानांतरण, तो मित्र नोकरी करीत असलेल्या गावातच झाले. वास्तविक बाळूच्या कार्यालयात तो अधिकारी नव्हता हे विशेष परंतु उगीचच बाळूला असे वाटले की आपला हा जूना मित्र आहे तर यांना एकदा भेटण्यास काय हरकत आहे. बाळूच्या पध्दतीनुसार या

अधिका-यास चिठ्ठी पाठविण्याची गरज नसतांना सूध्दा बाळूने आपले नांव व परीचय देवून बाहेर तिष्ठत बसला. बाळू जवळजवळ अर्धा तास वाट पाहून थकला पण त्यास बोलावण्यात आले नाही बरं कोणी आंत आहे कां अशी बाळूने चौकशी सूध्दा केली होती पण आंत कोणीच नसल्याचे बाळूच्या दृष्टीस आले. आपली जुनी ओळख असूनही या व्यक्तीने आपणास कां बरे बोलाविले नाही याचा उगीच बाळू विचार करीत बसला मात्र यास क्षणभर फार वाईट वाटले.

बाळू विचार करीत होता की मी सूध्दा काही चपराशी पदावर नाही. त्यामुळे बाळू बिना परवानगीनेच आंत घुसला. व संबंधीत अधिकायाची भेट घेतली. बाळूस अचानक बघून त्या व्यक्तीने चेह-यावर गिल्टी कॉन्शस दर्शवून बाळूचे अनैच्छिक स्वागत केले. बाळू काय समजायचे ते समजला व बाहेर येवून मनात विचार करीत बसला की कोठे जिल्हाधिकारी व कोठे हा अधिकारी. जिल्हाधिका-याच्या तुलनेत हा नोकरशाहीतील अधिकारी एक कःपदार्थ आहे असे बाळूस आजही वाटते. याचे कारण मात्र बाळूस उमगले की या व्यक्तीवर बालसंस्कार झालेले नाहीत. बाळूस त्याचे आदर्श शाळेचे जीवन परत एकदा आठवले व तो राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराजांनी शिकविलेल्या ओळी गुणगुणायला लागला....

है प्रार्थना गुरूदेवसे, यह स्वर्गसम संसार हो, !

अति उच्चतम जीवन बने, परमार्थमय व्यवहार हो. !!

.............................................



# १०) पाला पाचोळा

पाला हा शब्द झाडपाला असा आपण वापरतो. व पाचोळा हा शब्द वाळलेल्या पानाचा खाली पडलेला कचरा या अर्थाने सर्वसाधारणपणे वापरण्याची प्रथा आहे. पण या ठिकाणी आपण पाला पाचोळयाचे महत्व काय हे या विषयीचे बाळूचे मत पाहू या.

पूर्वीच्या काळी विज्ञानाची फारशी प्रगती झाली नसल्याने जास्त साहित्य हे हस्तलिखीत आढळून येत होते. त्यामुळे अशा प्रकारचा साहित्य संचय कमी होता. पण नंतर जवळपास सन १५०० ते १६०० च्या दरम्यान छापण्याचे यंत्राचा शोध लागला व आस्ट्रेलियातील गुटनबर्ग या छापखाण्यामध्ये पुष्कळ प्रकारचे साहित्य छापल्या गेले होते. त्याकाळात वाटरमनने सूध्दा पेनचा शोध लावल्यानंतर बरेच लिखाण करण्यात आले. पण आजकाल त्यापेक्षाही महत्वाच्या शोधामुळे जसे की झेरॉक्स मशीन, सायक्लोस्टायलींग, टंकलेखन यंत्र, संगणक इत्यादी अत्याधुनिक यंत्रामुळे सर्व उपलब्ध साहित्याच्या एवढया प्रती तयार करण्यात येतात की अक्षरशः हजारों किंवा लाखों प्रती जगात एकाच वेळी वितरीत करता येतात. तसेच दैनिक वृत्तपत्राच्या माध्यमाने सूध्दा बराच कागदांचा कचरा तयार होतो. यालाच थोडक्यात पाला पाचोळा म्हणू या. जगात पूर्वी अलेक्झांड्रीया लायब्ररी फार प्रसिध्द होती त्यात चार लाखाचे वर पुस्तके होती पण आजकाल न्युयॉर्कसारख्या लायब्र-यांमध्ये पांच कोटीचे आसपास पुस्तके आहेत असे म्हणतात. हा कागदाचा कचरा किंवा पालापाचोळा पूर्वी तीस वर्षात दुप्पट व्हायचा पण सध्याच्या या अत्याधुनिक झेरॉक्स मशीनमुळे व संगणकाच्या माध्यमातून २०१२ पर्यंत उपलब्ध साठयाच्या दुप्पट दस्तऐवज प्रतीवर्ष होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे सांख्यिकी शास्त्रांचा अंदाज आहे. त्यामळे याबाबत बाळूला बरेचदा असे वाटते की, नोकरशाहीमध्ये जो झेरॉक्सींगचा कचरा आढळून येतो त्यास पाला पाचोळा म्हटले तर काय हरकत आहे. हे त्याचे मत असले तरी तो अशा कागदांना स्वतःचे घरी मात्र किती महत्व देतो ते पाहू.

या जगात ज्या थोर विभूती होवून गेल्या त्यांना वाचनाचा फार छंद होता असे म्हणतात. त्यात प्रामुख्याने अब्राहम लिंकन, बेंजामीन फ्रँकलीन, स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी कितीतरी अनगिनत मंडळी होवून गेली की ज्यांची स्वतःची लायब्ररी होती. व आजही त्यांचे नावावर ग्रंथालयाची नावे आहेत. अकोला येथे १८६९ ला स्थापन झालेले एक

बाबूजी वाचनालय आहे. असे म्हणतात की ग्रथालयाचा एक नियम आहे त्यात सध्या वृत्तपत्रसूध्दा रद्दीत देता येत नाही. असे वत्तपत्र वाचकांच्या संदर्भासाठी जतन करून ठेवल्या जातात. म्हणजेच असा पाला पाचोळा सूध्दा ग्रंथालयात आढळून येतो.

आता या बाबीला पाला पाचोळा संज्ञा देणे बाळूला अजिबात आवडत नसे कारण त्याला उपरोक्त विभूती प्रमाणे वाचनालयाचा फार छंद होता. बाळूचा स्वभाव अतिशय संयमी असला तरी त्याचे आवडीची वस्तू हरविली की तो फार चिडत असे. कोणत्याही ठिकाणी प्रथम तो बदलून गेला की सर्व प्रथम वाचनालय शोधत असे. त्याची पुस्तके म्हणजे त्याचेसाठी जीव की प्राण असे. बाळूची बायको त्याची आवड लक्षात घेता त्याचे कोणत्याही पुस्तकाला किंवा वस्तूस हात लावीत नसे. तो मात्र पैशाचा अपव्यय होणार नाही या पध्दतीनेच वाचनालय लावीत असे किंवा स्वस्त पुस्तकांचा साठा करीत असे. याबाबत तो बाबूजी वाचनालयाचा फार फॅन होता कारण हे अकोला येथील जगातील सर्वात स्वस्त वाचनालय आहे असे तो म्हणत असे. याचे कारण या वाचनालयात म्हणजे २०११ चे महागाइच्या काळातही वाचनालयाची फी केवळ २५ पैसे महिना म्हणजेच वार्षीक फी केवळ तीन रूपये अशी आहे. आजकाल फक्त दोन रूपये वाढवून पांच रूपये केली आहे असे ऐकले आहे. ही सत्यता आहे. त्यामुळे अशा दस्तऐवजांना पाला पाचोळा म्हणणे ही किती दुर्दैवाची गोष्ट आहे. म्हणूनच या पालापाचोळयाबाबत त्याचे नेहमी बायकोसोबत वितंड वाद होत असत. आणि होणेही स्वाभाविकच आहे. कारण आजच्या जगात कोणी २००४चे वृत्तपत्र वाचेल काय? पण बाळू पूर्ण जुने पेपर्स किमान एकदा चाळल्याशिवाय रद्दीत बायकोला फेकू देत नसत. सॉरी बायकोला रद्दीत फेकू देत नसत ...अरे एकच अर्थ होवून राहला. बाळूला म्हणायचे आहे की पेपर्सला फेकू देत नसत.

असा हा बाळूचा स्वभाव.. ज्या रद्दीला सर्वसामान्य मनुष्य पालापाचोळा म्हणतात त्यास बाळू इतके महत्व दयायचा .... मग होणार नाही कां वाद... त्या बिचा-या माऊलीच काय दोष ...बाळू एकदाचा देवालाही महत्व देत नसे तितके महत्व या पालापाचोळयाला दयायचा. या वाचन वेडयाची गंमत अशी की हा नोकरशाहीत असल्याने त्याची दर तीन ते पांच वर्षात बदली होत असल्याने त्यास बदलीबद्दल कधीच वाइट वाटले नाही जेवढे या पालापाचोळया बद्दल वाईट वाटत होते. काय व्हायचं की.. प्रत्येक गावांत जो पुस्तकांचा संग्रह व्हायचा तो बदली मुळे व मर्यादीत सामानाच्या आवाक्यामुळे काही जमा केलेले साहित्य त्यास मजबूरन फेकावे लागत असे त्यावेळी त्यास नेहमी वाटत राहायचे की, मोहम्मद घोरीने ज्याप्रमाणे जमविलल्या संपत्तीस पाहून रडून मरण पत्करावे त्याप्रमाणे याला हा पाला पाचोळा सोडतांना वाईट वाटत असे. कारण बदलीचे वेळी केवळ साडे तीन पोते तुमचा कचरा भरा असे त्याच्या बायकोची सूचना असे. हे

साडेतीन पोते एकदा साडेतीन शहाण्यांना सूध्दा वाईट वाटले नसते एवढे वाईट वाटत असे अशा त-हेचा छंद बाळगल्याने बाळूची बदली झाली की, हा बाळू मनोमन नोकरशाहीला शाप दयायचा. कारण नोकरशाहीमध्ये फक्त बदलीच्या वेळी सहा टन घरगूंती सामानच नेण्याची नियमात तरतूद आहे. तेंव्हा अशा वाचन छंदीष्ट बाळूला या सहा टनाची मर्यादा त्याचे टाळक्यावर सहा टन सामान आपटल्या सारखे वाटायचे. त्याची बायको घरगूती सामानाला पाला पाचोळा समजायची. घरगूती सामानाला जर पाला पाचोळा समजायचे असेल तर मग या बाळूसारख्या कर्मचा-याने नोकरशाहीतील झेरॉक्सच्या अनावश्यक कच-यास पाला पाचोळा म्हटले तर काय वाईट केले असे त्यास आजच्या ही क्षणाला नेहमीच वाटत असते.

…………………………………



# ११) शिफारसी

शिफारस म्हणजे एखादयाचे काम सुकर होण्यासाठी एखादया महान किंवा महत्वाच्या व्यक्तीने केलेली पत्राव्दारे स्तूती किंवा लिखीत स्वरूपात केलेली वाहवा. यात प्रसिध्द व्यक्तीच्या शब्दास मान दिल्या गेलेला असतो. या नोकरशाहीमध्ये पूर्वी कोण्या व्यक्तींची शिफारस, किमान नोकरी लागण्यासाठी तरी लागत नसे. कारण जुन्या काळात तत्वे सांभाळणारी माणसे होती. व त्याकाळी प्रामाणिकपणाला व सदगुणाला फारच वाव दिल्या जात असे. पण आज काळाच्या ओघात अत्याधुनिक काळ हा बदलत चालला असल्याने प्रथम नोकरी मिळण्यासाठी स्वतःचे गुणधर्म व प्रयत्न या व्यतिरीक्त कोण्यातरी महान व्यक्तीची किंवा प्रसिध्द पुरूषाची शिफारस असल्यास नोकरी मिळणे सोयीचे होते असा सर्वसामान्य अनुभव आहे. तसेच बरेचदा नोकरी टिकण्यासाठी सूध्दा उपरोक्त गोष्टीची आवश्यकता भासते.

या नोकरीमध्ये प्रत्येक कर्मचा-याला वर्षभ-यामध्ये भरपूर सूट्टया उपभोगायला मिळतात. त्यापैकी प्रत्येक रविवार, सरकारी सूट्टया, दुसरा व चौथा शनिवार, इत्यादी प्रकारच्या सूट्टया हया हक्काच्या मानल्या जातात. या व्यतिरीक्त किरकोळ रजा, वैद्यकीय रजा, बिनपगारी रजा (हा शेवटचा पर्याय)इत्यादी सूट्टया घेण्याची सवलत असते. पण हया सूट्टया म्हणजे त्यांचा हक्क नव्हे. असा नियम आहे. अशा सूट्टयासाठी वरीष्ठ अधिका-यांची योग्य मार्गाने परवानगी घेतल्यानंतरच हया सूट्टयांचा उपभोग घेता येत असतो. आणि जर एखादयाला कोणताच नियम पाळायचा नसेल तर नोकरशाहीमध्ये त्यास पळूनही जाता येते. अशा पळणा-या व्यक्तींना पगार मिळण्याची आशा तर नसतेच पण अशांना मात्र आपली नोकरी निश्चीतच जात नाही याची खात्री असते. कारण त्याची एक धारणा असते की प्रथम स्पष्टीकरण, नंतर त्याची फाइल तयार होणे इत्यादी अनेक जटील गोष्टीची त्याच जाणीव असल्याने तो बिनधास्त चाटा मारत असतो. त्यास हे सूध्दा माहित असते की अशा फाइल्स सहसा कोणी अधिकारी तयार करीत नसतो. कारण अशा व्यक्तींना नोकरीतून काढण्याची प्रक्रीया सूध्दा अतिशयच जटील आहे. एखादेवेळी लक्ष्मण रेषा पुसल्या जावू शकेल पण नोकरी जाणे कठीणच. समजा एनकेन प्रकारे यांची फाइल तयार झाली तर नोकरशाहीत कधी कधी तर त्या अधिका-याचीच फाईल तयार होण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा भानगडीत सहसा कोणी पडत नाही.

आता जे पळून जात नाही त्यांना मात्र रितसर शक्यतांवर सूट्टी टाकूनच जावे लागते. व ही सूट्टी मंजूर करवून घेण्यासाठी वरीष्ठांना भेटणे आवश्यक असते. यासाठी

समपातळीची मंडळी कधी कधी उपयोगात येते. बाळूच्या कार्यालयातील एक जीप ड्रायव्हर नेहमी त्याच्या विशीष्ट स्टाइलमध्ये सूट्टी पाहीजे असल्यास फक्त .... मस्का .... असे म्हणायचा. हे म्हणतांना सूरूवातीला उच्चारामध्ये थोडी गॅप ठेवून नंतर म व अजून थोडया गॅपनंतर स्का ...असे म्हणत असे. त्यास एखादयाने स्पष्टीकरण विचारलेच तर तो असे म्हणायचा की.. 'मस्का.. या शब्दाव्दारे मी आपणास नमस्कार म्हणालो' यातील सूरूवातीचा न हा सायलेंट आहे व नंतरचा र सूध्दा सायलंटच आहे. असा हा विचीत्र ड्रायव्हर. आहेत की नाही नोकरशाहीत कलाकार...

कधी कधी एखादया कार्यालयात किंवा संस्थेमध्ये अचानकच चहाचा कप किंवा कॉफी जाते त्यावेळी त्या चेंबरमधील बॉसला हे कळतच नाही की हे काय प्रकरण आहे. जेंव्हा त्यांचसमोर सूटीचा कोणाचा अर्ज दिसतो तेंव्हा त्यांना यथोचित बोध होत असतो. ज्यांना असे मस्का प्रवृत्तीचे प्रकार आवडत नसतात त्यांना एखादा कर्मचारी वेगळयाच पध्दतीने हाताळतो. एक शिपाई तर बाळूच्या नजरेस असा आढळला की शिपाई म्हणाला साहेब मी एका प्रायव्हेट दैनिकाचा संपादक सूध्दा आहे तेंव्हा तुम्ही जर माझी सूटीचा विचार करीत नसाल तर मी तुम्हाला पाहून घेतो. नाहीतर उद्या आपली कोणती तरी बातमी पेपरला येण्याची शक्यता आहे. व त्याचे म्हणण्यानुसार खरोखरच साहेबांच्या टेबलवर एखादया लोकल पेपरचे कटींग आढळून येते.

प्रत्येक कार्यालयात जसे मी मागील प्रकरणात सांगितले त्याप्रमाणे नेहमीच कोणतेही विक्रेते येत असतात त्याचप्रमाणे बाराही महिने कार्यालयात सर्व प्रकारच्या वृत्तपत्रांचे प्रतिनिधी, संपादक, वार्ताहर, इत्यादी मंडळी ठसणीने प्रवेश करीत असतात. अशी मंडळी साहेबांना मस्का मारण्यासाठी येत नसते तर प्रथम त्यांचे भले करण्याचे दृष्टीने प्रवेश करीत असतात. त्यांचे जवळ स्पायपेन कॅमेरा,, व्हाइस रेकॉर्डर किंवा इतर अत्याधुनिक लॅपटॉपसारखी यंत्रे असतात. यांचा वरीष्ठ अधिका-यांच्या चेंबरमधील प्रवेश अत्यंत आदर्शपूर्वक होत असतो. नमस्कार व चमत्कार झाल्यानंतर अशी मंडळी साहेबांनी न सांगताच त्यांचे समोर असणा-या आदरणीय खूर्चीवर बिना परवानगीने बसतात. हा प्रवेश करणारा ग्रूप दोन ते तीन या समुहात असतात. व आपले वक्तव्य सूरू करतात. सर आपण यावर्षी फार चांगले काम केलेले आहे. त्यामुळे आम्हाला आपला फोटो व थोडक्यात चरीत्र सांगा. म्हणजे आम्ही उद्या आपले नांव आमच्या प्रसिध्द दैनिक 'गल्लीगर्जन 'या साप्ताहिकात छापू. या आलेल्या तीन वैशिष्टयपूर्ण पत्रकारामध्ये एकाची दाढी गुंडयासारखी वाढलेली असते, दुस-याचे डोळे नुकतेच मद्य झोकल्यासारखे लाल असतात व तिसरा थोडा यांच्या तुलनेत सभ्य असतो. त्याचेजवळ संगणकीकृत 'गल्लीगर्जनेचे ' प्रमुख संपादक असे ओळख पत्र असते.

आता नेमकं होतं काय ? की आजकाल नवीन पिढीत वर्ग १ची नोकरभर्ती सरळ होत असल्याने त्यात नवीन तरूण मुलांची भरती, नव्यानेच वरीष्ठ पदावर झाल्याने त्यांना ही खोटी केलेली स्तूती खरी वाटू लागते. अर्थात प्रत्येक व्यक्तीला प्रसिध्दीची हाव असतेच की...एकदा या

नवीन पत्रकारांना वरीष्ठ अधिका-यांकडून होकार मिळाला की हे फोटोसाठी येणारा किमान खर्च रूपये पांचशे मागण्याचा प्रयत्न करतात. घासाघाशी नंतर यांचा किमान दोनशे रूपयाचा धंदा होतो. अशी ही किरकोळ पत्रकारांची मस्केबाजी असते. असा प्रकार खरे प्रमुख वृत्तपत्रकार कदापीही करीत नसतात. त्यांची पध्दत यापेक्षा थोडी Sophisticated असते. ते माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती मागत असतात. जसे देवालाही आरतीच्या माध्यमातून केलेली स्तूती आवडत असते त्याप्रमाणे कमी अधिक प्रमाणात या नोकरशाहीतील कर्मचा-यांना सूध्दा नमस्कार, स्तूती, चहा, कॉफी इत्यादी गोष्टी सूप्तपणे मानवी स्वभावानुसार आवडत असतात. यात अयोग्य काहीच नाही.

अलीकडच्या काळात तर मंत्री, खासदार, आमदार यांचे नांवावर किंवा त्यांचे शिफारस पत्र दाखवून प्रत्येक जण आपला हेतू साध्य करतांना दिसतात. नोकरशाहीमध्ये दबावतंत्र वापरल्यास नोकरीतून निलंबीत होणा-या कर्मचा-यालाही ताबडतोब कार्यालयात रूजू करून घेतल्या जात हे सव प्रकार शिफारस व मस्का या प्रकारामध्ये मोडतात. नोकरशाहीत जेवढया व्यक्ती तेवढेच मस्का मारण्याचे प्रकार असू शकतात त्यामुळे महिला कर्मचारीसूध्दा कशी मस्का मारते ते थोडक्यात पाहू.

नोकरशाहीतील महिला, आपल्या घरगूती महिलांसारख्या भोळया व नेभळट नसतात. त्या अनुभवातून कर्मचा-यांच्या सानिध्यातून अत्यंत चपळ, जागरूक व स्वयंकेंद्री असतात. त्या नेहमी आपल्या कामाशी काम बाकी सर्वांना रामराम या तत्वावर स्वतः खूर्चीवर कार्यरत असतात. पण यांना कार्यालयातून जेंव्हा सूटी घ्यायची असते त्या दिवशी सुंदर वस्त्र परिधारण करून, तसेच आल्याबरोबर एफसी ला म्हणजे प्रथम लिपीकाला नमस्कार करून आपल्या जागेवर स्थानापन्न होतात. थोडावेळ होताच काही कारण नसतांना कार्यालयात चहा वगैरे बोलावतात. म्हणजे सर्व खुष होतांना दिसले की हळूच घरी जाण्याची अनधिकृत परवानगी मागतात. नूकताच झालेला चहाचा परीणाम म्हणून प्रथम लिपीकाला या महिलेस सूटी देणे अपरिहार्य होते.

त्या कार्यालयाबाहेर निघताच नेमका मोठया साहेबांचा प्रवेश कार्यालयात होत असतो. ही अत्यंत दूर्दैवाची बाब असते. पण असा योगायोग नोकरशाहीत नेहमीच घडत असतो त्यामुळे पंचायत अशी होते की साहेबांची सूध्दा परवानगी घेणे क्रमप्राप्त होते पण अशी अनधिकृत परवानगी साहेबलोकं देत नसतात. तो त्यांचे पदाचा व दर्जेचा प्रश्न असतो. मग अशा प्रसंगी काही महिला सुहास्य स्मित करण्याचा प्रयत्न करतात पण हा प्रयत्न महिला सुंदर नसेल तर उपयोगी नसतो. म्हणून त्यांना वेगळया युक्त्या शोधाव्या लागतात. एकंदरीत त्यांना सूध्दा नोकरशाहीमध्ये मस्का मारण्याची किती आवश्यकता असते हे आता लक्षात आले असेलच.

पण असे म्हणतात की आजच्या जगात जगायचे असेल तर काळाप्रमाणे चला. तुमच्या जिवाला फारच मनःशांति हवी असेल तर मस्का मारावे नाहीतर आलिया भोगासी असावे सादर ! किंवा ठेविले अनंते तैसेची राहावे, मनी असू दयावे समाधान. अशा पध्दतीने नोकरशाहीत कर्मचा-यांना दिवस घालवावे लागतात. म्हणूनच असे वाटते....

आवश्यकच असतो शिफारस मस्का !

लागला आहे सगळयांनाच चस्का !!

कशाला उगी बरं, इमानदारी उस्का !

इमानदारीचा बार होइल नेहमीच फुस्का !!

..................................



# १२) पिट्टू

'पिट्टू' हा शब्द जगातल्या कोणत्याही शब्दकोशात सहसा आढळणार नाही किंवा या शब्दावर कोण्या भाषेची मक्तेदारी नाही. त्यास इंग्रजी, मराठी, हिंदी, उर्दू, तेलगू, कन्नड, मलयालम इत्यादी भाषेमधून उच्चारता येवू शकते. कारण याचे अस्तीत्व जगातील कोणत्याही प्रकारच्या नोकरशाहीमध्ये सर्वत्र आढळते. हा मनुष्य प्राणी, पाखरू, विषारी, बिनविषारी उपयुक्त अशा सर्व प्रकारामध्ये उपलब्ध होवू शकतो. तर असा हा पिट्टू प्रत्येक बॉस करीता एक या प्रमाणात असतो. याची थोडक्यात निर्मीती बघू.

नोकरशाही सरकारी असो की प्रायव्हेट. त्याचे याला बंधन नाही. पण पिट्टूची निर्मीती कशी होते हे पाहणे गरजेचे आहे. कोणत्याही नोकरीत बॉस हा असला तरी कोणताही बॉस पिट्टू पाळण्याच्या मनस्थितीत नसतो. किंबहूना त्यांना पिट्टूची आवश्यकता नसते कारण ते निर्णयक्षम, बुध्दीवादी, कुशल, कुशाग्र, वगैरे असतात. मग हा पिट्टू तयार कसा होतो. सर्वसाधारण गरज ही शोधाची जननी आहे असे म्हणतात. त्यामुळे नोकरशाहीमध्ये प्रत्येक कर्मचारी स्वतःची गरज स्वतः भागवू शकत नाही. अशी गरज भागविण्यासाठी माध्यमाची गरज असते. तेंव्हा बॉसच्या जवळ जाता जाता जवळीक निर्माण होणा-या कर्मचा-यापैकी कोणी एक हळूच असा पिट्टू तयार होत असतो.

याची वाढ एकदा पूर्ण झाली की मग तो बॉसच्या अनुपस्थितीत जवळजवळ बॉस सारखाच असतो मग त्याला सर्वजण सूप्तपणे भितात. शक्यतोवर तो चांगलीच कामे करण्याचा प्रयत्न करतो पण एखादेवेळी तो तुमचे काम बिघडवू सूध्दा शकतो आणि या प्रकारचे तंत्र त्याला एकटयालाच माहित असते. हे कौशल्य त्याला जन्मजात प्राप्त असते. याची बॉसलाही कल्पना येत नाही. या बाबतीत बॉस लोकं फार अनभिज्ञ असतात. अशा पिट्टू चे हे पद एका कार्यालयात एकच असते. दोन पिट्टू एका कार्यालयात सहसा एकत्र राहू शकत नाही. त्यांची भांडणे होवू शकतात. किंवा मग त्यांना त्यांचे कार्यक्षेत्र वाटून घ्यावे लागतात. शासनातील कार्यालयात पिट्टू होण्यासाठी किमान खालील कौशल्ये त्यास असणे अत्यावश्यक असते.

१. साहेबांची डोळेझाक करता येणे.

२. फाईल्स खाली वर करता येणे.

३. टायपिंग सेक्शन मधून चूक करुन घेता येणे.

४. साहेबांची वैयक्तीक कामे त्यांनी न सांगताच करता येणे.

५. साहेबांना वारंवार नमस्कार करता येणे.

६. त्यांना विनाकारणच घरी बोलाविणे.

७. स्वतःची सत्यता पटविणे.

८. वेळप्रसंगी त्यांची कामे स्वतःच्या पैशात करता येणे.

९. साहेबांना वारंवार मस्का मारता येणे.

१०. साहेबांच्या एकांतात त्यांचे पाया पडता येणे. वगैरे.... वगैरे.

उपरोक्त सर्व गुणांमुळे त्यास पिट्टूत्व प्राप्त होते. ही पितृत्व प्राप्त करण्यापेक्षाही श्रेष्ठ बाब आहे. आणि जर एकदा कां तो पिट्टू झाला तर बॉसची बदली होत पर्यंत त्यास कोणत्याही गोष्टीची फिकीर वाटत नाही. बॉस बदलून जातपर्यंत तो स्वतःसाठी एक सफारी शिवू शकेल एवढा श्रीमंत नक्कीच होवू शकतो. म्हणतात ना 'पुष्पासंगे मातीस वास लागे' त्याचप्रमाणे 'बॉससंगे पिट्टूस घास लागे '. अशा अवस्थेपर्यंत तो उन्नत होतो. हा पिट्टू बॉसचा सेवक असल्यामुळे, 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे, असा सर्व भू मंडळी कोण आहे' असे कार्यालयातील सर्वांनाच वाटत असते. तरी सूध्दा अशा या पिट्टू विषयी काही वाईट बोलणे किंवा त्याचेबद्दल चर्चा करणे हा नोकरशाहीत अक्षम्य गुन्हा होवू शकतो याचे परिणाम अतिशयच भयानक होवू शकतात. एकदाचा तुम्ही बॉसला नमस्कार नाही केला तरी चालेल पण या पिट्टूची मर्जी सांभाळणे, त्यास नेहमी विनाकारणच चहा, कॉफी पाजणे... एनकेन प्रकारे त्यास पटविणे इत्यादी कला, आपणास नोकरशाहीत टिकायचे असेल तर आत्मसात करणे आवश्यक असते. कृपया याचे सूध्दा प्रशीक्षण कोठे उपलब्ध नाही किंवा प्रशिक्षणाच्या शाखा सूध्दा नाहीत बरं का !

शक्यतोवर हा पिट्टू बदलीस पात्र नसतो. त्याच्या मागे बॉसपेक्षाही भयानक शक्त्या उभ्या असू शकतात. तसं हा प्राणी म्हटलं तरं प्रत्येक कर्मचा-यासाठी फारच फायदेशीर असतो. पण हयाचेशी शक्यतोंवर 'ना दोस्ती अच्छी ना दुश्मनी 'या तत्वावरच वागलेले बरे असते. हा नेहमी चांगलीच कामे करण्याचा प्रयत्न करीत असतो पण जर त्याचा हेतू साध्य झाला नाही तर मात्र तो तुमचे भरपूर वाईट करू शकतो. ही बाब त्याच्या स्वभावगुणांवर सूध्दा अवलंबून आहे. पिट्टू ला जर आपण चांगले मानले तर कालांतराने तो साहेबांचा चमचा किंवा चाटू होतो. त्याबद्दल पुढील प्रकरणाकडे आपण जाणारच आहोत.. करीता सध्या शासकीय नियमानुसार चहा, कॉफी घेण्याकरीता जावून या. तिकडनं आल्यानंतर तुम्हास एक कार्यक्षेत्रावरील असाच बाळूच्या पिट्टू चा प्रताप सांगणार आहे. त्यास विक्षीप्त अनुभवात घातले आहे.

............................

# १३) विक्षीप्त अनुभव

बारलिंगा या चिखलदरा क्षेत्रातील घनदाट जंगली भागात भीमकुंड नावाचा अतिशय प्राचीन व नैसर्गिक असा एक सुंदरसा धबधबा आहे. तो धबधबा पावसाळयात जवळ जवळ २५० मीटर खाली पडत असतो. पुढे ते पाणी दातपाडी नदीव्दारे वाहायला सूरूवात होते. या नदीच्या उजव्या बाजूला भव्य गाविलगड किल्ला अस्तित्वात आहे. अर्थात हा घनदाट जंगली भागात आहे.

त्यात मला नदीच्या सरीता मापन कामासाठी रिव्हर गेज पोस्ट उभे करण्याकरीता सर्वेक्षण करावयाचे होते... शुक्रवारचा तो दिवस ...उन ब-यापैकी तापले होते.... केवळ चार मजूर घेवून, मी माझ्या तांत्रिक सहाय्यकासोबत कार्यक्षेत्रावर सर्वेक्षण सूरू केले. अचानक एका मजूराला जंगलात आमच्या कार्यक्षेत्राजवळ एक विचीत्र दृश्य दिसले. त्या मजूराचे नांव दगडु. हा नावाप्रमाणे कोठेही दगड अचूक मारण्यात पटाईत.... दृश्य असे होते की कोणालाही थरकाप सुटेल... पण क्षेत्रिय अभियंत्यांना अशा दृश्याची सवय झालेली असते. या दृश्यात असे आढळले की एका मोठया अजगराने जवळपास तीन फूट घोरपडीला फक्त विळखा मारून घट्ट पकडून ठेवले होते. व घोरपडीला गिळण्याची प्रक्रीया अद्यपी पूर्ण व्हावयाची होती. व अजगर गूपचूप रायमुनीच्या काटयामध्ये निवांत बसला होता.

नैसर्गिक संवर्धनाच्या दृष्टीने त्यास त्रास देणे योग्य नव्हते. कारण त्याच्यामुळे आम्हास सर्वेक्षणास कोणताही अडथळा नव्हता. पण मनुष्य प्राणी हा विव्दान असला तरी त्यात वैचित्र्यपूर्ण स्वभाव ठासून भरलेला असल्याने या स्वभावाच्या अनुषंगाने आमचा मजूर दगडू जो माझा नोकरशाहीतील पिट्टू होता. त्याला हे दृश्य योग्य वाटले नाही. त्याने अजगराला मारण्याचा बेत आखला. त्याचा प्राथमिक उद्देश असा होता की अजगराने विळखा घातलेल्या घोरपडीस जीवदान मिळावे. मला उद्देश चांगला वाटल्यामुळे मी माझ्या पिट्टूस भीत भीत अनुमती दिली. अजगरास मारण्याचा भयानक कार्यक्रम तीन मजूरांमिळून ठरविण्यात आला .... यश आले तर अजगर ठार व घोरपड व आम्हास जीवदान ...अन्यथा अजगर जीवंत सूटल्यास आमच्या पैकी कोणासतरी अजगर गिळणार. आमच्या पिट्टू चा हा उपदव्याप जीवघेणारा होता पण माझा इलाज चालेना...

दगडयाने प्रथमच एक मोठा दगड अचूक नेम धरून अजगराच्या दिशेने भिरकावला. दगडाने कधी अजगर मारता येवू शकतो काय? पण प्रश्न आमच्या दगडू मजूराच्या आत्मविश्वासाचा होता. पहिल्याच दगडात अजगराचे मुनके अर्धवट जखमी झाले तो पूर्ण मरणे

शक्यच नव्हते. अर्धजखमी अजगराने घोरपड तेथेच सोडून अत्यंत चपळतेने रामुनीच्या काटयातून थेट नदीच्या वाळूवर १५ फूट लाब अशी झेप घेवून आमच्या जवळ छलांग मारली...आता आमचे व त्याचे अंतर केवळ २० फुटाचे होते. आमचे नशीब बलवत्तर.. त्या अजगराला आमच्या दगडू मजूराचा दुसरा दगड पुन्हा त्याचे तोंडाजवळील जखमेजवळ लागला. अजगर अतिशय घाबरल्यामुळे त्याने गुंडाळी घातली. या गुंडाळीमुळे तो स्थगित होवून एका जागेवर स्वतःचे मुनके लपवून बसला. याचाच फायदा घेत तीनही मजूरांनी एकाच वेळी ती मोठे दगड त्यावर आपटून त्यास गतप्राण केले होते हा चित्तथरारक प्रसंग झाल्यानंतर आम्ही विरंगुळा म्हणून त्याची लांबी आमच्या सर्वेक्षणाच्या स्टाफने मोजली. ती तब्बल २. ५० मीटर म्हणजेच साडेसात फूट भरली.

सर्वेक्षणानंतर मी व तांत्रिक सहायक बारलिंगा कॅम्पला परत आलो... आजचा दिवस शुक्रवार असल्याने नेहमीच्या मेनूप्रमाणे आमच्या दगडू मजूराने आमच्या आवडीचा पदार्थ म्हणजे मटनाचा बेत आखला.. रात्री नऊ वाजेपर्यंत मी व तांत्रिक सहाय्यक सर्वेक्षणाचे फिल्डबुक व जमीन पातळयांचा (levels Calculations )हिशोब पूर्ण केला. व जेवावयास दगडू याचे आदिवासी घरात गेलो. आदिवासी भागात मोहयुंक्त मद्य उपलब्ध असते. कारण त्याचा ते लोकं दवादारूसारखा उपयोग करीत असतात. त्यामुळे आम्ही सूध्दा सर्वेक्षणामुळे फार थकलो असल्यामुळे मद्याचा स्वाद घेतला. त्या मद्यधुंदीत आमचा दगडू म्हणाला सर आज एथेच्छ जेवायचे आहे कारण मी भरपूर मटन शिजविलेले आहे. मी आणि तांत्रिक सहाय्यक व दोन तीन मजूर एकत्र जेवावयास बसलो. तो वाढतच गेला.. आम्ही खातच गेलो.. तरी मटन संपत नव्हते.. जेवण झाल्याबरोबर त्वरीतच निद्राधीन झालो.

दुस-या दिवशी सकाळी दगडू म्हणाला, सर, अशी पार्टी आपल्याला आयुष्यात लाभणार नाही, मी म्हटले कां बरं ! सर काल आपण सर्वांनी जे खाल्ले ते काय होते, माहित आहे? मी म्हटले नाही. सर ती कालच्या अजगराने विळखा घातलेली परंतु जखमी न झालेली बेशुध्द घोरपड होती. म्हणूनच मटन भरपूर होते. अर्थातच रहस्य उघड झाल्यावर आम्ही अजूनही जिवत कसे आहोत याचे आश्चर्य वाटते.

असा हा माझ्या आदिवासी पिट्टू चा प्रताप.

पण हा आमचा चांगला पिट्टू असल्याने काही कां असेना त्याने प्रेमाने खावू तर घातले. आता यापुढे वाईट असणारे जे कर्मचारी चमचेगिरीची कामे करतात त्या चमचेगिरीविषयी पुढील प्रकरणात पाहू तत्पूर्वी याच पिट्टू चा आणखी एक प्रताप असा.

हा कोणालाही खावू घालण्यात फार वस्ताद होता. एकदा आमचे बॉस मॉमेडियन असल्याने त्यांना जेवणात साधे जेवण चालत नसे. त्यामुळे साधारणतः आम्ही त्यांचेसाठी नॉनव्हेजचीच व्यवस्था करीत होतो. पण नॉन-व्हेज म्हणजे आमची कल्पना चिकन किंवा मटन.

पण त्या दिवशी मात्र साहेबांनी 'मला बडे जेवण पाहिजे ' असे म्हटले .... क्षणभर मला ते समजलेच नाही ...पण आमच्या दगडूला मात्र या शब्दाचा लवकर बोध झाला. त्याने एका हॉटेल मध्ये जावून ...याची कल्पना दिली. ठरल्यानुसार साहेब जेवायला बसले...या जेवणामुळे साहेब अक्षरशः 'मोगँम्बो खुष झाल्यासारखे ' फार खुष झाले. आमच्या दगडूस विशेष असे बक्षीस म्हणून साहेबांनी त्यास एक शंभरची करकरीत नोट सूध्दा दिली. पण आश्चर्य असे की आजचे हॉटेलचे बिल मात्र अतिशयच कमी आले होते. त्यामुळे मी माझ्या दगडूकडे उगीचच आश्चर्यपूर्वक पृच्छा केली की - काय रे, दगडू ? आज आपल्या जेवणाचे हॉटेलमधील बील कसे काय कमी आले ?..

तो म्हणाला सर मी आज आपले पैसे वाचविण्यासाठी हॉटेलमधील सर्वात कमी रेट असलेले मटन म्हणजे साहेबांना, रेल्वे स्टेशनजवळ भटकणारे डुक्कर खावू घातले व तुमची व माझी ऑर्डर ही चिकनची दिली होती. असा हा आमचा नोकरशाहीतील पिट्टू !

..........................



# १४) हाँजी हाँजी

हाँजी हाँजी करणे म्हणजे एक प्रकारची चमचेगिरीच होय. चमचेगिरीला इंग्रजीमध्ये Sycophancy असे म्हणतात. नोकरशाहीमध्ये चमचेगिरी करणे ही अत्यंत सामान्य गोष्ट आहे. ज्या कार्यालयात चमचेगिरी करणारा मनुष्य आढळणार नाही असे कार्यालय शोधूनही सापडणार नाही. जसे दादागिरी, गांधीगिरी, मक्तेगिरी बॉसगिरी, असे शब्द समाजात रूढ आहेत त्यासारखाच हा चमचेगिरीचा प्रकार असतो.

बॉस कितीही विव्दान असले तरी त्यांचे कान हलके करण्याचे काम हा व्यक्ती करीत असतो आणि जर विव्दान माणसाचे कान उपजतच हलके असले तर मग चमचे बहाद्दरांचा या नोकरशाहीमध्ये विजय होवू शकतो. चमचेगिरी करण्याचा मुख्य हेतू काय ! कारण कारणाशिवाय कार्य कधीच घडत नाही असा आपल्या शास्त्राचा 'कार्यकारण भाव' आहे.

नोकरशाहीमध्ये जंगली वाघाने जसे सर्कशीत पाळीव प्राण्यासारखे वागावे त्याप्रमाणे कर्मचारी दररोज आपली कामे वेळेवर करीत असतात, किंबहूना भाकरीची लाज म्हणून तरी ते स्वतःच्या नोकरीशी प्रामाणिकच असतात, असे वाटते. पण नेमकी हीच गोष्ट चमचेगिरी करणा-या व्यक्तीला आवडत नसते. त्याला त्याचे स्वतःचे अस्तित्व निर्माण करावयाचे असते. पण एवढा प्रभाव दाखविण्याइतपत तो हूशार नसतो किंवा थोडक्यात एवढी त्यास बुध्दी नसते. पाण्यात बुडत आलेली वानरीन ज्याप्रमाणे मृत्युच्या प्रसंगी आपल्या डोक्यावरील पिल्यानांही जशी पाण्याखाली दाबते तसा हा चमचेगिरी करणारा मनुष्य आपल्याच सहकार्यांच्या, अतिशय गुप्त पध्दतीने वरीष्ठ अधिका-यांजवळ चहाडया करीत असतो म्हणजेच थोडक्यात कर्मचा-यांच्या पोटात मोठया प्रेमाने खंजर खूपसत असतो.

उदाहरणार्थ :- सर्व कर्मचारी समजा कार्यालयात १०.३० वाजता आपापल्या चेअरवर कार्यमग्न असतील तर हा चमचेगिरी करणारा व्यक्ती स्वतः उशिरा येवूनही सर्वप्रथम बॉसला त्यांचे कक्षात जावून नमस्कार करणार.. व कार्यालयाची पहिली माहिति ही देणार की सर कार्यालयात अजून बरीच मंडळी आली नाही. वास्तविक ही बाब या चमच्याला बॉसने विचारलेली नसते. मग अशा अनावश्यक बाबी बॉसला तो पुरवित असल्यामुळे कालांतराने कार्यालयासंबधी माहिती विचारण्याची सवय बॉसला लागून जाते. अशी आयती माहिती कोणाला नको असते.

आणि एकदा का अशी माहिती विचारण्याची सवय बॉसला लागली की या व्यक्तीचा नैतिक विजय होतो व हा बॉसचा पक्का चमचा होतो.

अशा चमचे लोकांचा सर्वच कर्मचा-यांना राग येणे स्वाभाविकच आहे. पण हा त्याचा वैयक्तीक स्वभाव असल्याने स्वभावाला औषधच नाही. या स्वभावामुळे शासकीय नोकरीमध्ये इमानदारीने काम करणा-याची मोठी तारांबळ होते. व त्याचे फार हाल होतात. कारण त्याचा वार्षिक गोपनीय अहवाल कारण नसतांना खराब होण्याची शक्यता असते.. फार थोडया व्यक्ती सोडल्या तर सहसा बॉस मंडळी, वर्षभ-यात कधीही सहकार्यांच्या कक्षात प्रवेश करीत नसतात. चमचेगिरी करणा-याचा असा गोड समज असतो की आपला सी. आर. अशा चमचेगिरीमुळे चांगला होईल. व अशा भावनेने हा हे कृष्ण कृत्य करीत असतो. परंतु प्रत्यक्षात कोणत्याही चमच्याचे आजपर्यंतच्या नोकरशाहीतील इतिहासात भले झाले असेल असे सध्या तरी शासन नोकरीत ऐकीवात नाही. मग हे असे कां करतो तर ही नोकरशाहीतील एक परंपरा आहे.

चमचाचे तुलनेत मागे वर्णिलेला पिट्टू बरा. कारण तो शक्यतोंवर चांगलीच कामे करतो. पण हा मात्र वाईटच कामे करीत असतांना आढळतो कारण यात त्यास एक प्रकारचा असूरी आनंद मिळत असतो. या व्यक्तींना काही व्यक्ती 'चाटू' असेही संबोधतात. आतापर्यंतच्या अशा चमचेगिरीच्या इतिहासात काय काय घडामोडी घडल्या त्याचा आढावा घेवू.

१. भल्या भल्या इमानदार कर्मचा-यांचे वार्षिक गोपनीय अहवाल खराब झाले आहेत.

२. कर्मचा-यांच्या अंतर्गत बदल्या झालेल्या आहेत.

३. अनेक कर्मचा-यांना विनाकारण बॉसच्या रागास सामना करावा लागला आहे.

४ काहींच्या बढत्या स्थगित झाल्या आहेत.

५. क्षेत्रिय अभियंत्यांना यामुळे कार्यक्षेत्रावर मार खावा लागला आहे.

६. चमचेगिरी ही कार्यालयाऐवजी घरगूती पातळीवर केली असल्यास सामान्यांचे संसार उध्वस्त झाले आहेत.

७. नोकरशाहीत नोकरदारांनी आत्महत्या केल्या आहेत.

८. अनेक बॉस लोकांचे स्वभाव बदल होवून ते वाईट प्रवृत्तीचे बनलेले आहेत.

९. अन्यायकारक प्रवृत्या बळावल्या आहेत.

१०. मंत्री पदावरूनही काही स्वच्छ मंत्री खाली घसरले आहेत.

११ आमदार, खासदार निवडणूकीत विनाकारण पडले आहेत.

ही यादी अनंत असल्याने व पुस्तकाच्या विस्तारभय नियमानुसार मी येथे संपुष्टात आणतो.

नोकरशाहीमध्ये ही चम्मच मंडळी सर्वच वरीष्ठांशी, श्री. वि. आ. बुवा हयांच्या पुस्तकात म्हटल्या प्रमाणे सर्वांशीच चमचा चमचा ओळख्या करीत असतात. ही मंडळी फार मोठया गर्दीत पहायला मिळू शकते. मला वाटते प्रसिध्द साहित्यीक उत्तम कांबळे यांच्या 'कुंभमेळयात भैरू 'या पुस्तकातील भैरूला कदाचीत अशी मंडळी कुंभमेळयात भेटली असावी त्यामुळेच भैरू पळत सुटला असावा असे पुस्तक वाचतांना जाणवते. म्हणूनच म्हणावेसे वाटते -

मचमच करीत येतो चमच, गर्दीत घुसतो खचाखच !

मंत्री महत्व याला फारच, म्हणून सर्वांना पडतो धाकच !!

म्हणजेच ''Sycophancy is a prime factor in bureaucracy"

……………………



# १५) टाईम पास

कर्म किये जा, फल की ईच्छा, मत कर ये इन्सान, जैसा कर्म करेगा वैसा फल देगा भगवान. या हिंदी गाण्यातील ओळी आहेत. याचा अर्थ गीतेच्या म्हणण्यानुसार प्रत्येक व्यक्तीला कर्म हे करावेच लागते. जर एखादा व्यक्ती आळशी असेल तरी झोप घेणे हे सुध्दा एक कर्मच मानावे लागेल. तसेच नोकरशाहीत प्रत्येक कर्मचायाला काहीना काहीतरी दिवसभर करावेच लागते. सकाळी ९.४५ ते ५.४५ ही कार्यालयाची वेळ असते. ही आठ तासांची वेळ कशी घालवावी हा नोकरशाहीतील कर्मचायांना मोठा गहन प्रश्न असतो. ज्यांना शासकीय कामात फारच आवड आहे अशा व्यक्ती स्वतःला मनापासून गुंतवन ठेवतात पण जे आळशी आहेत किंवा ज्यांना फुकटाचा पगार हवा आहे ते सदोदीत टाइम पास कसा करावा या विचारात नेहमी असतात. आता असे कर्मचारी काय करतात ते बघू.

सकाळी ९.४५ ते ११.४५ ही वेळ त्यांना घरीच उपयोगाची वाटते. या वेळात हिवाळा असेल तर उन्ह खात बसणे, उन्हाळा असेल तर एक तास थंड पाण्याने आंघोळ करीत बसणे, पावसाळा असेल तर पावसाचे कारण सांगून कार्यालयात उशिरा जाणे अशा प्रकारे नोकरशाहीत उपरोक्त वेळेचा दुरूपयोग अशी मंडळी करतात.

११.४५ ला येणारी ही सर्व मंडळी वरीष्ठ अधिका-याच्या दृष्टीने अगदी वेळेवर येणारी मंडळी असते. ही सवलत त्यांना वरीष्ठांकडून मिळालेली असते. यापेक्षा उशीर लावणाया व्यक्ती या शासकीय दृष्टया उशिरा येणा-या व्यक्ती म्हणून संबोधल्या जातात. वास्तविक यांचेवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही आजपर्यंत झालेली नसते याची त्यांना पूर्ण जाणीव असतेच. फक्त एखादे वेळी त्यांचेवर शिस्त भंगाची कार्यवाही केली जावू शकते याची जाणीव त्यांना पत्राव्दारे दिली जाते. पण शिस्त भंगाची कार्यवाही म्हणजे नेमके काय हे अजूनही कोणालाच माहित नाही. अपडाऊन करणारे व्यक्ती नेहमीच कार्यालयात उशिरा येत असतात. पण त्यांचा हा गुन्हा क्षम्य असतो कारण तो रेल्वे किंवा बसचा दोष असतो. ११.४५ ला कामाला बसल्यानंतर १२ वाजता नोकरशाहीत चहाची वेळ होत असते. चहात साधारण १५ मिनीटे जातातच. १२.४५ ते १.४५ ही कामाची वेळ अत्यंत महत्वाची असल्याने सर्व जण काम करतात परंतू ज्यांना टाइम पास करावयाचा आहे त्यांना विशेषतः बँकेची कामे, शाळेत मुलांना सोडून येण्याची कामे, किराणा आणण्याची कामे, बायकोला दवाखाण्यात नेण्याची कामे ही नित्य स्वरूपाची कामे असतात. ही सकाळची कामे झालीत. १.४५ ते २.१५ पर्यंत हा ऑथराईज लंच पिरीयड असतो. त्यात दुपारची

वामकुक्षी मिळविली तर दुपारचे ऑफीस साधारणपणे ३.०० किंवा ३.१५ ला चालू होते. ३.१५ ते ५.१५ ही सिरीयसली काम करण्याची वेळ कर्मचारी समजतात कारण काहीतरी दिवसभरात काम झाले पाहिजे असे प्रत्येक कर्मचायास मनापासून वाटत असते.

पण नेमके त्यावेळी नातेवाइक, मित्र, बाहेरील व्यक्ती इत्यादी रोज भेटीसाठी तयारच असतात. त्यांचे खातीरदारीकरीता किमान अर्धा तास तरी देणे ही नोकरशाहीतील कर्मचा--याची नैतिक जबाबदारी होवून जाते त्याला यांचा उपाय नसतो. पण हे फक्त कामव्यस्त व्यक्तीसाठी बरं कां. जे टाइम पास करणारे आहेत ते सहसा कोणाला चहा वगैरे पाजण्याच्या भानगडीत पडत नसतात. उलट त्यांनाच कोणी चहा पाजेल काय यासाठी बकरा शोधत असतात. किंवा चहाच्या टोळीमध्ये हळूच सामील होवून जातात. नंतर ५.१५ ला प्रत्येकालाच घरचे वेध लागतात. पण वरीष्ठ कार्यालयातील मंडळी मात्र ५.४५ नंतरसुध्दा ६.०० ते ६.१५ पर्यंत बसतात. कारण यावेळी मंत्रालयातून फॅक्स वगैरे येण्याची शक्यता जास्त असते.

याबाबतीत कनिष्ठ कार्यालये अतिशय सुखी असतात. त्यांना कार्यक्षेत्रावर होतो अशा सबबी सांगता येतात. विशेषतः कार्यालयातील वरीष्ठ अधिकारी हे बराच वेळ कार्यालयांत बसतांना दिसतात कारण त्यांचे जबाबदारीचे तुलनेत त्यांना वेळ कमी मिळत असतो. अशा प्रकारे साधारण कर्मचारी दिवस घालवीत असतात. जर आपल्याला काम नसेल तरी प्रत्येकाने आपल्या खूर्चीवर बसून राहाणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. त्यावेळी मग पेपर वाचन, पुस्तक वाचन, लेख लिखाण या गोष्टी निश्चीतच वाईट नाहीत उलट त्यामुळे ज्ञानवृध्दी होत असते. असे मला वाटते.

मी शाखा अभियता असतांना अशा वेळामध्ये आजपर्यंत हितवाद पेपरला ६२ पत्रे लिहिलेली आहेत तसेच मातृभूमी या वृत्तपत्रामध्ये विविध लेख लिहिलेले आहेत. तसेच आज उपविभागीय अधिकारी पदावर असतांना सुध्दा अधिकारी पदामुळे कमी काम असल्याने हे पुस्तक लिखाण स्वतः संगणकावर मराठीमध्ये स्वतः लिहीत आहे. ही गोष्ट मी अहंकार म्हणून सांगत नाही तर माझा केवळ एवढाच उद्देश आहे की प्रत्येक कर्मचायांनी जीवनाचा टाईम पास न करता काहीतरी सदुपयोग करावा एवढीच सदीच्छा आहे. या लेखात कोणास वाईट वाटले असल्यास त्यांनी मला माफ करावे. या पुस्तकाचा उद्देश केवळ वाचकांचे मनोरंजन एवढाच आहे.

उपरोक्त टाईम पास मंडळी साधारण कशी असते हे थोडक्यात पाहू. त्यांनी दिवसभर टाईम पास केला असतो हे त्रिवार सत्य असते. त्यामुळे त्यांचेमध्ये एक प्रकारचा न्यूनगंड तयार झालेला असतो. त्यामुळे स्वभावाने थोडे चिडखोर स्वभावाचे असतात. त्यांचेजवळ सबबी तयार असतात. ते सदोदीत भांडण्यास तयार असतात. वरीष्ठांनी काही म्हणण्याचीच देर असते की हे वरीष्ठांच्या अंगावर चढलेच म्हणून समजा. त्यामुळे ते संपूर्ण आयुष्यभर सुखी असतात. अशांना फारसे कोणी काम वगैरे सांगण्याच्या भानगडीत पडत नसतात.

संस्कृतमध्ये अशा आशयाचे सुभाषीतही आहे - निर्लजम् सदा सुखी. असाच एक शाखा अभियंता पाहीलेला आहे ही कल्पना आहे. पण त्याचे स्वभाव वैशिष्ठे आपणास सांगतो. हा व्यक्ती आयुष्यभर दाढी वाढविलेल्या अवस्थेत असतो. अर्थात सर्वच दाढी वाढविणारे असे नसतात. काहींना दाढी फारच शोभून दिसत असते. ज्यांना दाढी शोभून दिसत असेल त्यांनी हयाचेशी स्वतः तुलना करू नये. तर हा दाढी वाढविण्याचा उद्देश तो दोन प्रकारे सफल करतो. एक आयुष्यभरामध्ये महिण्याचे चार दाढयांचे ४० रूपये जरी धरले तरी वर्षाकाठी ४८० रूपये व ३५ वर्षाच्या काळात १६,८००/- रूपये वाचवित असतो. आणि दुसरा उद्देश म्हणजे यामुळे तो सदोदीत बिमार दिसत असल्याने त्याला कोणीही तब्येतीबद्दलच विचारीत असते व कोणताही उपविभागीय अभियंता किंवा वरीष्ठ अधिकारी त्यास काम सांगत नाही. तर असा हा व्यक्ती पगाराचा एरोल सुध्दा वसाहतीतील क्वार्टर मध्ये बडेबाबूच्या हस्ते बोलावीत असे पण त्याला पगार घेण्यासाठी सुध्दा कार्यालयात यावेसे वाटत नसे.

परंतू ही व्यक्ती हूशार नाही असे तुम्ही समजू नका. ही व्यक्ती चालाख आहे. अशा व्यक्तींना शासकीय नोकरीमध्ये टाईम पास कसा करावा याचे तंत्र उमगलेले असते. जर ही व्यक्ती हूशार नसती तर ती केवळ दोन वर्षात ए एम आय ई झाली नसती. पण या व्यक्तीस हे पक्के माहित आहे की, आपले प्रमोशन नाही. असे म्हणतात की, जास्त शहाणा त्याचा बैल रिकामा. त्याप्रमाणे ही व्यक्ती, जशी बदकाने राजहंसाच्या कळपात जावून बसावे त्याप्रमाणे पदवीधर यादीत जावून बसला. आता नेमके झाले काय की शासनाने १९७६ चे सर्व पदविका धारकांना बढती दिली परंतु अशा व्यक्ती पदवी यादीत १९८३ मध्ये जावून बसल्यामुळे हयाचे प्रमोशन झाले नाही. याशिवाय ही व्यक्ती सध्या झालेल्या पदवीधरांच्या शासन मुलाखती मध्ये सूध्दा उत्तीर्ण झाली नाही असे नुकतेच कळले आहे. यालाच म्हणतात कर्मयोग. म्हणून टाईम पास करणा-या मित्रांनो, आता तरी शासनाशी प्रामाणिक राहाण्याचा प्रयत्न करा, अन्यथा असे भोगाल.

काही टाईम पास मंडळी कार्यालयात सकाळी आल्याबरोबर देवाची पूजा वगैरे साधारण एक तासभर करतात. अशा पूजेला बॉस मंडळी सूध्दा काहीही म्हणू शकत नाही. उलट ते या कार्यात ईतर सहकारी मंडळींना असे काही व्यस्त करतात की काही दिवसानंतर त्यांना सूध्दा अशी आवड निर्माण होते. विशेषतः महिला वर्ग तर कार्यालयात श्वेटर विणणे, कागदावर डिझाईन्स काढणे ईत्यादी कामे करतांना आढळतात. काहीच नसले तर गप्पा गोष्टींना अतिशय उत येत असतो.

कार्यालयात टाईम पास करणे ही सूध्दा एक कलाच आहे असे म्हणावे लागते. कधी कधी तर बॉस मंडळी सूध्दा, त्यांना जर बोअर झाले तर सहका-यांना बोलावतात व स्वतःचा वेळ घालविण्याकरीता ईकडच्या तिकडच्या गप्पा करतांना आढळतात. वास्तविक योग्य वेळ कशी घालवावी यासाठी मी माझेच एक उदाहरण येथे दयावेसे वाटते. १९९४ ते २००५ पर्यंत

मी अमरावती येथे पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण संकल्पचित्र उपविभागामध्ये कार्यरत होतो. त्यावेळी आम्हास फारसे कार्यालयीन काम नव्हते. अशा वेळी मात्र नित्य नियमाने जास्तीत जास्त पुस्तके वाचण्याचा छंद मनाला लावून घेतला. व या अकरा वर्षांच्या काळामध्ये इंग्रजी १६० व मराठी व हिंदी मिळून एकूण आजपर्यंत ६०० पुस्तकांचे वाचन झाले आहे. या कारणामुळेच मला आज पुस्तक लिहिण्याची ईच्छा झाली आहे. त्यामुळे येथे असे म्हणावेसे वाटते की,

करू नका जीवनात कधी टाईम पास,

भोगाचा आवळेल गळयाभोवती फास.

जीवनात असू द्या प्रयत्नांची कांस,

प्रत्येक क्षण असतो ईश्वरी तास. /१/

उपरोक्त सर्व घटनांचा कोणाशी चूकून योग जूळत असेल तर यास लेखक जबाबदार नाही. याचा उद्देश केवळ मनोरंजन असा आहे..

..............................



## १६) नोकरशाहीतील निरोप समारंभ

माझ्या मागील प्रकरण क्रमांक २ मध्ये मी बदलीविषयी लिहिलेले आहे सरकारी नोकरी मध्ये प्रत्येक कर्मचा-यांची बदली होत असते. त्यानुसार बदली कर्मचायामध्ये जर वरीष्ठ अधिकारी असेल तर त्यांना साधारपणे निरोप देण्यात येत असतो. अशा निरोप समारंभाचे वेळी प्रत्येक कर्मचा-याची वेगळीच मनस्थिती असते. या निरोप समारंभासाठी जेंव्हा पैसे गोळा केले जातात तेंव्हा काही कर्मचा-यांची पैसे देण्याची अजिबात ईच्छा नसते. याला मुख्य कारण म्हणजे बरेचदा लहान कर्मचायांना अशा प्रकारचा निरोप दिल्या गेलेला नसतो. त्यामुळे ते त्रस्त असतात. अशा त्रस्त परिस्थितीत या होणाया निरोप समारंभामध्ये कोण काय बोलेल याचा भरवसा नसतो. म्हणजे हा निरोप समारंभ न होता कधी कधी तो आरोप समारंभ होण्याची शक्यता असते.

तरी सुध्दा प्रत्येक व्यक्ती अशा निरोप समारंभासाठी अत्यंत उत्सुक असते. कारण प्रत्येकाला असे वाटत असते की आपण सगळयांशी नोकरी काळात फारच चांगले वागत आलो आहे. विशेषतः वरीष्ठ अधिकारी वर्गामध्ये असा समज फारच आढळून येतो. ते या नोकरीच्या काळात सर्वांचा सी. आर. लिहीत आलेले असतात. आणि अशा निरोप समारंभाचे वेळी मात्र त्यांचाच सी. आर. या समारंभात सहका-यांकडून ऐकायला मिळणार असतो. तसेच एखादी भेंट वस्तू सुध्दा यांना मिळण्याची शक्यता असते. वास्तविक यामागे जे रहस्य असते ते निराळेच असते. बरीच मंडळी अशा कार्यक्रमाला आवर्जून अनुपस्थीत असतात. यात फक्त औपचारीक भाषणे व फराळाचा समावेश असतो. कधी कधी तर ही व्यक्ती लवकर केंव्हा सटकेल याची कर्मचारी वाट पाहात असतात. या नोकरशाहीत एखाद्या अधिका-याची जर बढती झाली असेल तर मात्र त्यास पार्टी मागण्यास सर्व मंडळी उत्सुक असतात पण त्यांना निरोप दयायचे म्हटले तर प्रत्येकाच्या अंगावर काटा उभा राहात असतो.

अशा कार्यक्रमासाठी निधी गोळा करणारा एक विशिष्ट वर्ग असतो. कारण त्यात त्यांचा ही एक सुप्त उद्देश असा असतो की यातले काही पैसे सामान आणतांना काढता येतील काय. अशा व्यक्ती या कार्यक्रमात फारच उत्साही असतात. या कार्यक्रमातील विशेष असे की यात भाषण देण्यास सहसा कोणी स्वतः होवून तयार होत नसतात तर त्यांना धरून बांधून तयार करावे लागते. या व्यक्तीच्या भाषणाकडे फक्त निरोप मूर्तीचेच लक्ष जास्त असते. बाकीच्यांचे लक्ष फराळ कोण तयार करीत आहे, प्लेट्स व्यवस्थीत भरल्या जात आहे किंवा कसे, पाणी पिण्याची व्यवस्था काय केली आहे याकडे असते. एकदा हा कार्यक्रम झाला रे झाला की जाणारा व्यक्ती हा किती वाईट होता याचेच चविष्ट वर्णन ऐकायला मिळते. ज्यांना कर्मधर्म

संयोगाने सेंड ऑफ झाला नाही अशा अधिका-यांना किंवा कर्मचा-यांना पुढची सोयिस्कर डेट दिली जाते जी त्यांचे आयुष्यात कधीही पहायला मिळत नसते. या व्यक्ती वाईट असतात असे नव्हे तर त्यांचे विशिष्ट लोकांशीच प्रेम संबंध असल्याने त्यांना प्रत्येकाने स्वतःच्या इच्छेनुसार निरोप दिलेला असतो. व त्यांचेकडूनही पार्टी खाल्लेली असते.

असाच एक गंमतीदार प्रसंग सांगतो. नुकतीच एका शाखा अभियंत्याची बदली झाली व तो बढतीवर उपविभागीय अधिकारी पदावर पदोन्नत होवून जाणार हे जवळ जवळ निश्चित झाले होते. महाराष्ट्र शासनाकडून आदेशही प्राप्त झाला. जो तो त्यास पार्टी मागू लागला. तो बिचारा साधा भोळा असल्याने त्याने प्रत्येकास स्वतंत्र पार्टी देण्याचे काम सूरू ठेवले. ब-यापैकी खर्च म्हणजे जवळपास चार हजाराचे आसपास तरी केला असेल. हा शाखा अभियंता ज्या जिल्हयामध्ये कार्यरत होता त्या जिंल्हयामध्ये दारूबंदी होती त्यामुळे पार्टी करण्यासाठी वैनगंगा नदी पार करुन चंद्रपूर जिल्हयाचे काठावर जावे लागत होते. पार्टीमध्यं ठरल्यानुसार हा अभियंता केवळ ५०० रूपयापर्यंतचीच पार्टी देण्यास तयार होता... पार्टी झाली...त्यापैकी एकास ही फुकटची दारू चढली. पार्टी संपत आली तरी तो दारूच्या आग्रहासाठी अडुन बसला.. पार्टी झाली असली तरी मी माझ्या पैशाने पिवू शकतो .... अर्थात या गोष्टीला आमच्यापैकी कोणीही विरोध दर्शविला नाही. त्यामुळे अजून पिणे सूरू झाले... वरचा खर्च अर्थात तो स्वतः करणार होता. पण दारू चढल्यामुळे तो चक्क भांडावयास निघाला.

आलेले तीन मित्र सोबतच आले असल्याने परतीच्या प्रवासातील १३ किलोमीटर अंतर सोबतच जावू असे ठरले. पण भांडणारा व्यक्ती एकटाच समोर निघाल्यामुळे इतरांना चिंता वाटत होती. नेमके जे नको तेच झाले. तो रात्री ८.३० चे सुमारास रस्त्याच्या कडेने मोटरसायकल स्लीप झाल्याने आडवातिडवा पडला होता. त्याची घडयाळ, मोबाइल, पॉकेट व इतर किरकोळ साहित्य जसे एटीएम कार्ड इत्यादी सर्व हरवले होते. यावरून एक सिध्द झाले की ज्या व्यक्तीने मित्र समजून सर्वांना निरोप दिला त्या व्यक्तीस मात्र बढतीवर जातांना कोणीही साध्या चहास विचारले नाही. असे असतात नोकरशाहीतील निरोप समारंभ.

एक बॉस बदलून जातांना, ते कडक स्वभावाचे असल्याने त्यांना निरोप देण्यास कोणाची तयारी नव्हती. तेंव्हा जातांना ते स्वतः सर्वांना म्हणाले की मी आता जातो आहे मला निरोप वगैरे देता की नाही. पण त्यांना कोणीही शेवटपर्यंत निरोप दिला नाही. म्हणूनच नोकरशाहीत असा निर्णय घेतला असावा की नोकरीमध्ये समारंभ वगैरे करू नयेत. अशा समारंभामध्ये अधिका-यांची उगीच खोटी स्तूती करावी लागते. व औपचारीकता पाळावी लागते.

..............................

# १७) बॉस

बॉस म्हणजे हा या नोकरशाहीतील वरीष्ठ अधिकारी. हा सामान्य माणसासारखा व्यक्तीच असतो हे तो सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यास जाणवत असते. पण व्यक्ती तितक्या प्रकृती म्हणजेच जेवढे बॉस तेवढे स्वभाव. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा असतो. व स्वभावो दुरती क्रमः! असे म्हणतात. म्हणजेच स्वभावाला पर्याय किंवा औषध नसते. त्यामुळे त्यांचा स्वभाव चांगला असणे हा दुर्मिळ योग या नोकरशाहीमध्ये क्वचितच आढळून येतो. चांगला व वाईट बॉस याचे गुणोत्तर १ : ९९ असे असते असे म्हणावयास हरकत नाही. एखादेवेळी जंगली श्वापदाला नमविता किंवा पाळीव बनविता येवू शकते पण बॉसला पटविणे हे सामान्य माणसाचे काम नक्कीच नव्हे.

कोणास पटविणे ही सूध्दा मागे उल्लेखिल्या प्रमाणे ६५ वी कला आहे. आजकालचे म्हणजे अत्याधुनिक बॉस हे पूर्वीच्या बॉसच्या तुलनेत चांगले आहेत असे म्हणावे लागेल. कारण काळाचा बदल. जुनी पिढी व नवीन पिढी. असा तो बदल.. जुन्या काळात ज्याप्रमाणे आई वडिलांचा आदर ठेवून त्यांना सामान्य बालक भीत असे व एक तफावत आढळून येत असे, तसेच सर्वांना वरीष्ठांबद्दल भितीयुक्त कां होइना पण आदर होता. तसे आजकाल आढळत नाही.. सर्वच बॉस मंडळी आज चांगल्या स्वभावाची आढळते. अर्थात चांगला कोण व वाइट कोण ही परिभाषा ‘अल्बर्ट आइन्स्टाईनच्या भाषेत सापेक्ष आहे. एखादा बॉस नोकरशाहीत चांगला असेल तर तो कर्मचा-यांसाठी वाइट असू शकतो व जो कर्मचा-यांसाठी चांगला असेल तर तो नोकरशाहीत वाइट असू शकतो. असे सर्वसाधारण नोकरशाहीतील धोरण आहे. हा कर्मचारी व नोकरशाही यांचे दृष्टीने ‘विशेष सापेक्षता सिध्दांत आहे.

नोकरशाहीत लवकर प्रवेश करणा-यांना साधारण ३६ वर्षे व उशिरा प्रवेश करणा-या व्यक्तींना, सेवाकाळात साधारणतः पांच बदल्या गृहीत धरल्या तरी किमान पांच निरनिराळया बॉस सोबत पाला पडत असतो. म्हणजेच आमने सामने टक्कर दयावी लागते. त्यापैकी या ठिकाणी प्रत्यक्ष व्यक्तींची नावे, स्थळ, काल्पनीक समजून केवळ मनोरंजनाच्या हेतूने काही प्रसंग सांगण्याचा मानस आहे तथापि या घटनांशी कोणाचा संयोग जूळून येत असल्यास त्याचे वाईट न मानता याचा आनंद काल्पनिक कथेसारखा घ्यावा अशी बाळूची ईच्छा आहे कारण यात व्यक्तीशः कोणाची टिका करण्याचा बाळूचा हेतू नाही.

एका प्रकल्पावर बोगदयाचे खणणे सूरू होते. बोगदा हा दहा मीटर लांबीला एक मीटर खाली जात असे या उताराने जवळ जवळ ९०० मीटर झाला होता. त्यामुळे आंत अंधाराचे साम्राज्य पसरले होते. तशातही नुकताच ब्लास्ट झाला असल्याने आंत हवेचे Suffocation झाले होते. आठ तासाच्या शिफ्ट डयुटीमध्ये सतत आंत थांबणे एकदाचे शक्य झाले असते पण ब्लास्टमुळे आंत थांबणे अजिबातच शक्य नव्हते. आणि नेमकी याच वेळी बोगदयाला वरीष्ठांची या कार्यस्थळास भेंट ठरली होती.

बोगदा जसा दिवसेंदिवस आंत खणल्या जात होता तसे तसे मजूरांना नैसर्गिक कॉलसाठी बोगदयाच्या बाहेर जाणे वेळोवेळी शक्य होत नव्हते. त्यामुळे अर्थातच मजूरांनी अंधाराचा फायदा घेवून बोगद्यातच घाण करण्याच्या सवयी लावून घेतल्या होत्या. त्यामुळे आतील वातावरण अतिशयच (Obnoxious) असहनीय होते. आणि अशा परिस्थीतीत बॉस मंडळी 'आपण सर्वांनी आंत थांबावे 'असा आग्रह करीत होती.

अधिका-यांची जीप आली व कार्यक्षेत्र न पाहाताच निघूनही गेली पण बाळूचे बॉस कडक असल्याने ते केंव्हा वापस जातात हे पाहाण्याकरीता नोकरशाहीत एक मजूर बोगद्याबाहेर उभा ठेवला होता. बॉस निघूनही गेले पण बाळूच्या हया पठ्ठयाने बाळूला बॉस गेल्याचा निरोप बोगदया मध्ये येवून दिला नाही. त्यामुळे बाळूचा राग अनावर झाला व बाळूसमूह दुस-या दिवशी त्या बॉस वर विनाकारणच राग व्यक्त केला. राणा प्रतापासारखी मिशा असलेली ती व्यक्ती अत्यंत रागीट स्वभावाची असूनही बाळूच्या मित्र समूहापुढे एकदम अवाक् झाली. याचे आश्चर्य वाटले. व क्षणभर त्यांचा दोष नसतांनाही बोलल्याचे पश्चातापपूर्वक बाळू व त्याचे मित्रास वाईटही वाटले.

.......................

कार्यक्षेत्र समुद्रसपाटीपासून ३६०० फूट उंचीवर होते. घनदाट जंगलातून जवळपास सहाशे रस्ता वळणे घेतल्यानंतर चिखलदरा येत होते. तेथून ६ किलोमीटर वर कार्यस्थळ होते. एक छोटासा कँम्प तात्पूरत्या स्वरूपात टेंट उभारून तयार करण्यात आला होता सर्वेक्षणाचे काम जवळपास संपुष्टात आले होते. कार्यकारी अभियंत्याची कार्यस्थळास भेंट आयोजीत करण्यात आली होती. व्यक्ती उंच व रूबाबदार होती. वरीष्ठांची भोजन व्यवस्था करणे आमचे आद्य कर्तव्य होते. पण भोजनापेक्षा जास्त धाक वाटत होता तो, ते काय प्रश्न विचारतील याचा. कारण

चिखलद-याच्या जंगलातील भीम कुंड दरीत सर्वेक्षण करणे म्हणजे मृत्युस आमंत्रण दिल्या सारखे होते. पण बाळूच्या टोळीने सर्वेक्षण कसे बसे पूर्ण केले होते.

फीडर धरणाची रेषा वरीष्ठांना दाखवायची होती. चिखलदरा उदंचन योजना (noxi Chikhaldara Pumped Storage Scheme) होती. अत्यंत भयभीत अवस्थेत बाळूटीम होती. कारण धरण रेषा मार्क करूनही घनदाट जंगलामुळे ती दूरून दिसत नव्हती. म्हणजेच बाळूटीम वर ते फार रागवणार असे बाळूस वाटत होते. नियोजीत वेळी ते कार्यस्थळावर आले. साईट पाहली. बाळूटीमचे चेहरे पाहून त्यांनी अंदाज केला होता की हे सर्वेक्षण कठीण आहे. परंतू आश्चर्य असे की, धरण रेषा दूरून प्रत्यक्षात दिसत नसूनही त्यांनी 'धरण रेषा मला स्पष्ट दिसत आहे असे ते म्हणाले. व आपण कॅम्प कडे परत जावू. त्यानंतर मी तेथे काही प्रश्न विचारीन असे वरीष्ठांनी बाळूस म्हटले. त्यामुळे बाळूस पून्हा घाबरटपणा सूरू झाला की हे परत काय विचारणार आहेत.

कॅम्पवर गेल्यावर त्यांनी तांत्रिक प्रश्नाऐवजी खालील प्रश्न विचारले. १. खानेमे क्या बनाया २. नॉन-व्हेज अगर बनाते होंगे तो मैने हलाल किये बगर मूर्गा पकाना नही. ३. खर्चेका इंतजाम कैसा किया. ४ इंतजाम अगर नही किया होगा तो मैने तरकारी लाया हूँ! आप सिर्फ रोटी तयार रक्खो. बाळू आणि त्याचा तांत्रिक सहाय्यक दोघेही दिव्य. बाळूला त्यांची उर्दूमिश्रीत हिंदी समजलीच नाही. बाळूला वाटले तरकारी म्हणजे तर्री किंवा रस्सा साहेबांनी आणलाच आहे व फक्त पोळया तयार ठेवायच्या आहेत. बाळूच्या तांत्रिक सहाय्यकालाही उर्दूमिश्रीत हिंदी समजलीच नाही. हे बाळूला माहित नव्हते. तो म्हणाला साहाब मूर्गी हलाल करणेवाले है म्हणजे मूर्गी शोधणे वाले है. म्हणून बाळू बसला गूपचूप. तेवढयात साहेबांनीच हालचाल सूरू केली व महादेवाच्या (बाळूच्या मजूराच्या ) हाताने मूर्गा बोलाविला. त्या जंगलातील चपळ स्वभावाचा मूर्गा साहेबांना पाहून धास्तावला. बाळूकडेही त्याने दयाळू नजरेने पाहिले. पण बिचा-याला भावना व्यक्त करता येत नव्हत्या.

बाळूचे उर्दूचे अज्ञान पाहून साहेब म्हणाले -हमारे इस्लाममें हलाल याने मंत्र पढा जाता है. म्हणजे तुमच्या मराठयासारखे आम्ही मूर्ग्याची् पूर्ण मान कापत नाही. बाळूला वाटले मूर्ग्याची मानहानी होते की काय? आम्ही त्याचे रक्त वाहू देतो याने उसको शांति मिलती. पूढे बाळू मनात म्हणाला आणि आपण ती शांति शांततापूर्वकही खात नाही. मुर्गा खाण्यास अधाशासारखे खाण्यास भिडतो. असो. ठरल्यानुसार त्या निष्पाप मुर्ग्याचा काळ आणि वेळ दोन्हीही बाळूच्या साहेबांनीच निश्चीत केल्या होत्या. महादेवाजवळचा मूर्गा साहेबांनी घेतला, त्यास आडवा पाडला, सरपे टोपी पहनके मंत्रोच्चार हुवा. त्याचे मानेवर सूरी फिरविण्याचा साहेबांचा प्रथम प्रसंग होता की काय ? बाळूला ठावूक नव्हते. बाळू तो सोहळा -संत तुकारामासारख्या 'याची देही याची डोळा 'व मूर्ग्याचे मरण पाहिले म्यां डोळा ' या भावनेने अगदी निष्पापपणे न्याहाळत होतो.

बाळूचा ड्रायव्हरही मध्येच बकला. व म्हणाला 'देव तारी त्याला कोण मारी' बाळू म्हटला -अपना साहाब मारी. इतक्यात आश्चर्य घडले. क्षणात देव वृष्टी झाली आणि अचानक साहेबांनी फिरविलेली सूरी मुर्ग्याच्या मानेवरून अलगद फिरविल्या गेली की काय एकदम अचानकपणे 'रामदासाने लग्नाच्या बोहल्यावरून तातडीने पळावे तसा विद्युत वेगाने मुर्गा साहेबांच्या तावडीतून सूटला. व प्रकाशाएवढया वेगाने जंगलात पळत सूटला.

बाळूच्या ड्रायव्हरचे म्हणणे मूर्ग्याला वर मिळाल्यासारखे खरे ठरले. म्हणून साहेबांनी रागाने त्यास साहेबांनीच आणलेली तरकारी म्हणजे पालक भाजी त्यास शिव्यासोबत खावू घातली. व बाळू व मित्रांनी त्या दिवशी पालक भाजीचाच आनंद घेतला. असा हा नोकरशाहीतील प्रताप आहे. पुढे पळालेल्या मुर्ग्याचे Investigation करण्याचे काम बाळूने तांत्रिक सहाय्यकावर सोडून अखेर तो कॅम्प सोडला.

..................

अचानक कार्यालयात एका बावीस वर्षाच्या तरूणीने प्रवेश केला. तिच्या साडीचा सुगंध व तिचे लावण्य पाहून एक म्हातारे वरीष्ठ लिपीक, जे सदोदीत कार्यालयात खूर्चीतल्या खूर्चीत झोपा काढायचे किंवा लिहीतांना सूध्दा त्यांचा डोळा लागत असे अशी व्यक्ती प्रवेश करणा-या त्या नवीन महिलेकडे स्वतःचा डोळा हळूच वर करून विस्फारून पाहात होती.

नोकरशाहीतील नेहमीच्या घाणेरडया कार्यालयात सुगंध दरवळल्यामुळे सर्वांनाच असे वाटले की, कोणीतरी गेस्ट वुमन आली असावी. पण लवकरच सगळयांचा अंदाज चुकला कारण ती महिला उपविभागातच चक्क जॉईन व्हायला आली होती.. कोणत्याही कार्यालयात एखादी महिला रूजू होणार ही त्या काळातील नवल विशेष अशी गोष्ट होती. म्हणजे त्या काळात तिला मैत्रीण असे सर्व गृहीत धरायचे. ही महिला जॉईन होताच एका कंजूष कर्मचा-याने पूर्ण उपविभागासाठी चहा बोलाविला. ही गोष्ट त्याला दुष्काळात तेरावा महिना वाटली नसून सुकाळात पहिला महिना वाटला असावा, असे त्याचे चेह-यावर भाव दिसत होते. अर्थातच चहा सूरू असतांना सर्व कर्मचारी आपला स्वतःचा परिचय लवकरात लवकर त्या महिलेस करून देण्याचा प्रयत्न करीत होते.

इरीगेशनमध्ये साधारणपणे हैड्रो- आय पी आय (Hydro electric & Irrigation Projects Investigation ) ची कार्यालये नेहमीच मुदार्डासारखी निस्तज

असतात. पण आज कार्यालय बांधकाम विभागासारखे् वाटत होते. ज्यांचे रूटीन कपडे मळके व दाढी वाढलेली असायची, त्यांना आपण आज स्वच्छ नसल्याची खंत वाटायला लागली होती. लवकरच जॉइनींगचा सोहळा पार पडला. कार्यालयाचे बॉस आज बाहेर जावून येणार होते. कारण त्यांचे कडे ॲडिशनल चार्ज होता. त्यांचं वास्तव्य आमच्या कार्यालयात फार तर एक महिन्याकरीता असेल. सर्वसाधारण बॉस लोक कार्यालयात उशिरा येत असतात. हा नोकरशाहीतील विधीलिखीत नियम आहे. पण यावेळी बॉस वेळेवरच आल्याचे आढळले.

कार्यालयातील आज नव्याने आलेल्या व्यक्तीचा प्रथम कोण परिचय करून देइल याची कर्मचा-यामध्ये चढाओढ लागली होती. डिपार्टमध्ये त्याकाळी स्त्री कर्मचा-यांना विदर्भात 'बाई' म्हणत असत. पण सर्वांच्या तोंडी मॅडम असा शब्द ओकल्या जात होता. मॅडम आणि बाई यातील खरा अर्थ त्यादिवशी कळला. सर्वसाधारण ती बाई आणि सुंदर व झकपक ती मॅडम. आपल्याला कोणता वेगळा अर्थ माहित असेल तर कळवा. तर बॉस आल्याबरोबर त्या निस्तेज लिपीकाने, उसणे तेज व आनंद दर्शवून आजची 'न भूतो न भविष्यती ' अशी घटना साहेबांना सांगितली. साहेब ही अशी व्यक्ती असते की, ती सहसा तिच्यापेक्षा वरीष्ठ अधिकारी आल्याशिवाय स्वतःची खूर्ची सोडत नसतात. पण आज आश्चर्य घडले. नवोदीत परस्त्रीला पाहून साहेब डिपार्टमेंटची औपचारीकता पार विसरून गेले व तीला वरीष्ठ लिपीकासोबत मार्गदर्शन करू लागले. आणि लगेच झालेल्या चहावर ताण म्हणून उपविभागात कॉफी बोलाविण्यात आली.

कॉफी झाली. दोन वाजेपर्यंतचा वेळ कसा गेला हे कोणालाच कळले नाही. आता लंचमध्ये मॅडम, आपण कोठे राहता, आपणास सोडून देवू काय, मी त्याच रोडवर राहात असतो, वगैरे. सायक्लोस्टाईल वाक्ये जो तो चढाओढीने मॅडमकडे फेकत होते. तिने नाइलाजास्तव, तिला पैदलच चालायची सवय आहे असे स्त्री भाष्य करून सर्वांना सोयीस्कर रित्या टाळले. दुसरा दिवस निसर्गनियमानुसार उगवला. आज मात्र प्रत्येकाची पर्सन्यालिटी बदलेली आढळली. कोणी दाढी करून, कोणी नवीन कपडे घालून, कोणी सुगंधी द्रव्य लावून, शर्टींग न करणारे शर्टींग करून, व आमच्या चपराशाने तर रातोरात अर्जंट शिलाई देवून नवीन कपडा घालून अशा पध्दतीने सर्व मंडळी कार्यालयात नेहमीप्रमाणे उशिरा न येता अगदी वेळेवर उपस्थित झाली होती.

आज मात्र जवळून निरोक्षण करणा-यांनी उपविभागात रूजू झालेली महिला विधवा असल्याचा शोध लावला होता. त्यामुळे सर्वांची मने थोडीफार सहानूभूतिपूर्वक पालटली. जेंव्हा तीने स्वतःची कर्मकहाणी सांगितली तेंव्हा मात्र सर्वांना म्हणजे अगदी बॉस सहीत सगळयांच्या हृदयाचे पाणी पाणी झाले. कदाचीत असा प्रसंग आपल्या कुटुंबावरही येवू शकतो अशा भावनेने त्यांचा ्स्वतःच्या बहिणीसारखा प्रत्यकाने स्विकार केला. असे आढळले की तिचे मिस्टर दुसरे तिसरे कोणी नसून डिपार्टमेंटमधील एक अभियंता होते. त्यांनी या नोकरशाहीमध्ये आत्महत्या केली होती.

.........................

'' Engineers build the Nation, '' असे म्हणतात या उक्तीनुसार या जगातील सर्व अभियंते स्वतःचे प्राण गमावून राष्ट्रोध्दार करीत असतात यात तीळमात्रही शंका नाही. व यावर देखरेख करणारी मंडळी म्हणजे अधिकारी किंवा बॉस. आपल्या धर्मशास्त्रात राग, व्देष, लोभ, मोह मद मत्सर असे षड्रीपू सांगितले आहे. परंतू मनूष्य म्हटला की या सर्व गोष्टी ओघाओघाने आल्याच.

एका प्रकल्पावर डिपार्टमेंटल बोअरींग वर्क सूरू होते. त्यावेळी बाळूला अत्यंत कडक बॉस होते. व ही व्यक्ती बाळूच्या माहितीनुसार थोडी पैशाची लोभी होती. त्यांच्या अशा कडक स्वभावाची बाळूला भिती तर वाटत नव्हतीच कारण बाळू नेहमी सत्य बाजूने राहायचा प्रयत्न करीत असे. त्यामुळे बाळूचे व त्यांचे मुळीच पटत नसे. बाळू पब्लीक स्कूलचा विद्यार्थी असल्याने. बाळूला शाळेत मिळालेल्या संस्काराच्या बाळकडूमुळे. बाळू नोकरशाहीत कोणत्याही खोटया कामास दुजोरा देत नसे. तेंव्हा बॉस नेहमी म्हणायचे - जे काम आपल्याला जमत नाही ते आपण स्वतः होवून दुस-यास दयावे. पण कामाच्या साखळीत अडथळा येवू देवू नये. यातील गर्भार्थ. बाळूला इरीगेशनमध्ये काम करीत असल्याने स्पष्ट समजला. म्हणजेच थोडक्यात बाळूकडून त्या प्रकल्पावरचा कार्यभार काढल्या गेला हे काय वेगळे सांगायला हवे. यानंतर ज्या व्यक्तीस हा कार्यभार दिल्या गेला ती व्यक्ती नुकतीच बढती झाल्यामुळे त्याचे अतांत्रिक गुणवत्तेमुळे त्यास तांत्रिक कामाचा अनुभव कमी व आर्थिक लोभ जास्त होता. या बाबीमुळे त्याची व बॉसची लवकरच गट्टी जमली. रास जुळली. उभयतांना यथोचींत धनलक्ष्मी प्राप्त होत होती. सोबतच राष्ट्राचाही उध्दार होत होता. एकंदरीत 'मेरा भारत महान' अशी स्थ्ीती सुरळीत चालू होती. बाळूकडे हा कार्यभार नसल्याचे बाळूला यत्कींचीतही दुःख नव्हते कारण जे होतं ते भल्यासाठी होतं या कल्पनेच्या धारणेत. बाळू होता.

२१ मार्च. उन्हाळयाचे दिवस होते. होळीचा सण व सूट्टी होती त्या दिवशी. नेमके सूट्टीच्याच दिवशी मजूरांचे पगार व्हावे असे बॉसला व संबंधीत अभियंत्यास वाटणे साहाजीकच होते. सदर काम प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर व्हावयाचे होते. पण त्यावेळी आधीच काम पूर्ण झाल्याचे दर्शवून निधी विभागाकडुन मागवून घेणे किंवा इंप्रेस्ट पध्दतीन अग्रिम पैसा प्राप्त करून घेणे ही त्यावेळची प्रचलीत पध्दत होती. अशा प्रकारचे प्रदान फार घातक ठरू शकते याची जराही कल्पना

उभय अभियंतांना येवू शकली नाही. कारण जसे काही लोक जन्मांध असतात त्याप्रमाणे ते अर्थलोभांध झाले असावे.

त्या दिवशी मजूरांच्या पगारासाठी इकडनं संबंधीत व्यक्ती व तिकडनं साहेब ठरल्या वेळेनुसार चिखलदरा जंगलातील दुर्गम कार्यक्षेत्रात एकत्र येणार होते. Life is an adjustment. असं कदाचीत दोघानांही वाटलं असावं. उन्हाळयाच्या दिवसात दुपारी १२ वाजता पर्यंत कनिष्ठ अभियंत्याची वाट पाहून बॉसनेच सर्व प्रदानाची तयारी केली होती. कनिष्ठ अभियंता इप्सित स्थळी पोहोचले. मजूरांचे पगार आटोपले. व परतीच्या प्रवासास बॉस निघूनही गेले. व कनिष्ठ अभियंता आपल्या घराकडे, एक नुकतीच घेतलल्या लहानशा मोटरसायकलने अकोल्याकडे यावयास निघाले. पण काळाने याच कालावधीत क्षणात परतवाडा ते अंजनगांव रस्त्यावर झडप घेतली. या अभियंत्याची मोटरसायकल महाराज्य परिवहन मंडळाच्या बसवर धडकली. व या अभियंत्याचे जागेवरच निधन झाले.

अशी ही अत्यंत दुदैवी घटना घडताच जिकडे तिकडे हाहाःकार माजला. सर्वांना अतिशय वाईट वाटले पण या घटनेतील गंमतीचा भाग असा की या लोभांध बॉसने, हीच योग्य संधी आहे असे समजून या घटनेचा यथोचीत फायदा उचलण्याचे ठरविले. कोणत्याही व्यक्तीचे निधन झाले तरी त्या व्यक्तीजवळील दस्तऐवज गहाळ होवू शकत नाही ही साधी गोष्ट त्या बुध्दीवादी बॉसच्या टाळक्यात आली नसावी की काय त्या अधिका-याने नाववार हजेरीपटासारखे दस्तऐवज अक्षरशः गायब झाले होते. यालाच म्हणतात 'प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणे. ' आहे की नाही नोकरशाहीत गंमत ! पुढे काय झाले असावे व या लोकशाहीत होवून होवून काय होणार आहे याची सूज्ञ वाचकास जाणीव असतेच.

मूर्खाचा मालक होण्यापेक्षा शहाण्याचा नोकर होणे केंव्हाही चांगले असते असे म्हणतात. प्रत्येक वेळी अशी परिस्थीती निर्माण होइलच हे नोकरीच्या काळात तरी सांगता येत नाही. म्हणजेच उत्तम सहकारी मिळणे, हे बॉसचे नशीब व उत्तम बॉस मिळणे हे सहका-यांचे नशीब असते. पण नोकरशाहीत मात्र दिवस हे घालवावेच लागतात. 'कर्मण्येवा धिकारस्ते मा फलेषु कदाचन ' या उक्तीपेक्षा नोकरशाहीत वेगळेच ब्रीद वाक्य गृहीत धरून कर्मचारी काम करतांना आढळतात. ते ब्रीदवाक्य असे -नित्य फलेषु आशेनं, कर्मण्येवा धिकारस्ते, यदा फलम् न प्राप्तयति, किंम् कर्तव्यम् प्रयोजनम् !

बाळू हा तोतलाडोह प्रकल्पावर असतांना द हितवाद वृत्तपत्रात मिस युज ऑफ पावर असा लेख लिहिला होता व तो छापल्याही गेला होता. त्यावेळी बाळू केवळ बावीस वर्षाचा होता पण तो लेख पावर म्हणजे विजच्या वापराविषयी होता आता मात्र तोच लेख पावर म्हणजे पदाचे गैरवापर असा लिहिला तर एक स्वतंत्र असा ग्रंथच तयार होइल असे वाटते.

शेवटी बॉस या प्रकरणाचा अंत करतांना एवढेच म्हणावेसे वाटते की 'Boss is always right. " हे काही खोटे नाही. याचा अर्थ चांगले बॉस नाहीतच असाही होत नाही. या जगातील चांगुलपणाचं प्रमाण एक टक्का एवढे कमी धरले तरी ही सृष्टी कार्यरत राहु शकते हाच निसर्गनियम आहे. तथापि मूठभर पैशापेक्षा तीळभर सत्ताच सर्वश्रेष्ठ असते हे त्रिवार सत्य नव्हे काय. म्हणूनच तर सत्तेसाठी सत्यही सोडल्याची सत्ताधारकांची सत्यता असते. I mean, To hold the truth of Power, Truth is not Indispensable. नोकरशाहीत अशी बॉसगिरी टिकवायची असेल तर एका चांगल्या पिट्टूची नितांत गरज असते आता या पिट्टूविषयीच्या माहितीसाठी पुढील प्रकरणाकडे वळू या.

.................................



# १८) भ्रष्टाचाराचा उगम

अलिकडेच माझ्या वाचनात मा. अण्णा हजारे यांचे जीवन चरीत्र आले. त्यात असा उल्लेख आढळला की, मा. अण्णा हजारे यांचे जीवन, त्यांचे गूरूस्थांनी त्यांनी मानलेल्या स्वामी विवेकानंदांच्या ग्रंथांमुळे त्यांचेमध्ये आयुष्यात आमुलाग्र बदल झाला आहे. ते नेहमी सत्याच्या बाजूने लढा देत असतात. आजच्या काळात भ्रष्टाचारा विरूध्द कोणी लढा देत असेल तर प्रत्येकाच्या तोंडी याच व्यक्तीचे नांव येते. सत्य हे फार कडवे आहे असे म्हणतात. पण आजही हे जग टिकून असेल तर याच सत्यामुळे असे मला वाटते. आजच्या काळात भ्रष्टाचारा विरूध्द कोणी लढा देणे म्हणजे एक प्रकारचे आगीवरच चालणे होय. कारण भ्रष्टाचाराचा किडा आता कर्करोगासारखा पसरला आहे. या अत्याधुनिक जगात एकदाचे कर्करोगावर औषध निर्मीती होवू शकेल पण या भ्रष्टाचाराचे समूळ नष्टीकरण आजच्या काळात तरी अशक्यप्राय गोष्ट वाटते. या अशा आश्चर्यपूर्ण बाबींची निर्मीती नेमकी कशी होते, हे पाहणे गरजेचे आहे. अर्थातच याला सूध्दा दोन बाजू असण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे नेहमी शासकीय कर्मचा-यांना जे टारगेट करतात. त्यांना या भ्रष्टाचाराची दुसरी बाजू या प्रकरणात समजावून सांगण्याचा माझा मानस आहे.

१९९४ च्या सुमारास मी औरंगाबाद येथे वाल्मी या संस्थेमध्ये 'पाणी व जमीन व्यवस्थापनाच्या पदविका प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र शासनातर्फे निवडल्या गेलो होतो. तेथे सहा महिने कालावधीचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर वाल्मी संस्थेतर्फे आम्हा प्रशिक्षणार्थींना एक तांत्रिक भेंट म्हणून महाराष्ट्रात कोठेतरी पर्यटनास नेण्याची प्रथा आहे. त्या प्रथेनुसार मला व माझ्या मित्रांना मा. अण्णा हजारे यांचे राळेगण सिध्दी येथे त्यांचा भेंट घेण्याचा योग आला. महान व्यक्तींच्या भेंटीला दर्शन म्हणावयास हरकत नाही. राळेगण सिध्दी येथे त्या व्यक्तीचं कतृत्व पाहून व तेथील त्यांची जीवन शैली पाहून मी अगदी भारावून गेलो व मला माझ्या शासकीय पब्लीक स्कूलचे दिवस आठवले. तेथे आम्हाला आदर्श शाळेत अशाच प्रकारचे अनेक चांगले संस्कार केवळ शिकविण्यातच आले नव्हते तर त्याची अंमलबजावणी जीवनात कशी करायची हे सूध्दा शिकविण्यात आले होते. त्यावेळी आमच्या बालपणात आमच्या शाळेत वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे अगदी जवळून दर्शन घेतले होते व त्यांचा आशिर्वाद सुध्दा प्राप्त करण्याचा योग आला होता. तसेच संत पांचलेगांवकर महाराज व राष्ट्रसंतांच्या सानिध्यात आमच्याकडून एक चांगले काम करवून घेतल्या गेले होते व ते म्हणजे चिखलदरा परिसरात सहा किलोमीटरवर एका लहानशा मोथा या गावामध्य, त्या काळात पाण्याची अतिशय अडचण असल्याकारणाने आमच्या आदर्श शाळेतील मुलांची संख्या लक्षात घेता त्या गावाजवळ एक किलोमीटरचे परिसरात पाझर तलावाचे काम श्रमदानाच्या माध्यमातून करवून घेतल्या गेले. या गोष्टीचा आम्ही त्या बालपणात फार आनंद घेतला पण आज जर आपण त्या गावात जावून पाहले तर तुम्हास आढळून येइल की

तेथील लोकं पाणी मिळत असल्याने किती आनंदी आहेत. याचा आम्हाला आजही फार हर्ष होतो व आम्ही केलेल्या कामाचा अभिमानही वाटतो.

अशाच प्रकारचे दृश्य १९७२ नंतर मला तब्बल २२ वर्षानंतर येथे राळेगण सिध्दी मध्ये पहावयास मिळाल्या मुळे माझा आनंद गगनात मावेनासा झाला. आपल्या ह्दयाजवळची व्यक्ती भेटल्याचे समाधान लाभले होते. राळेगण सिध्दी येथील मा. अण्णा हजारे यांच्या संस्थेत मला अजून एक गोष्ट आवर्जून आढळून आली व ती म्हणजे येथे नापास झालेल्या मुलांसाठी शाळा काढलेली आहे. अहो.. जेथे हूशार मूलांना शिकविण्याचा कंटाळा येतो तेथे या नापास मुलांना शिकविणे किती बरे कठीण असेल.. याचा मनोमन विचार करीतच मी त्या स्थळावरून बाहेर पडलो.. या प्रसंगाचा उल्लेख येथे मुद्दामच केलेला आहे कारण मला यात संस्कार व आजकालचा भ्रष्टाचार याचा विरोधाभास दाखवायची इच्छा होती. भ्रष्टाचाराच्या या कर्करोगाचे निमूर्लन करण्याकरीताच कदाचीत या महान व्यक्तीचा जन्म या पृथ्वी तलावर झाला असावा असे कधी कधी माझ्या मनाला वाटते. पण सध्या हा रोग पूर्ण विश्वात पसरला आहे असे दुःखाने म्हणावेसे वाटते. भ्रष्टाचार या प्रकरणाविषयी संपूर्णपणे लिहावयाचे झाल्यास, प्राचीन प्रसिध्द शास्त्रज्ञ ॲरिस्टॉटल याचे म्हणण्यानुसार या बाबीचा एक महान विश्वकोशच निर्माण होण्याची शक्यता आहे. कारण विश्वकोशाची पहिली कल्पना ही ॲरिस्टॉटलचीच. भ्रष्टाचाराबाबत आपण भरपूर अनुभव कथन करू शकतो पण याची मूळ सूरूवात कां व कशी झाली व या भ्रष्टाचाराच्या नाण्याच्या दोन बाजूपैकी नेमकी कोणती बाजू महत्वाची आहे याचा मी येथे रहस्यमय उहापोह करणार आहे.

नोकरशाहीमध्ये प्रत्येक कर्मचा-यास पगार मिळत असतो. त्याला त्याचे पगारात संसार करणे आवश्यक असते परंतु त्याच्या आवश्यक गरजा व्यतिरीक्त त्यास जर छंद, सवयी असतील तर मात्र त्यास पगार पुरत नाही व त्यामुळे तो अतिरीक्त पैसा मिळविण्याच्या फंदात पडतो. व तसा तो कार्यालयीन काम करतांना प्रयत्नशील असतो. ही एक गरज भ्रष्टाचारास कारणीभूत होवू शकते. तरीपण सर्वसाधारण कर्मचारी निदान नोकरीच्या प्राथमिक काळात तरी भ्रष्टाचार करीत नाही असे माझे ठाम मत आहे. मग अशा प्रकारच्या गरजा कर्मचा-याच्या असो की काम घेणा-या अभिकरणाचे असो.

आजच दि. ४. ०१. २०११ ला भ्रष्टाचार निर्मूलनाबाबत एक बातमी सकाळ वृत्तपत्रात माझ्या वाचनात आली. सन २०१० या गतवर्षी नाशिक लाच प्रतिबंधक विभागाच्या जाळयात १२३ सरकारी कर्मचारी अडकले असून त्यातील ९० टक्के कर्मचारी निलंबीत झाले आहे. वर्ग १ च्या अधिका-यापासून ते तृतीय श्रेणीपर्यंतचे कर्मचारी त्यात अडकले आहेत. कर्मचा-याने पैसा किती मर्यादेपर्यंत कमवावा, ही जाणीव नवीन वर्षात करून देण्यासाठी पांचवा स्तंभ (फिप्त पिलर) या संस्थेने 'झीरो रूपयाची नोट ' प्रसिध्द केली आहे. 'भ्रष्टाचार खत्म करो 'असा संदेश देणारी ही नोट नवीन वर्षात, नाशिकच्या लाच प्रतिबंधक विभागातर्फे सर्वत्र वाटली जाणार आहे. ८० देशात अशा नोटा वाटल्या जातात. व महाराष्ट्रात प्रथम असा प्रयोग होणार आहे. असा या विस्तृत बातमीचा संक्षिप्त आशय आहे. त्यामुळे भ्रष्टाचारात जरी नोकरशाहीत कर्मचा-यांना

दोषी ठरविल्या जात असेल तरी या भ्रष्टाचाराची दुसरी बाजू लक्षात घेणे अत्यंत महत्वाचे आहे असे वाटते.

उदाहरणार्थ :- समजा नाशिकवरून रोहिलाला जाणारी शेवटची बस आहे. कंडक्टर नियमानुसार सीट्स घेणार असतो. अशा वेळी शेवटची बस चुकल्यास प्रवाशाला नाशिक येथे मुक्काम करण्याकरीता किमान दोनशे रूपये अतिरीक्त खर्च येत असतो त्यामुळे हा प्रवासी काय करतो त्या कंडक्टर ला नियम बाहय प्रवृत्तीस दुजोंरा देतो व जास्तीच्या सीटस भरावयास सांगतो त्यासाठी हा प्रवासी जास्त पैसे देण्यास तयार असतो कारण याला येणारा लॉजचा खर्च वाचवायचा असतो म्हणजेच जास्त पैसे देवून लांच घेण्यास हा प्रवासीच कारणीभूत नाही कां ! म्हणजेच भ्रष्टाचाराची सूरूवात कोणी केली. अशीच परिस्थीती प्रत्येक कार्यालयात कशावरून निर्माण होत नसेल.

वास्तविक सर्व कर्मचारी हे शासकीय काम करीत असतांना त्यांना शासनाशी किंवा शासनाच्या नियमाशी एकनिष्ठ राहावे लागते कारण त्यासाठीच त्याची नेमणूक असते. समजा इरीगेशन डिपार्टमेंट मध्ये एखादे अंदाजपत्रक तपासायचे आहे तर ते शासनाच्या निकषानुसार तपासणे हे सरकारी कर्मचा-याचे कामच आहे मग त्यासाठी विशीष्ट वेळ सूध्दा लागणे साहाजिकच आहे. उगीच घाई करून कसेही तपासल्यास शासनाशी बेइमानी होणार नाही काय? परंतू दृश्य असे आढळते की जो व्यक्ती किंवा अभिकरण काम घेणारे असते त्यांच्या संबंधीत व्यक्ती विनाकारणच शासकीय कर्मचा-यावर दबाव आणून त्यांचे कडून काम करवून घेण्याचा प्रयत्न करतांना दिसतात. ही बाब किती योंग्य आहे हे प्रथम ठरवावयास पाहिजे तेंव्हाच शासकीय कर्मचा-यांना दोषी ठरविणे योग्य राहील असे माझे मत आहे. त्यामुळे या भ्रष्टाचाराच्या बाबतीत माझे तरी मत असे आहे की भ्रष्टाचाराच्या नाण्याची दुसरी बाजूच दोषी आहे.

आता दूसरे उदाहरण बघू. पूवीच्या काळी ब-याच व्यक्ती, त्यांच्या मुलीच्या लग्नाच्या वेळी स्वतः होवून प्रेमाने मुलीसाठी भेंट म्हणून काही वस्तू स्वखूषीने प्रदान करीत असत. असे करता करता दुस-या पार्टीकडील लोकांना हळूहळू लोभ सूटत गेला व आज अशी परिस्थीती आहे की त्याचे रूपांतर हूंडयामध्ये झाले आहे. सांगण्याचे तात्पर्य असे की चांगुलपणाची सूरूवात आपण करायला हवी तेंव्हाच हा कर्करोग दूरूस्त होवू शकेल अन्यथा भ्रष्टाचार या जगातून कधीच नष्ट होणार नाही.

बहूतांश व्यापारी वर्गातील लोकं श्रीमंत असतात. त्यांना पैशापेक्षा वेळ अतिशय महत्वाची वाटते कारण त्यांचा पैसा कमवायचा वेळ वाया जावू नये म्हणून ते सर्व कार्यालयीन कामे पैशाच्या माध्यमातूनच करण्याचा प्रयत्न करतात त्यामुळेच आर टी ओ सारख्या कार्यालयात एजंट निर्माण झाले आहे. आजकाल तर प्रत्येक गोष्टीसाठी एजंट आहेत त्यामुळेच ही भाववाढ सूध्दा असावी असे वाटते.

...............................

# १९) निवृत्तीचा दुःखानंद

जन्म झाला की जसा मृत्यू अटळ असतो त्याचप्रमाणे कोणत्याही नोकरीमध्ये एकदा प्रवेश केला की त्याची सेवानिवृत्ती ही अटळच असते. ही निवृत्ती एक प्रकारची मुक्तीच असते. यामुळे नोकरशाहीतील कामापासून तर मुक्ती मिळत असतेच पण अशा ३५ ते ३८ वर्षाच्या सेवाकाळात आलेल्या सर्व स्नेहसंबंधांना जेंव्हा सोडून जावे लागते त्यावेळी मात्र त्यास अतिशय दुःख होणे स्वाभाविकच आहे. असे प्रत्येक कर्मचा-यास वाटत असते.

या कर्मचा-यांना नोकरशाहीची एवढी सवय झाली असते की साधी दोन दिवसाची जरी सूट्टी आली तरी कधी कधी ते दोन दिवस सूध्दा फार कंटाळवाणे वाटतात पण अशा निवृत्तीच्या वेळी त्याना या नोकरीपासुन कायमचे मुकावे लागत असल्याने त्यांना नेमके काय वाटत असावे याची कल्पनाच करवत नाही. हा क्षण दुःख व आनंद मिश्रीत असतो. एक मात्र निश्चीत आहे की ज्यांना काही वैयक्तीक छंद आहेत जसे की लिखाण, संगीतातील गीत गायन, चित्रकला, वाचन, जनसेवा, संभाषण कला, मित्रसमुह जमविणे, चर्चासत्र आयोजीत करणे इत्यादी कला अवगत असेल किंवा त्या शिकण्याकडे कल असेल तर मात्र त्यांना आयुष्य कधीच कंटाळवाणे होत नसते. व तो त्याचे जीवनाचा प्रत्येक क्षण अतिशय आनंदाने घालवित असतो.

या नोकरशाहीमध्ये कोणताही कर्मचारी किंवा अधिकारी सेवानिवृत्त होतो तत्पूर्वी त्याचे पदामुळे अस्तित्व कायम असते व त्यास सातत्याने आदर मिळत असतो परंतू एकदा कां तो निवृत्त झाला की मग त्या व्यक्तीस फारसे कोणी महत्व देत नाही. तो अगदी जनसामान्यासारखाच असतो याची त्यास निवृत्त झाल्यानंतर कल्पना येत असते. तोपर्यंत तो त्याचे पदाचे गूर्मीत असतो. त्यास रिटायर्ड झाल्यानंतर जो मान मिळतो तोच त्याचा आयुष्यभ-याचा सी आर असतो. जसजसा वृध्दापकाळ जवळ येतो तसतसा त्याचा मान कमी होत जातो व तो एक प्रकारचा समाजासाठी व घरी सूध्दा एका प्रकारचा अनवांटेड झालेला असतो असे त्यास वाटत जाते व एक दिवस मग तो या जगातून निरोप घ्यावयास स्वेच्छेने तयार असतो. तो मग बुध्दिने कितीही हूशार असला तरी त्यास प्रत्येक गोष्टीकडे हेतूपुरस्सर डोळेझाक करावी लागते. सेवानिवृत्तीनंतर नेमके काय होते याबाबत बाळूचा एक अनुभव बघा.

एकदा बाळूला एक सेवानिवृत्त झालेली व्यक्ती अमरावतीला बँकेजवळ दिसली. वृध्दपणामुळे ती रिक्शा शोधत होती. त्यांचेजवळून त्यांचेच कार्यालयातील अनेक व्यक्ती जात होत्या पण कोणीही त्यांना असे विचारले नाही की आपणास कोठे जायचे आहे. कोणीही त्यांना लिफ्ट देत नाही असे आढळून आले होते. वास्तविक बाळूचा व त्यांचा कार्यालयीन संबंध नव्हता

पण बाळू मात्र ती एक उच्च पदस्थ व्यक्ती असल्याने बाळू ओझरता त्यांना ओळखत होता. हा क्षण बघून बाळूस फार वाईट वाटले. बाळू त्यांचेजवळ गेला त्यांना चहा पाजला व त्यांना जेथे जायचे होते तेथे सोडूनही दिले. त्यांनी अर्थातच बाळूचे नांव विचारले. बाळूची स्वतःचे नांव सांगण्याची अजिबात इच्छा नव्हती कारण बाळूस वाटले कबीराच्या म्हणण्यानुसार माणसाने नेकी करावी व विहीरीत नेवून टाकावी. त्यामुळे बाळूने सांगितले सर मी फक्त एक पांथस्थ आहे. (पांथे तिष्ठती इती पांथस्थः !म्हणजे जो मार्गात उभा असतो तो पांथस्थ) जेंव्हा बाळूने त्या अधिका-याच्या डोळयातील तराळलेले पाणी पाहाले तेंव्हापासूनच बाळूचेही डोळे नेहमीच या सेवानिवृत्तीकडे पाहून पाणावत असतात. त्यास वाटले ..... क्षणाक्षणाचे कण कण वेचून, दुःख कसं येतं टोचून. आयुष्यभर आनंद देवूनही, मृत्यू येतो खोचून. !

वृक्ष आयुष्यभर उन्हात उभा राहुन पांथस्थांना देत असतो सावली !

पांथस्थ मात्र मार्गस्थ होताच, कृतघ्न होत असते ही माऊली !!

केवढे हे क्रौर्य !

....................................



## २०) उरलं सुरलं

बाळूचं संपूर्ण जीवन या नोकरशाहीमध्येच संपुष्टात येत आहे. त्यामुळें त्याने काही चारोळया सूध्दा तयार केल्या आहेत. वास्तविक बाळू काही कवि नाही किंवा तो मोठा माणूस पण नाही पण त्याला या चारोळया लोकांना ऐकविण्यात मोठी मजा वाटत असे. त्याच्या काही चारोळया गंमत म्हणून पाहण्यास काही हरकत नाही असे वाटते पण त्याला या नोकरशाहीची थोडीफार भिती सूध्दा वाटते. तरी पण थोडा ओव्हरलूक करुनच घ्या असे त्याचे मत आहे. पाहू या आपल्या मनास त्या पटतात कां !

जावे त्याचे वंशा तेंव्हा कळे !

खावे त्याचे कार्या तेंव्हा फळे !!

............

ज्याचे हाती फुकटाचे पैसे !

त्याचे जीवन ऐसे तैसे !!

............

कशाला पाहता वाकडे इकडे

हे ही मिळत नसे तिकडे

............

नोकरशाहीत बदलीचा घेवू नका धस्का

इच्छा असो नसो, हळूच खस्का

............

आमदार खासदार सर्व काही चमच्यांच्या खिशात

सगळं रहस्य दडलं आहे.. पैशांच्यांच पिशव्यात

............

जो तो म्हणतो मला आता पाहिजे ही नोकरी

धरा न मग हातात भरपूर पैशाची टोकरी

............

सत्तेगिरी, मक्तेगिरी, गुंडेगिरी, दादागिरी
असल तुमच्या जवळ तर नोकरशाही दारी

............

मनी नाही भाव म्हणे नोकरशाही पाव
संस्थेची नोकरी नाय फुका भाजी पाव

............

प्यायचा असलं तुम्हास नोकरशाहीचा हुक्का
तर प्रत्येकाच्या पायापाशी शक्यतोंवर झुका

............

इथं घ्यावे लागतात प्रत्येकाला खेटे
तेंव्हा चढतात डोक्यावर नोकरशाहीचे फेटे

............

नोकरशाहीचं उपनिषद बाळूनं दिलं सांगून
होवून राहला पश्चाताप बाळूस आता मागून ...

वाचकांनो बाळूकडें पक्क लक्ष ठेवा
बाळू संस्पेड होवू नये हीच विनंती देवा

इति बाळू उवाच, नोकरशाही गूपित समाप्तम् !

.........................

-------------- **बाळकवि बाळू**

# लेखक परिचय

श्री. प्रकाश माणिकराव राऊत हे सध्या उपविभागीय अधिकारी या पदावर, मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात, नाशिक येथे कार्यरत आहेत. त्यांनी स्थापत्य अभियांत्रिकी पदविका १९७७ मध्ये, तसेच कला स्नातक ही पदवी आवड म्हणून १९९८ मध्ये इंग्रजी साहित्य व मानसशास्त्र हे विषय निवडून, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून प्रथम श्रेणीत प्राप्त केली आहे. तसेच अतिरीक्त छंद म्हणून भारतीय योग विद्याधाम, नाशिक येथून योगशिक्षक ही सूध्दा पदविका १९९६ मध्ये पूर्ण केल्यानंतर समाजसेवा म्हणून अमरावती येथे तीन वर्षे योगाचे वर्ग तसेच शासकीय तंत्रनिकेतनात योग वर्ग व विदर्भात अनेक ठिकाणी योगावर भाषणे इत्यादी उपक्रम विनामूल्य केलेले आहेत. यांचेवर 'विशेष व्यक्ती' असा लेखही अमरावतीचे प्रसिध्द लेखक डॉ. गोविंद कासट यांनी दिनांक २४ मार्च १९९६ ला, अमरावती येथून निघणा-या मातृभूमी या दैनिकात लिहीलेला आहे. त्यांना लहानपणापासूनच लिखाणाचा छंद असल्याने त्यांचे आजपर्यंतचे काही पत्र लिखाण व लेख अनुक्रमे द हितवाद, नागपूर टाईम्स, मातृभूमी, अकोला येथून प्रसिध्द झालेले आहेत. ते शासकीय पब्लीक स्कूलचे १९६७ ते १९७२ या बॅचमधील विद्यार्थी असल्याने त्यांचे लिखाणात सत्यतेवर व संस्कारावर जोर दिलेला आढळून येतो. विनोदी स्वभावाचे प्रकाश राऊत हे त्यांचे मित्रवर्गात पदाचा अधिकार विसरून अगदी मनमिळावू होवून जातात. याची जाणीव त्यांचे साहित्य वाचतांना जाणवते. पण दीर्घ लिखाणाचा यांचा मात्र हा प्रथमच प्रसंग व प्रयत्न आहे. तेंव्हा वाचकांनी यांना भरपूर प्रतिसाद दयावा असे वाटते.

**---प्रकाशक**

<u>समाप्त</u>

# ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी ही एक सशक्त भाषा आहे. सशक्त म्हणजे – जे भाव मनात आहेत ते अत्यंत तरलपणे आणि अचूकपणे सांगण्याची क्षमता असणे. उदाहरणार्थ या भाषेत बोलणे या एकाच कृतीला बोलला, सांगितले, म्हणाला, सुनावले, ऐकवले, उच्चारले, स्पष्ट केले, बोलून टाकले, सुचवले, कुजबुजला, पुटपुटला, खडसावले, विनवले, असे असंख्य शब्द आहेत आणि या प्रत्येक शब्दाला एक स्वतःची अशी अर्थछटा आहे. आपण जेव्हा आपली भाषा वापरतो तेव्हा या छटा आपण व्यवस्थित बोलू व समजू शकतो. म्हणून मराठी साहित्याचा , वाचनाचा , पुस्तकांचा प्रचार आणि प्रसार भरपूर व्हायला हवा. म्हणजे आता आहे त्याच्या निदान दहा हजार पट. सध्याचा आपला साहित्य व्यवहार हा अगदीच छोट्या विहिरीपुरता मर्यादित झाला आहे. त्याला एखाद्या विशाल महासागराचं रूप द्यायचा आमचा प्रयत्न आहे. त्यासाठी आम्हाला तुमची मदत हवी.

ई साहित्यची पुस्तकं विनामूल्य आहेत. ती तुम्ही कोणालाही कितीही देऊ शकता. त्यात दानाचं पुण्य मिळेल आणि खिशाला फ़ारसा खार न लावता. कृपया आपल्या ओळखीच्या किंवा माहितीतल्या लोकांना, संस्थांना, शाळांना, वाचनालयांना, कार्यालयांना , सोसायट्या, गावं, नगरपालिका, ग्रामपंचायत, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला मंडळं यांत ई साहित्यची पुस्तकं पसरवा. त्यांची माहिती पुरवा. आमचे प्रतिनिधी व्हा. (मात्र बिनपगारी फ़ुल अधिकारी).

साहित्य प्रसाराचा हा बांध फ़ुटु दे. वाचू दे लोकांना. मराठी भाषा वैभवशाली होऊ दे.

काहीही मदत लागली तर आम्ही आहोतच. आपल्या उपक्रमांचे फ़ोटो आम्हाला पाठवा.

धन्यवाद

टीम ई साहित्य